२६५०० श्रीगणपती याचे भाद्रपद मासांतील व श्रीव्यंकटेशाचे अश्विन मासांतील पेस्तर साल सन तिसा मयातैन, शके १७३० विभव नामसंवत्सराचे उत्साहनिमित्त दर उत्साहास दररोज पाचशें असामींचें ब्राह्मणभोजन त्यास, व एकादशीस फराळ करावयाचे त्यांस साहित्य. साखरभात, व दुसरें पक्वान्न पुरणाच्या पोळ्या, अथवा उत्तम पक्वान्न असेल तें, व दहा भाज्या, व दहा कोशिंबिरी, व केळींचीं पानें, व वरकड भोजनाचें साहित्य चांगलें; व कुलपी विडा पिकले दहा पानांचा, विड्यांत सामान दोन लवंगा, व दोन वेलदोडे, व कातगोळ्या दोन, व चुना, व शिरस्तेप्रमाणें सुपारी, व आचारी, व खटपटे, व वाढणारे ब्राह्मण, यांचा बदल मुशाहिरा; व ब्राह्मणांस केशरी गंध, व कस्तुरीची अक्षता, व कुंकवाची रांगोळी, व उदबत्या, व दक्षणा दर असामीस शिवराई पैसा येक, याप्रमाणें यथास्थित मशारनिल्हेनीं करावयाचें कबूल केलें त्यास ब्राह्मण भोजनाचे रोज.

---

28. The food expenses of 125 persons, who daily took their dinner and supper at the principal palace, including the expenses of feeding 1000 additional men, every month was farmed for Rs. 29000 a year.

A. D. 1807-1808.

29. The food expenses during the Ganapati and Vyankatesh festivals in the month of Bhadrapad and Ashwin, when 500 people were to be served with dinner for 26 days, were farmed for Rs. 16500 The menu was specified. (26500) ?

A. D. 1807-1808.

१४ श्रीगणपतीचे उत्साहनिमित्त ब्राह्मणभोजन दररोज ५०० प्रमाणें.
१२ श्रीव्यंकटेशाचे उत्साहनिमित्त दररोज ब्राह्मण ५०० प्रमाणें.

२६

सवीस रोजा, सदरहु प्रमाणें बिलकूल बेगमीचे रुपये, खाशाकडील थोरले वाड्यांतील पंगतीकडे छ १२ जिलकाद पौष शुद्ध १४ साल मजकूर सन समान मयातैन, शके १७२९ प्रभवनाम संवत्सरें तागाईत छ २३ जिलकाद पौष वद्य १० पेस्तर साल सन तिसा मयातैन शके १७३० विभवनाम संवत्सरें पावेतों, भोजन खर्चा बदल व भोजन दक्षणा, वगैरे बिलकूल बेगमीचे, बदलमुशाहिरा, वगैरे सुद्धां शुक्रवारचे वाड्याप्रमाणें रुपये

२६५०० सवीस हजार पांचशें रुपये प्रांत जुन्नर निसबत मशारनिल्हे याजकडे साल मजकुरचे रसदेचा ऐवज येणें, त्यापैकीं देविले असेत तरी घेणें. मजुरा पडतील म्हणोन वरातेत लिहून देविलें.

रुपये.

५००० मार्गशीर्ष शु॥ १ चे.
५००० पौष शु॥ १ चे.
५००० माघ शु॥ १ चे.
५००० फाल्गुन शु॥ १ चे.
५००० चैत्र शु॥ १ चे.
१५०० वैशाख शु॥ १ चे.

२६५००.

३०।२१० बदल देणें, खाजगत खर्चाबद्दल, खाशांकडील खाजगीकडे २०००००० वीस लक्ष रुपये, कमावीस नजरे बदल विठ्ठलराव नरसिंह यांजकडे. सबबकीं नरसिंह खंडेराव यांचे नांवें जातीस व फौजेचे बेगमीस व किल्ले सरंजामचे गांव सुद्धां निसबतीस व इनाम गांव, व जमीनी चालत आहेत. त्यास ते मृत्यु पावले. पोटीं पुत्र नाहीं याजकरितां नरसिंह खंडेराव यांचे चुलत आजे त्रिंबकराव शिवदेव यांचे पणतु तुम्हीं, सबब नरसिंह खंडेराव यांस तुह्मांस दत्त पुत्र देऊन तुमचे नांवें पेशजीप्रमाणें जातीस व फौजेचे बेगमीस सरंजाम व किल्ले सरंजामाचे गांव सुद्धां निसबतीस व इनाम गांव, व जमीनी, करार करून देऊन तुह्मांस सरदारीचीं वस्त्रें व बहुमान दिल्हा त्यासंबंधें सरकारचे नजरेचा ऐवज सालगुदस्तां सनसबा मयातैनांत घ्यावयाचा करार केला त्यापैकीं देविले.

इ० स० १८०७–०८
समान मया तैन व अलफ.
मोहरम २७.

रुपये.

30. There is a debit of 20 lacs of rupees for the private expenses of the Peshwa. The amount was received from Vithal Narsinh, as Nazar for sanction to his adoption as son of Narsinh Khanderao, and to his succeeding to his father's estate.

A. D. 1807-1808.

तुम्हांस दत्त पुत्र घेण्याबद्दल नरसिंह खंडेराव यांणीं सरकारांत वीस लक्ष येक रुपया नजर बाळाजी लक्ष्मण यांचे विद्यमानें द्यावयाचे करार केले, ते वीस लक्ष रुपये तुम्ही बाळाजी लक्ष्मण याचे गुजारतीनें सरकारांत भरले, ते हुजुरचे खासगीकडे पावले असेत. म्हणोन विठ्ठलराव नरसिंह यांचे नांवें खासगीकडून जाब दिला आहे.

इ० स० १८०७–०८ समान मयातैन व अलफ. मोहरम २९.

३१।२११ बदल देणें. खासगत खर्चाबद्दल, खाशाकडील खासगीकडे रसानगी १७९७६९ रुपये.

इ० स० १८०८–०९ तिसा मयातैन व अलफ. जिलकाद ११

३२।२१७बदल देणें, विद्यमान जीवनराव पंडित सुमंत यांजकडे रसानगी यादी. रुपये.

३८९३९ इमारती खर्च. वाडा शुक्रवार शहर पुणें याचे लगत उत्तरेच्या आंगें पूर्वेस नाची दिवाणखाना चापेखण सुद्धां तेरा खणीं उत्तर दक्षण लांबी तेहतीस गज व रुंदी आठ गज; व पूर्वेच्या आंगचे नाची दिवाणखान्याचे बोलीनें उत्तराभिमुख दुघई, पूर्व पश्चम करावयाची त्याचे चापेखण चार. या प्रमाणें इमारत येक मजला पूर्वेकडील लांबी दक्षण उत्तर गज ४१ येकेचाळीस व रुंदी पूर्वपश्चम इमारत मांडण गज ८ आठ, येणें प्रमाणें इमारतीचें कामाचा खर्चाचा बिलकूल मक्ता जीवनराव पंडित सुमंत यांणीं करार केला त्या प्रमाणें. रुयये.

३२६५० पूर्वेकडलि नाची दिवाणखाना खांब, लगा, व तातरे, गलथा, व तुळया, पाटणीस सोट व तक्ते घालून, लांबी दक्षण उतर गज ३३ तेहतीस, मधील खण ११ अकरा, दरखणीं लांबी गज २। सवा दोनप्रमाणें, येकूण गज २४।॥., पावणे पंचवीस. चापेखण २ दोन दक्षण उत्तर दर चोपखण गज ४८३ प्रमाणें गज ८। सवा आठ येकूण लांबी गज तेहतीस, चापेखण सुद्धां खण १३ तेरा, पूर्वेचे रस्त्याचें आंगें वाड्यास जोतें माठीव आहे त्या मासल्याचें व कोरेचें काम, पश्चमेचे आंगें जोतें दोन गळथे व पेटी सुद्धां उंची गज .॥. आर्धा व पाठथऱ्या व खुर्च्या पूर्वेच्या रस्त्याचे आंगें जोत्यावरील सुद्धां नामी, वाड्याचे दक्षणेस पूर्वाभिमूख सोप्यास जोतें व खुरच्या आहेत त्या मासल्याप्रमाणें, व शिंदी व अस्तर गाऱ्या व गिलावे व गच्या मुंढेऱ्या, व छज्ये सुद्धां मक्ता.

६२८९ उत्तराभिमुख दुघई लांबी पूर्वपश्चम, पैकीं पश्चमेकडील भिंतीचा असार जिने वगैरे करावे लागतात, सबब गज १॥ खेरीजकरून गर्भी जागा अजमासें लांबी कमकसर गज २८॥। पावणें येकू-

---

31. Rs. 179769 are debited in the name of the Peshwa, on account of his
A. D. 1807-1808. private expenses.

32. A hall and room to the North side of the Shukrawar palace was built at a cost of Rs. 40000. The work was executed by Jivanrao Pandit, Sumant, by contract.
A. D. 1808-1809.

णतीस. पूर्वेचे आंगें चापेखण २ प्रमाणें दर दालनास येकूण खण चार, दर चापेखण गज चार प्रमाणें चतुरस्त्र व गर्भीचे खण ७ सात दर खण गज कमकसर २।३॥ सवा दोन गज साडेतीन तसुप्रमाणें गज १६|||. पावणेसतरा; पश्चमेकडील चापेखण दर दालन चतुरस्त्र गज ४ चार प्रमाणें जोतें व खुरच्या कोरेच्या वगैरे कुलकाम सुद्धां मक्ता. २८१२९ रुपये.

पैकीं पूर्वेचे आंगें नाची दिवाणखान्याची रुंदी गज ८ आठ याचे वेळेंचे लगतीस काम दुधईपैकीं चापेखण दर दालानास २ प्रमाणें, दर चापेखण गज ४ चार चतुरस्त्रप्रमाणें चापेखण ४ दुघईस येकूण चतुरस्त्र गज ८ आठ कोरेच्या जोत्याखेरीज कुलकाम. सदरहु कामाचे आकारपैकीं आकार हिशेबानें करून मक्ता रुपये.

३८९३९

येकूण अडतीस हजार नऊशें येकूणचाळीस रुपये. सदरीं काम लिहिल्याप्रमाणें मक्ता गौंडीकाम पाये, टाकीचे खडकापर्यंत खांदून नामी भरून व गर्भीं पुरवणी मातीचे गाऱ्यांत गडगल आटकी चवाळीनें भरून वर येक थर चुन्यांत त्यावर मुरुम घाळून, व सिंदी अथवा पडद्या यांस गिलावे, अस्तरगाऱ्या, व गच्ची, व मुंढेरी व छज्या, खंगर विटाचे थर देऊन वर नामी चुन्याची गच्ची मजबूद, व दगडी संगत राशी काम माठीव, पूर्वेचे आंगें जोते गज ४१ येकेचाळीस, सरकार वाड्यास रस्त्याचे आंगें आहे त्या मासल्याप्रमाणें, व कोरेचें काम सरकार वाड्याचे दक्षणेस पूर्वाभीमूख सोप्यास जोतें, व खुरच्या, व पाटथरा आहे त्या मासल्याप्रमाणें, दिवाणखाना नाची यास जोतें उंची गज ·॥· आर्धा, दोहीं आंगें गलथा, मध्यें पेटी याप्रमाणें व पाटथरा व खुरच्या पूर्वेचे रस्त्याचें आंगचें माठीव जोतें नवीन सुद्धां; व सुतारकाम, लांकूड सागवानी सालगुदस्ताचे तोडीचें वाळलेलें, बीन दरज बीन कोप गांठाळ खेरीज करून नामी मजबूद सरकारवाडा लगत याचे खालील मजल्याचे तसुवादी प्रमाणें लाऊन. सदरहू काम करावयाच्या मुदती. इमारत पाटणी पर्यंत इस्तकबील पौष शु॥ १३ शके १७२० विभवनाम संवत्सरें ते अधीक आषाढ शु॥ १३ शके १७२१ शुक्लनाम संवत्सरे पर्यंत कुल करावी; व गच्ची मुंढेरी व छज्या इस्तकबील, आषाढ शु॥ १३ तागाईत श्रावण शु॥ १३ पर्यंत करावें. याचे लागवड व मजुरीचे वैगेरे खर्चास मक्ता रुपये.

१०६१ तसलमात पंडित मशारनिल्हे याजकडे जाजती सदरील काम खेरीज रुपये.

४००००

चाळीस हजार रुपये परगणें, जंबूसर प्रांत गुजराथ निसबत त्रिंबकजी डेंगळे याजकडे साल मजकुरचे रसदेचा व पोतें चालीचे बट्याबाबत ऐवज येणें त्यापैकीं देविले. रुपये.

३३।२१९ बदल देणें. मुदबखखर्च, वाडा शुक्रवार व वाडा विश्रामबाग शहर पुणें येथील व स्वारींतील स्नानाचें पाणी तापवावयास लांकडें जळाऊ, व पाणके ब्राह्मण व कामाठी यांस तैनात भाडें खेरीज करून, इस्तकबील पौष शुद्ध द्वादशी छ ११ जिलकाद साल मजकूर सन तिसा मयातैन, तागाईत मार्गशीर्ष अखेर छ २८ जिलकाद पेस्तरसाल सन आशर मयातैन, पावेतों अधिक आषाढ मास सुद्धां बारा महिने आठरा रोजांचे बेगमीचा मक्ता गंगाधर बाळकृष्ण मराठे यांनीं कबूल केला त्याप्रमाणें मराठे यांजकडे रसानगी यादी छ २६ जिलकाद. १३०० रुपये.

इ० स० १८०८–०९
तिसा मया तैन व अलफ.
रबिलाखर २०.

एक हजार तीनशें रुपये इजाफत जमा, खाशांकडील खासगीपैकीं जमा धरून देविलें गुजारत त्रिंबकजी डेंगळे. रुपये.

३४।२२३ जनार्दन नारायण कारकून शिलेदार यास सरकारांतून तालुके व महालनिहाय येथें नवऱ्या पहावयास पाठविले आहेत त्यांस डोल्या व घोडीं व शिपाई वगैरे सरंजाम मशारनिल्हे तुम्हांस सांगतील त्याप्रमाणें देऊन व यांचें पत्र घेऊन पुणीयास पोहचाऊन देणें. ह्मणोन कमाविसदार तालुके व माहालनिहाय यांचे नांवें. सनद. १.

रसानगी.

इ० स० १८०९–१०
आशर मयातैन व अलफ.
सवाल १२.

३५।२३० बदल देणें, पुत्रोत्साह खर्च राजश्री बाबासाहेब यांस आश्विन वद्य पंचमी सौम्यवार छ १७ रमजानीं पुत्र जाहला. सबब पुत्रोत्सहनिमित्त ते दिवशींच रात्रौ पुण्यांत मुहूर्तानें येकूणतीस ब्राह्मणांस व दोन सुवासिनी बायकांस शिधा दिल्हा. दुसरे दिवशीं आश्विन वद्य शष्टी गुरुवार छ १८ रमजानापासून मौजे पर्वती तर्फ हवेली प्रांत पुणें येथील रमण्यांत ब्राह्मणांस व ब्राह्मणांच्या बायका व मुलें यांस शिधा कार्तिक शुद्ध प्रतिपदा इंदुवार छ २९ मिनहू पावेतों बारारोज दिल्हा. व कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नाम ठेविलें. ते दिवशीं येक रोज शिधा व दक्षणा रमण्यांत दिल्ही. व जोशी, आश्रित वगैरे ब्राह्मणांस वस्त्रें दिल्ही. त्यांची किंमत व शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाडयापुढें पाण्याचे हेल घातले त्यांस शिधा व साखर, चोळखण वगैरे येक

इ. स. १८१०–११
इह्दिदे अशरमयातैन व अलफ.
सफर १७

---

33. A contract of supplying wood for heatingwater for bathing purposes, in the Shukrawar and Vishrambag palace and in camp, (including the labourers for heating water &c.) was given for Rs. 1300 a year.

A. D. 1808-1809.

34. Janardan Narayen was sent into the country to choose brides. The officers of the various mahals were directed to supply him with any palanquins, horses, or guards that might be required for getting the brides and their relations to Poona.

A, D. 1809-1810.

35. A son was born to the Peshwa on 17th Ramjan. He was named Wamanrao. The expenditure in honour of his birth came to Rs. 178641.

A. D. 1810-11.

रोजा पर्वतीस रमण्यांत, व कांहीं बायकांस चोळखण मात्र पुण्यास दिल्हे, व शहर पुणें व मौजे पर्वती व मौजे भांबवडे येथें घरोघर साखर वाटली. व कारकून व हरकामीं ब्राह्मण पर्वतीस रमण्यांत शिधा वाटावयास व शिध्याचे व दक्षणेचे फेरबंदीस पांचा दरवाजांस व रमण्यांतून होते त्यांस खर्चाबदल व रमण्यांतील शिध्याचे प्रारंभीं व रमण्यांतून ब्राह्मण व हेलकरणी बाहेर निघतेसमयीं चौदा रोजा तोफांचे बार पर्वतीस केले त्यांस मिळोन खर्च जाहला. तो गुजारत चिंतो बामन सिधये कारकून निसबत दप्तर. रसानगी यादी. रुपये.

शिधा येकूण. रुपये.

आश्विन वद्य पंचमी सौम्यवार छ १७ रमजानीं पुत्र जाहला ते दिवशीं रात्रौ पुण्यांत मुहुर्तानें व आश्विन वद्य षष्टि गुरवार छ १८ रमजानापासून कार्तिक शुद्ध प्रतिपदा छ २९ मिनहू पावेतों बारारोजा मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिल्हा. त्या शिध्यास येकंदर असामी.

२८६४५७ ब्राह्मण.
८०२९६ बायका व मुलें.

३६६७५३

यांसी शिधा दररोज असामीस द्यावयाची नेमणूक बितपसील.

१ वजनी, वजन. पक्के

८८॥. तांदूळ आंबेमोहोर साडिक.
८८८९ दाळ तुरी.
८८।९ गहूं.

८८१

१ जिनसांचे ऐवजी खुर्दा टके.

८६ तूप.
८६ साखर.
८३ मीठ व पत्रावळ.
८३ हिंग, जिरे, मिरे, वगैरे.
८३ भाजी व आंबसुल मिळोन.
८३ लांकडे जाळाऊं.

-॥-

१ सुवासिनी बायकांस कुंकु सुगंध तेल घालून लावावयाचें.
१ विडा दर असामीस सुमोर १ यासी साहित्य.

१ पानें विड्याचीं हिरवीं चुनपटी सुद्धां ७.
१ सुपारी फोडीव.
१ लवंग.

१ वेलदोडा.
१ कातगोळ्या २ येकूण.
१ चुना चुनपटींत.

६

१ दक्षणा खुर्दा. टके ३.
१ गंध, केशरी ब्राह्मणांस साखळीनें लावावयाचें.
१ कस्तुरीची अक्षता लावावयाची.

खर्चाबरहुकूम रुपये.

४२५११।~ गल्ला चौशेरी बारुलें मापें केली खंडी. येकूण रुपये.

५९९८८८≡। खुर्दा, दर असामीस तपसील सदरीं लिहिला आहे त्याप्रमाणें टके ·॥३ प्रमाणें आकार २०६२९८॥३ टके पैकीं वजा खुर्दा वाटतेसमयीं वहिवाटीमुळें कमी खर्च जाहला ते ८०॥।६ टके.

बाकी खर्च. २०६२१७॥९ टके.

येकूण रुपये.

४१३।~ गंधाकडे खरेदी सामान येकूण रुपये.

८॥~ सुवासिनी बायकांस कुंकु सुवासिनी बायकांकडून लावविलें त्याची किंमत. रुपये.

१६२३ विड्यांकडे विडे सुमार.

१०४३३४।≈ (वरील रकमांत चूक आहे.)

शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाड्यापुढें पाण्याचे हेल बारा रोज घातले त्यांस कार्तिक शुद्ध द्वितीया भौमवार छ १ सवालीं मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिल्हा ते बायका व मुलें. असामी.

२४९१० बायका.
३०६२ मुलें.

२७९७२

यांसी शिधा दर असामीस द्यावयाची नेमणूक. बितपसील.

१ वजनी. वजन. पक्के.

तांदूळ, डाळ तुरी, गहूं, साखर, मीठ, वगैरे. येकंदर ८८१८६॥.

१ हळदकुंकु.
१ तुपाचे ऐवजीं खुर्दा. टके ८३
१ विडा दर असामीस सुमारे १

खर्चाबरहुकूम. रुपये.

३२१४॥ गल्ला चौशेरी बारुलें मापें केली खंडी. येकूण रुपये.

६२२॥।- साखर दर असामीस वजन. पक्कें ८८८४॥.

२०॥-॥ सुवासिनी बायकांस हळदकुंकू दिल्हें.

त्याची किंमत. रुपये.

४९१॥।- खुर्दा तुपाचे ऐवजीं दर असामीस टके ८३

९२॥।॥ विड्याकडे. विडे. सुमारें २७९७१.

४४४२॥

कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सकाळीं नामकरण करून वामनराव नांव ठेविलें त्या निमित्त ब्राम्हणांस व ब्राम्हणांच्या बायका व मुलें यांस मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा दिला ते असामी.

३०११८ ब्राह्मण.

६८६८ बायका.

३६९८६

यांसी शिधा दर असामीस द्यावयाची नेमणूक. बितपशील.

१ वजनी. वजन. पक्कें.

तांदूळ, दाळ तुरी, गहूं, वगैरे येकंदर ८८१.

१ जिनसांचे ऐवजी खुर्दा टके.

तूप, साखर, भाजी वगैरे ।॥।

१ भोदनदक्षणा खुर्दा. टके. ८३.

१ विडा दर असामीस. सुमारें १.

१ गंध केशरी साखळीनें लावावयाचें.

१ कस्तुरीची अक्षता लावावयाची.

१ सुवासिनी बायकांस कुंकु सुगंध तेल घाडून लावावयाचें.

खर्च बरहुकूम रुपये.

४१८४।- गल्ला चौशरीं बारुलें मापें केली खंडी येकूण रुपये.

३८ गंधाकडे खरेदी सामान केलें, तें ब्राह्मण असामी. किंमत रुपये.

१८≡ कुंकु सुवासिनी बायकांस सुवासिनी बायकांकडून लावविलें त्याची किंमत. रुपये.

५९०१॥- खुर्दा दर असामीस तपसील सदरीं लिहिला आहे त्याप्रमाणें टके ।॥३.

१३७।- विड्याकडे.

१०२६२।=

१०४३३४।≈ बारारोजा शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.
४४४२॥ हेलकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.
१०२६२।≈ नामकरणानिमित्य येक रोजा शिधा दिल्हा त्याची किंमत.

११९०३९।.

कापड येकूण. रुपये.

कार्तिक शुद्ध ७ मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नांव ठेविलें ते समयीं उपाध्ये व शास्त्री व पंडित व वैदिक व जोशी यांस बहुमानांचीं वस्त्रें पेशजीचे दाखल्याअन्वयें दिल्हीं त्यांची किंमत. रुपये. १४१५८≈

पैकीं वजा मखलासी समयीं सूट घातली ते रुपये ८≈ बाकी रुपये. १४१५

शूद्राच्या वगैरे सुवासिनी बायका यांणीं सरकारचे शुक्रवारचे वाड्यापुढें पाण्याचे हेल घातले त्यांस चोळखण दिल्हे ३०७३९ असामी.

कार्तिक शुद्ध सप्तमी मंदवार छ ५ सवालीं नामकरण करून वामनराव नांव ठेविलें त्यानिमित्त ब्राह्मणांस, ब्राह्मणांच्या बायकांस व मुलें यांस मौजे पर्वती येथील रमण्यांत शिधा देऊन दक्षणा दिल्ही ते. ३६९८६ असामी.

येकूण दर असामीस रुपया एक प्रमाणें. ३६९८६ रुपये.

बदल मुशाहिरा. रुपये.

बारा रोजा शिधा दिल्हा सबब कामकाजास माणसें ठेविलीं त्यांस. रुपये.

३७८≈ कामाठी, रमण्यांत पांचा दरवाज्यांवर शिध्याच्या जिनसांचे दास्तानाकडे नेहमीं कामकाजास व रमण्यांतील चौसोपींत दररोज झाडलोट व सारवण करावयास ठेविले त्यांस चाकरी बरहुकूम दिल्हे. रुपये.

३२॥।‹ कोठवळे, पांचा दरवाजांत शिध्यांचे जिनसांचे मापास ठेविले ते आसामी येकूण. रुपये.

२६। ब्राह्मण रोजकरी, केशरी गंध, व कस्तुरीची अक्षता उगाळावयास ठेविले आसामी १० इस्तकबिल छ १८ रमजान तागाईत छ २२ मिनहू रोज ८१२ पैकीं वजा छ १८ रोजीं प्रथम दिवशीं कुंकुवाचें गंध लाविलें रोज ८१, बाकी रोज ८११ येकूण. रुपये.

२॥ सुतार, रमण्यांत पांचा दरवाज्यांवरील सोप्यांचे दागदोजीचें कामकाजास ठेविले.

२ गवंडये, रमण्यांत पांचा दरवाज्यांवरील व चौसोपींतील दागदोजी करावयास ठेविले.

१७॥≈॥ रोशनाईचे कारखान्याकडे हिलाल धरावयास.

१९ लोक, माजी सातारकर रमण्यांत पांचा दरवाज्यावर, व पुण्यांत जिनसांचे दास्तानाचे रखवालीस ठेविले त्यांस.

१७।≡॥ तैवज खर्चाकडे.

५ कामाठिणी व मराठया बायका गव्हांत व डाळींत गदळ होतें तें पाखडून नीट केलें त्यांस मजूरी.

१५९॥।≈

नामकरणानिमित्य शिधा दिल्हा. सबब कामकाजास माणसें ठेविलीं त्यांस. रुपये.

२।- कामाठी, पांचा दरवाज्यांवर झाडलोट व सारवण करावयास व दास्तानाकडे कामकाजास येक रोजा ठेविले आसामी १४.

२ कोठवळे, पांचा दरवाज्यांत दास्तानाकडे गल्लयाचे कामास ठेविले येक रोजा आसामी १०.

२॥ ब्राह्मण, केशरी गंध लावावयास ठेविले.

१८- विड्याकडे.

२। रोशनाईकडे.

१०८=

हेलकरणी बायकांस शिधा.

५। कामाठी असामी येकूण. रुपये.

२ कोठवळे, गल्लयाचे मापास पांचा दरवाजांवर रमण्यांत येक रोज ठेविले असामी १०.

७।

कारकून व हरकामी ब्राह्मण पर्वतीस रमण्यांत शिधा वाटावयास व शिध्याचे व दक्षणेचे जवळचे फेरबंदीस पांचा दरवाज्यांस वगैरे कामकाजास, चौदा दिवस नेहमीं होते. त्यांस खर्चाबद्दल असामी येकूण. २००० रुपये.

तेरीज बदल मुशाहिऱ्याचे. रुपये.

१५९॥।= बारा रोजा शिधा दिल्हा सबब.

१०८= नामकरणानिमित्त शिधा येक रोजा दिल्हा सबब.

७। हेलकरणी बायकांस शिधा येक रोजा दिल्हा सबब.

२००० कारकून व हरकामीं ब्राम्हण यांस खर्चाबदल दिल्हे ते. रुपये.

२१७७।

खेरीज मुशाहिरा. रुपये.

बारा रोजा शिधा दिल्हा त्याबदल रुपये.

७३ खरेदी छपरें.

२९ खरेदी वासे, रमण्यांतील चौसोपींचीं छपरें वाऱ्यानें कांहीं तोललीं, व कांहीं मोडोन जमीनीवर पडलीं, त्यांची दागदोजी करून तींच छपरें वरतीं चढविलीं. त्या खालील वासे, व गज्याचे लफ्याचे वासे, मोडोन जाया जाहले सबब नवीन वासे खरेदी केले.

२॥ सोप्यांतील दरवाज्यावरील सोप्याचे दागदोजीकडे खरेदी जिनस येकूण.

२०० मजुरीखर्च, बढई यांजकडून रमण्यांत दरवाज्याचे वगैरे मेढे, व सोप्यांचीं छपरें घालावयाचे साट बांधविले व आंतील चौसोपींतील छपरें नीट करविलीं त्यां बाबत उक्ते दिल्हे. रुपये,

१८॥-। बाजे खर्च.
४३॥≡॥। पोटखर्च. रुपये.
१९॥≡ बटाखर्च, खरेदी पावल्या सुमारें १५८६५.
३ नवस खर्च, शिध्याचा समारंभ सिद्धीस यथास्थित जावा ह्मणोन श्रीदेवास पेढे वाटावयाचा नवस केला होता. रुपये.
३१८= दप्तरखर्च. रुपये.
२३७॥= रोशनाई खर्च. रुपये.
७८१। हमाली, शिध्याचे जिन्नस वगैरे पुण्याहून रमण्यांत हमाल यांजकडून नेवविले त्यांस देणें हमाल. रुपये
४३॥ भाडे खर्च. रुपये.
४१४।= नुकसानखर्च. रुपये.
१४८= ब्राह्मणांचे शिध्याचे प्रारंभीं व ब्राह्मण सोडावयाचे समयीं पर्वतीस तोफा सोडिल्या ते बार सुमारें.

१९२७॥
नामकरणानिमित्त येक रोजा शिधा दिल्हा त्याबद्दल. रुपये.
२४॥≡ रोशनाई खर्च. रुपये.
२॥= पोटखर्च. रुपये.
८॥ दप्तर खर्च.
१ खरेदी सुतळी, ठिक्यांचीं तोंडें शिवावयास व किरकोळ दागदोजीस वगैरे वजन पक्के एकूण ८८२॥. रुपये.
६। भाडेंखर्च. रुपये.
-।- बटाखर्च.
९० मजुरीखर्च. रुपये.

१३३।=
हेलकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल रुपये.
५८ रोशनाईखर्च. रुपये.
९ दप्तरखर्च. रुपये.
८१ हमालीखर्च. रुपये.
१ खरेदी सुतळी, ठिक्यांचीं तोंडें शिवावयास व किरकोळ. दागदोजीस वगैरे
१।- खरेदी दोरा वळीव, चोळखणांचे भोत शिवावयास.
।= भाडेंखर्च.
८८५।≡ नुकसानखर्च. रुपये.

१०१६८=

तेरीज खेरीज मुशाहिऱ्याचें. रुपये.

१९२७॥ बारा रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

१३३।= नामकरणानिमित्त येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

१०३६८= हेलकरणी बायकांस येक रोजा शिधा दिल्हा त्याबदल. रुपये.

३०९७

शहर पुण्यांत, पर्वतीस, व भांबवड्यास, देवास व समस्त लोकांचे घरोघर साकर वाटली त्यास. रुपये.

६२५९। साखर धुवा वजन पक्के खंडी १५॥२॥।८॥

२५॥ खारवे साखर ठेवावयास गोण्या केल्या त्या सुमारे १२ दर २८= प्रमाणें.

३६॥≡ हमाली साकर वाण्याचे दुकानांतून हलवाई याचे दुकानीं धुवावयास आणिली.

६३२१।≡

तेरीज खर्चाचें. रुपये.

११९०३९। शिधा दिल्हा त्याची किंमत. रुपये.

११०२०८- कापड दिल्हें त्याची किंमत. रुपये.

३६९८६ दक्षणा ब्राह्मणांस नामकरणानिमित्त दिल्ही ते. रुपये.

२१७७। बदल मुशाहिरा.

३०९७ खेरीज मुशाहिरा. रुपये.

६३२१।≡ साखर वाटली त्याबद्दल.

१७८६४१

येकलक्ष अठ्याहत्तर हजार सहाशें येकेचाळीस रुपये, जकात प्रांत कल्याण भिवंडी निसबत बाळकृष्ण आबाजी याजकडे सालमजकूरचे रसदेचा पोते चालीच्या बब्यासुद्धां ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला, त्यांपैकीं व खाशांकडील अंतस्था बाबत, साल गुदस्ताप्रमाणें सालमजकूरचे येणें ते.

७१६४१ रसदेपैकीं रुपये.

१०७००० खाशांकडील अंतस्थाबाबत.

१७८६४१

३६।२४१ बदल देणें. उत्तरकार्य खर्च, मातुश्री येश्वदाबाई यांस बरें वाटत नव्हतें. त्यांस पौष वद्य पंचमी इंदुवासर शके १७३३ प्रमोद नाम संवत्सरे छ १८ जिल्हेज सालगुदस्त सन इहिदें अशर मयातैनांत किल्ले रायगड येथें देवआज्ञा जाहली. त्यांची क्रिया वेदमूर्ति

इ० स० १८११।१२
इसने, अशर मयातैन व अलफ
जमादिलावल २३

36. Yeshwadabai died at fort Raygad on 18th Jilhej of the preceding year. Her bones were brought to Poona, where the last rites were performed. The total expenditure on account of these rites came to Rs. 38053.

A. D. 1811-12.

चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये यांजकडून कसबे पुणें येथें करविली. त्यास व नित्योदकुंभ, व दीपदानें, व मासिकनिवृत्तिसुद्धां इस्तकाबिल छ १८ जिल्हेज सालगुदस्त, सन इहिदे अशर मयातैन, तागाईत छ १७ जिल्हेज पौष वद्य चतुर्थी सालमजकूर सन इसन्ने अशर मयातैन पावेतों खर्च जाहला. तो विद्यमान गणेशभट्ट कर्वे उपाध्ये व बाबुराव गणेश कात्रे फडणीस व चिंतो वामन सिधये कारकुन निसबत दप्तर जनार्दन कोंडदेव गाडगीळ पोतनीस. रुपये.

अस्थि आणावयासी भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये, व बाळाजी मल्हार बापट, यांस पाठविले त्यांचे विद्यमानें खर्च झाला तो. रुपये.

३ वाटेस पोटखर्च. असामी ६.

४ मजुरीखर्च. अस्थि आणावयास ब्राह्मण असामी २ ठेविले त्यांस दर असामीस रुपये २ प्रमाणें. रुपये.

७

सातवे दिवशीं अस्थीस मंत्राग्नि देऊन क्रियेस आरंभ करविला त्या दिवसापासून नऊ दिवस पर्यंत.

८८=॥। भांडीं तांबें पितळीं.

८ कापड.

२॥। सोनें, अस्थि दहनसमयीं चितेंत घालावयास तुकडे सुमारी १० येकून वजन मासे ८॥ येकूण दर १।= प्रमाणें. रुपये.

॥।-। किरकोळ.

१ क्षौराबद्दल देणें न्हावी यास, सातवे दिवशीं चिंतामण दीक्षित यांचें करविलें यास रुपये.

२८= गोवऱ्या व लांकडें.

३ मजुरी, रक्षा भरोन तुळापुरास पाठविली त्याबरोबर ब्राह्मण असामी २ येकूण रु.

॥= पत्रावळी, मडकीं, वगैरे किरकोळ रुपये.

२६॥

दहावे दिवशीं नग्न प्रच्छादन श्राद्ध केलें त्यास रुपये.

२। पातळ, नग्न वस्त्रास सनंग १. रुपये.

॥- तूप, दानाकडे व पिंडाकडें वजन ८८१८९.

१८=उदकुंभास तांबें सुमारी २ वजन पक्कें ८८॥८॥ येकूण दर २ प्रमाणें.

१। सोनें, वजन मासा १ येकूण. रुपये.

।= वाटी काशाची वजन पक्कें ८८।- येकूण.

-।- रुपेंभारंभार.

८- लोखंड.

-।- तेलवजन.
-॥= जोडाचर्मी.
२॥ नक्त.
-।ॽ पिंडास.
८-। हळद, मडकी वगैरे.
१ क्षौराबद्दल, देणें न्हावी यांस. रुपये.
८-॥। फडकें, पताकांस.

१०॥।

अकरावे दिवशीं.

१८८८≡॥। वृषोत्सर्ग.
२५४॥-॥। दशदानें.
१९६॥= वैतरणी गोप्रदान देणें.
१२३८≡। पापक्षयार्थ गोप्रदान देणें.
१३३॥-॥। ऋण धेनु गोप्रदान देणें.
७५२॥।=। उपदानें.
३०९॥= पददानें १३ येकूण ब्राह्मण असामी १३.
२०८८॥≡ शैय्यादान देणें. रुपये.
१२५७।·। शिबिकादान देणें. रुपये.
७०७॥।·॥। अश्वदान देणें. रुपये.
९७९॥।=। रथ बैलांचा, दान देणें. रुपये.
४५३७॥=। गजदान देणें. रुपये.
२३९॥।=॥। दासीदान देणें. रुपये.
१३२२॥= महिकोदिष्टास. रुपये.
१३७॥·॥ रुद्रगणश्राद्धें अमान्नद्वारां केलीं त्यांस. रुपये.
१०६॥।= वसुगणश्राद्धें अमान्नद्वारां केलीं त्यांस ब्राह्मण असामी ८ येकूण रुपये.
९०० गृहनिष्क्रय, नक्त देणें.
२५० वर्षासन नक्त.
४० दीप, संवत्सरपर्यंत देणें.
१३।≡ अमान्ने महादानाचे ब्राह्मणांस दिल्हीं तीं. सुमारें २७.
१॥≡ मिठाई, दानाचे ब्राह्मणांस दिल्ही, तीं दानें.
॥- यज्ञोपवितें दर दानास सुमारीं.
४॥।≡ हार, तुरे, व गजरे, दानाचे ब्राह्मणांस दिल्हे ते.

१४१४७॥·॥

बारावे दिवशीं. रुपये.

२०६।- आद्यमासिकादि श्राद्धें सपिंडी अधिकारार्थ अमान्नद्वारा केलीं. त्यांस ब्राह्मण असामी १६ येकूण.

८८ अंतरदशाह श्राद्धें अमान्नद्वारा केलीं त्यांस रुपये.

११७१।।।=।।। सपिंडी.

१०१ मोक्षधेनु देणें समस्त उपाध्ये.

७८।।।- पाथेय श्राद्धें अमान्नद्वारा केलीं त्यांस. रुपये.

३२५ क्रिया सांगणारां व दर्भ देणारा यांस. रुपये.

४०।=। अमान्ने ब्राह्मणांस दिल्हीं तें. असामी.

७६१७ भूयसि सदाशिवपेठेंत सरकारची पागा बळवंतराव थोरात यांजकडील आहे, त्या पागेंत दक्षणा वाटली ते ब्राह्मण असामी ७६१७, दर असामीस रुपया १ प्रमाणें. रुपये.

९६२८।।

तेरावे दिवशीं. रुपये.

३४।। शांतोदक केलें त्यास नक्त. रुपये.

२०५ दुखोटा देणें, चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये यांस क्रिया केली सबब. रुपये.

१।। देवदर्शनास गेले तेथें देवांस दक्षणा ठेवली ते. रुपये.

१००० ब्राह्मणभोजन शनवारचे थोरले वाडयांत केलें त्यास. रुपये.

१९२० प्रायश्चित्तार्थ कृच्छ्रें गोनिष्क्रयद्वारा केलीं, तीं दर १५ प्रमाणें. रुपये.

८७ भूयसि शांतोदक समयीं शिष्ट ब्राह्मण जवळ होते त्यांस, ब्राह्मण असामी ८७ दर १ प्रमाणें.

२८ खासगीपैकीं पातळें होतीं तीं ब्राह्मणांस दिल्हीं. त्यांस दक्षणा वगैरे ब्राह्मण असामी ५.

३२७६ एकुण. रुपये.

किरकोळ खर्च. रुपये.

१५।।=।।। एकोदिष्ट, व सपिंडीकडे भोजन खर्च वगैरे. रुपये.

९ केळींची पानें, विडयाकडे व अमान्नास व सपिंडीस वगैरे सळई पंचोत्री वजाकरून डांगा सुमारी ३०० दर शेंकडा रुपये ३ प्रमाणें रुपये.

४।= कागददस्ते लिहिण्यास व शाई मिळोन. रुपये.

८।।= पानें विड्यांचीं, महादानाचे ब्राह्मणांकडे व सपिंडीकडे वगैरे विडयास रुपये.

७।।=।।। बुरुडकाम.

२३८॥।-॥ मजूरी. रुपये.
३॥ तेल.
-।-॥। भांड्यास कल्हई करविली त्यास रुपये.
३ गुरांकडे व घोडयांकडे. रुपये.
१ पत्रावळी पळसाच्या किरकोळ खर्चाकडे सळई पंचोत्री वजाकरून सुमारी ४०० येकूण.
३ देणें न्हावी येकोदिष्ट व सपिंडीचे ब्राह्मणांचीं क्षौरें करविलीं त्याबद्दल ६.

२९४॥।≡॥। येकूण. रु.

उदकुंभ व दीपदानें ब्राम्हणांस भोजनास सरकारचे शनवारचे वाड्यांत घालून वर्ष श्राद्धपर्यंत दिल्हीं. त्यांस मुदत माहे १२ पैकीं वजा रोज.

८१० आशौच्याचे.
८२ अकरावा, बारावा, मिळोन.
८६ येकुणातिसे.

८१८

बाकी मुदत माहे ११८१२ येकूण. रुपये.
१५५४॥।= उदकुंभ व दक्षणा मिळोन.
३२०९ दीपदानें व दक्षणा.

४७६३॥।=

मासिक श्राद्धें. शनवारचे सरकारचे वाड्यांत ब्राह्मणांस भोजनास घालून केलीं त्यांस रुपये.

८४ माघ वद्य २ सत्ताविसावें दिवशीं ब्राह्मण ५ व पिंड १ एकूण ६ येकूण रुपये.
८४।= माघ वद्य ५ तिसावें दिवशीं ब्राह्मण ५ व पिंड १ येकूण ६ रुपये.
८४।= फाल्गून शुद्ध ९ त्रय पक्षीक सदर्हूप्रमाणें.
८४।= चैत्र वा। ९.
३७७॥≡॥ वैशाख वद्य १ मासिक निवृत्ति. रुपये.

७९८॥-॥ (बेरजेंत चूक आहे).
१०० भरणी श्राद्ध भाद्रपद वद्य ५ मंदवारीं केलें. त्यांस. रुपये.

८९८॥-॥

३३०५३॥≡॥।

पैकीं, वजा सूट मखलासीसमयीं. रुपये ॥≡॥।.
बाकी रुपये ३३०५३.
तेहतीस हजार त्रेपन देविले. रुपये.

३१६३ तसलमात, गणेशभट कर्वे उपाध्ये यांजकडे मातुश्री येश्वदाबाई कैलासवासीं जाहली त्यांचे वर्षश्राद्धपर्यंत दीपदानें ब्राह्मणांस भोजनास घालून द्यावयाचीं, त्यांचे खर्चाबद्दल २९ सफर सन इहिदे अशर मयातैनांत मशारनिल्हे यांचे नांवें तसलमातीस खर्च पडले आहेत. ते जमा धरून देविले. रुपये.

२९८९० इजाफत, राजश्री बाबासाहेब यांजकडील खासगीपैकीं त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार यांचे गुजारतीनें सन इहिदे अशर मयातैनांत पावले ते रुपये.

३३०५३

राजकीय. (ब) इतर माहिती.

(२) पेशवे, (ब) सवाईमाधवराव.

इ. स. १७९५।९६.
सीत तिसेन मया व अलफ, साबान २९

३७।६ उत्तरकार्य खर्च, कैलासवासी माधवराव साहेब यांचें उत्तरकार्य केलें. त्यास विद्यमान रामराव नारायण देशमूख इस्तकबिल छ १३ रबिलाखर, आश्विन शुद्ध चतुर्दशी मंगळवार, ते छ २५ मिनहू अश्विन वद्य द्वादशी रविवार मुदत रोज ८१३, एकूण खर्च जाहला. तो गुजारत मोरो जनार्दन वांकनीस बरहुकूम यादी. रुपये.

५६।- छ १३ रबिलाखर, अश्विन शुद्ध १४ मंगळवार अस्तमानीं प्राणोत्क्रमण जाहलें. त्यास प्रथम दिवशीं. रुपये.

१० छ १४ रबिलाखर दुसरे दिवशीं, व २२ रबिलाखर दहावे दिवशीं क्षौर करविलें त्यास.

२६११३।- छ २३ रबिलाखर आकरावे दिवशीं.

२३९५॥- छ २४ रबिलाखर बारावे दिवशीं.

३९४॥- छ २५ रबिलाखर तेरावे दिवशीं.

३६०।- छ २६ रबिलाखर मासिकनिवृत्ति.

४२७। छ २७ रबिलाखर वर्षाचे उदकुंभ वगैरे.

१५१५८≡ छ ३० रबिलाखर दीपसमया वगैरे दानें.

१८३२१ इतर खर्च भूयसि ब्राह्मणांस वगैरे.

४९५९३॥-

तपशील.

२५६३।≡ नाणें मोहरा पुतळ्या वगैरे.

४७०३०।- नक्त.

४९५९३॥-

A. D. 1795-96.

37. The Peshwa, Sawai Madhavrao died in the evening of 13th of Rabilakhar, the 14th of Ashwin Shudha. The total amount for his last rites amounted to Rs. 49593 As. 12.

राजकीय (व) इतर माहिती.

(२) पेशवे, (क) चिमाजी आपा.

इ० स० १७९५।९६
सीत तिसेन मया व अलफ,
जिलकाद १८

३८।११ छ, मजकुरीं प्रातःकाळीं, नव घटका दिवसास चिमाजीआपा यांस प्रधानकीचीं वस्त्रें आलीं असेत.

इ० स० १७९५।९६
सीत तिसेन मया व अलफ
जिलकाद १८

३९।१२ कमावीस आहेर. राजश्री रावसाहेब यांचे दत्तविधान करून मातुश्री यशोदाबाई यांणीं घेतलें. सबब लोकांनीं आहेर केले ते जमा. सनगें, किंमत रुपये.

२०४॥	काशीराव गणपत रास्ते.
३६४॥	परशराम रामचंद्र.
४८५	तुकोजी होळकर.
४३६	दौलतराव शिंदे.
३१३॥	गोविंदराव गायकवाड.
३२।	भास्कर महादेव जोशी.
६२॥।	गोपाळ धोंडदेव भोगावकर.
११०८=	नारायणराव व्यंकटेश घोरपडे.
१९८	मालोजी घोरपडे.
२९९	पांडुरंग बाबुराव.
६४॥।	भिवराव जयवंत पानसी.
१५१॥	संभाजी हिंदुराव घोरपडे.
२६॥।	अनंदराव जीवाजी लिमये.
२१	त्रिंबकराव गंगाधर रेटरेकर.
७२	जानराव समशेर सरंजामी.
१७१॥	नारो निळकंठ मजमदार.
३०४॥	रघुनाथराव निळकंठराव पटवर्धन.
२५॥	माधवराव कृष्ण पानसी.
२१६॥।	सखाराम येशवंत पानसी.

A. D. 1795-96.

38. The clothes of Peshwaship for Chimaji Appa were received from Satara, on the morning of this date. The clothes were brought by Trimbakrao Amruteshwar Pethe who had been to Satara for the purpose.

A. D. 1795-96.

39. Lady Yeshwadabai having adopted Chimaji Appa, as his son. presents were made by the various officers of the state, including Balaji Janardan, Raste, Purandhare, Holkai, Scindia, Gaikwad, &c.

९६॥	हरिभक्ति साहुकार.
१६०॥।	रामराव कृष्ण बावडेकर.
४२८=	विष्णु रघुनाथ पानसी.
७३॥	विठ्ठल मल्हार पुरंदरे.
८०	निळकंठ महादेव पुरंदरे.
१८२॥	त्रिंबकराव महिपत पुरंदरे.
६९६॥।	बाळाजी जनार्दन फडणीस.
८८॥	बहिरो रघुनाथ मेहेंदळे.
५५।	त्रिंबकराव जनार्दन.
५२॥।	विठ्ठलराम वांकनीस.
६४॥	मोरो नारायण बाखरे.
५७॥=	आबाजी बल्लाळ ठोसर.
१२१।	येशवंत आनंदराव कानिटकर.
९५॥।	गणेश कृष्ण गोखले.
७४	गोपाळराव राम पंडित.
१९६॥	आनंदराव भिकाजी रास्ते.
१९९।	रामचंद्र हरि फडके.
७६	नारो शिवराम खासगी.
११४॥	आनंदराव शिवराम लेले.
५५	गणपत आनंदराव मेहेंदळे.
२१२	समशेरबहाद्दर.
५४।	हारि चिंतामण दिक्षित.
१०७॥=	माधवराव रामचंद्र.
२१५	राघो विश्वनाथ गोडबोले.
२९७	चिंतामणराव पांडुरंग.
५६	मिरा महात.
४६॥	माधवराव भापकर.
७४॥	रुस्तुमराव पांढरे.
११०	मुसा नारज गाडदी.
१०९	गमाजी निंबाळकर पागा.
३०६॥।	देवराव महादेव हिंगणें.
१०४।	हणमंतराव दरेकर सरलष्कर.
७६॥	रामचंद्र गणेश कठोरेकर.

४७॥	सखोजी काटे पागा.
४७॥।	हैबतसिंग पागा.
४८॥	हैबतराव शंकर पागा.
५५	रामराव मल्हार मांडवगणें.
७६	भाईदास मांडवीकर.
२७॥	गोपाळराव रघुनाथ.
५३॥	शिवाजी निंबाळकर पागा.
९१॥।	आनंदराव आबाजी प्रतीनिधी, विशाळगडकर.
३८८	फतेसिंग भोसले.
३३	नारो कृष्ण देव.
११।	रंगो कोन्हेर येकबोटें.
५७॥	कृष्णासिंग पागा.
४३।	गणेश हरी पागा.
४४॥	शाहागीरखान रोहिले.
४३॥।–	विठ्ठलराव मोरेश्वर गोळे.
४१	दिनकर मल्हार कानिटकर.
१२१।	निळकंराव रामचंद्र पागा.
३०॥	बापुजी कृष्ण बापट.
३८	हरि इच्छाराम पागा.
४०	गंगाधर गणेश पागा.
४३॥।	येशवंतराव त्रिंबक.
१०४।	नारो बाबुराव वैद्य.
९६	सयाजी भापकर.
३८॥	रामचंद्र नारायण.
४६	व्यंकटराव रघुनाथ.
१२९	सदाशिव रंगनाथ वानवळे.
४०।	हैबतराव पलांडे पागा.
६३	बळवंतराव नागनाथ कुगांवकर.
२८	विनायकराव निळकंठराव रास्ते.
६२॥।	बळवंत सुबराव पागा.
१४२॥	महिपतराव त्रिंबक चिटनीस.
१९९॥	श्रीधर लक्ष्मण वकील.

१८५ कृष्णाजी माधवराव.
११९ रामचंद्र जाधव करडीकर.
१११ रामचंद्र आबाजी वानवळे.
४३॥। माहादशेट वीरकर.
३९॥ सिदापाशेट वीरकर.
७२॥ धोंडशेट वीरकर.
१९८। गोविंदराव बाजी जोशी.
७४ खंडेराव बल्लाळ.
३६६ गोविंदराव निलकंठ खासगी.
९७॥ माधवराव त्रिंबक दीक्षित.
२८९ अजिमत दौले.
१०४॥। न्यामतखान तासगांवकर.
१०८॥ केदारजी घोरपडे.
४३ नरहर गोपाळ जोशी.
८५ त्रिंबकराव नारायण परचुरे.
७०॥ नारो शिवराम चक्रदेव.
४६ साबाजी नाईक निंबाळकर.
७६॥᐀ महिपतराव भवानी.
६७॥ अमृतराव केशव थत्ते.
१८॥ गणपतराव पटवर्धन.
२२१॥ नरसिंह खंडेराव.
१२॥ केशवराव बापुजी मोकाशी.
९३॥। हैबतराव व्यंकटेश.
७९॥≡ विठ्ठल गोरक्ष वकील.
२०३ गोविंदराव भगवंत पिंगळे.
६९।= आनंदराव नाईक निंबाळकर-
३३॥।= माहादाजी बल्लाळ साठे.
४४॥ माहादाजी बल्लाळ गुरुजी.
४९ दादो हरि मराठे.
३३। पाराशर दादाजी.
३३॥। पांडुरंग विठ्ठल.
५७॥ सदाशिव केशव दात्ये.
५४॥।= लक्ष्मणराव नागनाथ वांबोरीकर.

६६	काशी बल्लाळ गाडदी.
९३॥	विनायक नारायण परांजपे.
२८९॥	निळकंठ आंबुराव.
५३॥	जगन्नाथ रघुनाथ पागा.
३३॥।	विश्वासराव नारायण भावें.
१९२	आमरसिंग जाधवराव.
३२१	रंगराव त्रिंबक राजेबहादर.
१९४	खंडेराव त्रिंबक वाढेकर.
४८।≡	हणमंतराव जाधव भुईजकर.
६६	शामराव नारायण पोतनीस.
१७६॥	रघुनाथराव बळवंत.
५९॥।=	बळवंत बाबुराव ठाकूर.
४८॥	रामचंद्र महादेव परांजपे.
८८॥	माहादाजी नाईक निंबाळकर.
७४॥	लालाफत्तेचंद नी॥पारसनीस.
११॥।	येशवंतराव मचाले.
१२७	गणपत माधवराव.
२०	बळवंतराव थोरात.
६२॥	कृष्णराव रामचंद्र.
१२७॥	बाबुराव वकील.
८६॥।	संभाजी जाधवराव.
६३	नारायणराव यादव भागवत.
१७९	मलोजी जाधवराव.
७९॥।-	महिपतराव कृष्ण.
९३॥	कृष्णाजी बहिरव थथे.
७५।	बापूजी बाबाजी.
१२२॥	बळवंतराव आपाजी.
१२८॥-	सिद्धेश्वर महिपतराव बिनी.
४३॥।	गुलजारखान ठोके.
२७९॥	नारोजी जाधवराव.
१०७।≡	कल्याणराव कवडे.
९३॥।=	खंडो अनंत वर्तक.
११९।	बळवंराव गोविंद वांकडे.

२९ नारायणराव सर्वोत्तम हशमनीस.
२३ मेघःशाम बल्लाळ.
७९।।। कृष्णराव महिपत साठे.
६४।। कृष्णराव बळवंत मेहेंदळे.
२०।। नारो कृष्ण भिडे.
३०।। नांव लागणें.
२।।।= चोळखण.
.।= बळवंतराव आपाजी.
.।।. रामचंद्र शंकर.
.।।. मनुबाई गोखली.
.।= महादेव दीक्षित आपटे.
.।= भास्कर दीक्षित कर्वे.
.।. जनार्दन आपाजी.

२।।।=

१७०१६।=

तपसील.

१९६८।	तिवटें.	१४८
३३४७।।।=	जाफरखानी.	१०३
७१६।	शेले साधे.	७४
३०१९।।	दुपेटे पैकीं.	३७
१४०४।।।	लुगडीं पैकीं.	२०
५१६	साड्या शेलारी.	१७
१३८४।।।=	लुगडीं.	९८
६४४	पातळें जरी.	१४
२७	पातळें साधी.	२
१५१।।।	दुपेटे छिटी बऱ्हाणपुरी.	४
७०	तिवटें छिटी बऱ्हाणपुरी.	३
१४७।।	जामेवार छिटी बऱ्हाणपुरी.	७
२६५।।=	चोळखण.	१६१
६८।।।	पातळ छिटी बऱ्हाणपुरी.	१
७५।।	गोलदार.	५
५०	तुबा किनखापी.	१

१००	झगा छिटी भस्मी.	१
७३९॥	दुपेटे छिटी भस्मी.	३
२४०	तिवटें छिटी भस्मी.	३
२०६१।	किनखाप.	३८।'
२०	जाफरखानी छिटी, बऱ्हाणपुरी.	॥'
१७०१६।=	(वरील रकमांत चूक आहे.)	७४०॥।'

जमा, जामदारखाना.

४०।५६ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांस तालुके आमदाबाद येथील सुभा सांगितला. सबब मुहुर्त करून वस्त्रें दिल्हीं. तीं गुजारत रामजी खीजमतगार, सनगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७-९८
समान तिसेन मया व अलफ, साबान ९

३९॥	तिवट पैठणी.	१	
३९८॥	दुपेटा पैठणी.	१	
१२५	किनखाप लाल भरगची.	१	
४०	महमुद्या धुवट.	२	दर २०
६०३		५	

जमा, जामदारखाना.

४१।५७ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांसी बाबद. केसो कृष्ण दातार याजवळ तालुके आमदाबाद येथील मुतालिकीचे शिक्के दिल्हे. ते समयीं कोथरूडचे बागांत दिल्हीं. तीं गुजारत रामजी खीजमतगार सनगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७-९८
समान तिसेन मया व अलफ, साबान १८

१००	तिवट छिटी बऱ्हाणपुरी.	१
४००	दुपेटा छिटी बऱ्हाणपुरी.	१
२२	महमुद्या धुवट.	२
७५	किनखाप.	॥'
५९७		४॥

४२।२४० बदल देणें, लग्नखर्च. राजश्री चिमणाजी रघुनाथ यांस कुलबाब पडलें पानसुद्धां सालीना दोन लक्ष रुपये खर्चाची नेमणूक केली. त्यांत लग्न, कार्य, प्रयोजन, वगैरे जो खर्च होईल तो त्यांनीं करावा. दोन लक्ष रुपयांखेरीज सरकारांतून कांहीं द्यावयाचें नाहीं. परंतु

इ. स. १८११-१२
इसन्ने अशर मयातैन व अलफ. जमादिलावल २०

A. D. 1797-98. 40. Appasaheb was appointed to the Subha of Amdabad.

A. D. 1797-98. 41. Keso Krishna Datar was appointed Appasaheb's Mutalik.

A. D. 1811-12. 42. Chimnaji Raghunath was given Rs. 2 Lacs per annum, for all his expenses special and ordinary. He hesitated to marry a second time, and appeared to be getting indifferent to worldly matters. As it was thought desirable that he should have

चिमणाजी रघुनाथ यांचा आपलें दुसरें लग्न करण्याविषयीं अनमान दिसला, व प्रपंचास उदास जाहले. त्यांची वंशवृद्धि असावी. याजकरितां सरकारांतून येक वेळ लग्न करावें. यापुढें लग्न कार्यें वगैरे प्रयोजनें त्यांजकडे जाहल्यास सरकारांतून कांहीं येक त्यांस देऊं नये. दोन लक्ष रुपये त्यांस नेमणूक सालीना केली आहे. त्यांत त्यांनीं करावीं. याप्रमाणें अलपिष्टिन (एल्फिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांचे विद्यमानें ठरोन मौजें कोपरगांव परगणें कुंभारी येथील बेटांत वैशाख शुद्ध दशमी सौम्यवारीं, छ ८ जमादिलावलीं, शके १७३४ अंगिरा नाम संवत्सरीं सालमजकुरीं वीस घटका रात्रीस चिमणाजी रघुनाथ यांचें लग्न केलें त्यास खर्च जाहला तो गुजारत त्रिंबकजी डेंगळे. रुपये.

वैशाख शुद्ध तृतीया सौम्यवासर, छ १ जमादिलावलीं, मंडप मुहूर्तानें घालावयाचे प्रारंभीं स्तंभपूजन केलें. त्यास विद्यमान गणेशभट कर्वे उपाध्ये, व चिंतो वामन सिधये कारकून निसबत दप्तर. रुपये.

१ घरचे देवापुढें.
१ श्रीगणपतीस.
१ स्तंभास.
-॥- पृथ्वीस.
-॥- शेषास.
-॥- सूर्यास.
-॥- विश्वकर्म्याचे अयुधांस.
४ ॥ भूयासि दक्षणा, ब्राह्मण असामी ९ दर -॥- प्रमाणें.

९॥

पैकीं वजा, बोहल्याचे यादींत खाशांकडील खाजगीपैकीं रुपये.
.॥.

बाकी. रुपये.
९

वैशाख शु. षष्टी मंदवार. छ ४ जमादिलावल. रुपये.
१०८८≡॥ अक्षतेचे प्रारंभ समयीं.
४।=॥ घाणा भरला व उडीदास तेल लाविलें त्यास.
१३४०८≡ गडंगनेर घरचा केला त्यास. रुपये.

१४५२॥।-

पैकीं वजा, ऐन जिनसांचे किंमतीचे यादीचे बेरजेस कमी पडला, तो रुपया १. बाकी १४५१॥।- रुपये.

some projeny, it was settled through Mr. Elphinston that the Peshwa should bear the expenses of Chimnaji Raghunath's marriage and that the latter should make no future demand upon the Peshwa in addition to the fixed allowance on any account. The expenses of the marriage amounted to Rs. 12521 and were a special case paid by the Peshwa. The marriage took place at Kopergaum on the 8th of Jamadilawal.

वैशाख शुद्ध नवमी भोमवासरीं, छ ७ जमादिलावलीं, विनायकशांति केली.
त्यास बरहुकूम यादी. रुपये.

२॥। पुण्याहवाचन केलें त्यास रुपये.
६७। शांतिकडे.
१४८=॥ ऐन जीनसांची किंमत. रुपये.

८४८=॥।-

वैशाख शुद्ध दशमी सौम्यवासर, छ ८ जमादिलावल, लग्नाचे दिवशीं.

१९। घाणा भरला ते समयीं.
९९३।-। पुण्याहवाचन समयीं.
३३॥। सुवासिनी भोजनास घातल्या.
३८= सीमांतपूजनास, सोयरे वराची पूजा करावयास आले, त समयीं भूयसि ब्राह्मणांस दिल्ही त्यास. रुपये.
३२९। तेलफळ, सोयरे यांजकडे नेलें त्यास. रुपये.
२००। वाग्निश्चय, सोयऱ्याचे मंडपीं केला. त्यास विद्यमान राजश्री बाबासाहेब.
२५॥। रुखवत सोयऱ्याकडून आलें तें समयीं.
६८५।≡॥। वर प्रस्थान, वधुगृहीं जातें समयीं.
३०३४८- लग्नास सोयऱ्याचे मंडपीं गेल्यावर तेथें खर्च जाहला तो.
३॥।-॥ हात दिव्यास.
२८।-॥ पुण्याहवाचन, व सीमांतपूजन, व आहेर घेऊन लोक आले तेव्हां विडे दिल्हे त्यांस वगैरे.
५ तोरणें कागदीं रंगीत सुमारीं. २.
३॥=॥। कित्ता नक्त खर्च. रुपये.

५३६५८॥।-

पैकीं वजा कमी यादीस पडले. रुपये ५.

बाकी. ५३६०८॥।-

वैशाख शुद्ध येकादशी छ १० जमादिलावल, भृगुवासरें.

२०६८= सूनमुखसमयीं. रुपये.
२॥ विद्यमान राजश्री आपासाहेब, अग्नीस व देवांस.

वैशाख शुद्ध १२ मंदवासरे छ ११ जमादिलावल. रुपये.

२९९।≡॥ नवग्रह शांति केली त्यांस.
१९९०॥।=॥ साडे रात्रौ पंधरा घटकांस जाहलें, त्यास वगैरे.
३६॥।= विडे कुलपी, व केळीच्या डांगा मिळोन. रुपये.

२३२३।

वैशाख शुद्ध १३ भानुवासर, छ १२ जमादिलावल. रुपये.

८४॥≡॥ देवकोथापन केलें त्यास. रुपये.

५० वेदशास्त्री देव पालशेतकर, सोयऱ्याकडील उपाध्ये यांस पाठवणीबद्दल.

१८।≡। बोडण भरलें त्यांस.

६९३॥। वरात वाड्यांत आलीयावर पडभोजनास सोयरे मंडळी बोलाविली त्यास.

२८- राजश्री आपासाहेब यांस अभ्यंगास सामान.

४० माधवराव अनंत रास्ते यांनीं पुण्याहून आहेर कारकुनाबरोबर पाठविला. त्यास रास्ते यांस फेर अहेराचीं वस्त्रें अहेराचे सनंगांपैकीं मशारनिल्हेचे कारकुनाजवळ देऊन त्या जखेरीज कारकून यास वस्त्रें दिल्हीं तीं. सनंगें.

१० वोवाळणी; उष्टी हळद सोयऱ्याकडून आली ते समयीं दिल्ही. ते पुतळ्या ताटें येकूण दर ५ प्रमाणें.

१४ लक्ष्मीपूजन समयीं सरकार वाड्यांत नवरेमुलीस वस्त्रें दिल्हीं. तें समयीं सोयऱ्यांकडील उपाध्यास वस्त्रें द्यावीं, तीं पावलीं नव्हतीं सबब छ. मजकुरीं दिल्हीं तें सनंगें.

वैशाख शुद्ध १४ इंदुवासर, छ १३ जमादिलावल, बरहुकूम यादी

१॥।≡ ओटीस सामान, मांडवपरतनाचे आमंत्रणास बायका आल्या सबब.

२॥ कागद दस्ते जुन्नरी, लिहिण्याकडे सुमारी ५ दर -॥- प्रमाणें.

३ खाद्या, पासोड्या, विड्याचे रुमालास वगैरे सनंगें २ दर १॥ प्रमाणें. रुपये.

७।≡

प्रत. यादी दोन येकूण रुपये.

२०४॥= प्रत यादी १ येकूण.

५०० अतसबाजी नळे वगैरे रुपराम चौधरी याजकडून कराविले त्यास. रुपये.

७०४॥=

१५०० गुजारत जनार्दन नारायण नऱ्हेकर, भोजनखर्च गडंगनेरापासून मांडवपरतनापर्यंत कुलभोजन खर्चाचे.

१२५२१॥।≡।

पैकीं वजासूट. -|||≡|. रुपये.

बाकी रसानगी याद. रुपये.

१२५२१

बारा हजार पांचशें येकवीस रुपये जमा इजाफत खाशांकडील खासगीपैकीं, त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार याचे गुजारतीनें पावले. ते जमा धरून देविले. रुपये.

राजकीय. (ब) इतर माहिती.

—:०:—

पेशवे, (ड) अमृतराव.

४३।२४. परगणें अरुण वगैरे महाल येथील कमावीस होती. ते दूर करून सालमजकुरीं तीर्थस्वरूप राजश्री अमृतराव यांजकडील खर्चाचे बेगमीबदल. महाल बितपसील.

इ. स. १७९६–९७. सबा तिसेन मया व अलफ, जमादिलाखर ३०.

१ परगणें अरुण वगैरे.
१ परगणें खुटवाड.
१ शाहाडौरा.
१ तर्फ आकाझरी देखील तारई, व पिंपरीया मिळोन.
१ परगणें मावळ.
१ परगणें महतपूर.

६

येकूण सहा महाल देविले असेत. तरी त्यांजकडील कमावीसदाराचे हवालीं ठाणीं जकीरा सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन नारो चिमणाजी यांचे नांवें छ २७ रबिलावल.

सनद १.

जमीदार, परगणें अरुण वगैरे महाल यांस कीं, तुम्ही यांजकडील कमावीसदारासी रुजू होऊन सदरहू महालांचा अमल सुरळीत देणें. ह्मणोन चिटणीसी पत्र. १.

२

रसानगी राघोबा सदाशिव थथे.

४४।० धर्मादाय खर्च, विद्यमान तीर्थस्वरूप राजश्री अमृतरावसाहेब, स्वारी मुहूर्तेकरून पांच घटका रात्रींस अवसीस वाड्यांत आली. ते समयीं ग्रह प्रीत्यर्थ दानें दिल्हीं त्यांतील केतु प्रीत्यर्थ शस्त्रदान रामभट तेलंग श्रीशैल्यकर यांस दिल्हें. त्यास तसलमात, बापूजी जाचक

इ० स० १७९८–९९ तिसा तिसेन मया व अलफ, रबिलाखर ११

A. D. 1796-97. 43. The Parganas of Arun, Khutwad, Shahadowra and three others were assigned to Amritrao for his expenses.

A. D. 1798-99. 44. Amritrao entered the palace 5 Ghatakas after night fall on this date.

खासबारदार दिम्मत भिवजी जाचक, निमचा नीट, पान सेकल्याचे, परज साधा, मेण सकलादी काळे, दागिना सुमारी १.

बाळोजी कुंजराच्या कीर्दीपैकीं.

इ० स० १८००-०१ इहिदे मयातैन व अलफ, सवाल २२

४५।१२९ परगणें रावेर प्रांत खानदेश येथील तिजाई पैकीं; तिजाई मोकासा व दुमालेगांव खेरीजकरून अंमल काशीराव होळकर यांजकडे फौजेचे जरंजामास चालत होता. तो दूर करून तीर्थस्वरुप राजश्री अमृतराव यांजकडे सरंजाम, सालमजकूरापासून करार करून दिल्हा येविशी. सनदा.

१ काशीराव होळकर यांस कीं परगणें मजकूरचें ठाणें तीर्थस्वरुपाकडील कमावीसदार येतील, त्यांचे हवालीं करून देणें ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन सदरहू अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

२ रसानगी याद छ २२ सवाल.

इ० स० १८०२-०३ सलास मयातैनव व अलफ, रबिलाखर २९

४६।१५४ तीर्थस्वरूप राजश्री रावसाहेब यांची स्वारी शहर जुन्नर तालुके शिवनेर येथें जोरव्याहून राहण्यास येणार, याजकरितां शहर मजकूरीं सरकारचा वाडा आहे, त्याची झाडलोट करून राहावया जोगा नीट करून ठेवणें, ह्मणोन रामचंद्र नारायण मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें सनद १.

रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

प्रतिनिधी.

बाळोजी कुंजराच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८००-०१ इहिदे मयातैन व अलफ. जिलकाद २५

४७।१२८ महालांनिहाय व गांव येथील, राजश्री पंतप्रतिनिधी यांजकडील अमलाचा वसूल सखाराम घाडगे वगैरे यांजकडे द्यावयाविसी तुम्हांस सालमजकुरीं आज्ञापत्र सादर जाहलें आहे. त्यास हल्लीं प्रतिनिधीकडील कमावीसदाराकडे पूर्ववतप्रमाणें महालांनिहाय गांवचा वसूल द्यावयाविसी आज्ञा करून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं यांजकडील कमावीसदारासी रुजू होऊन अमल सुरळीत देणें. म्हणोन चिटणिसी पत्रें.

A. D. 1800-1801. 45. The Amal in Pargana Raver in Khandesh enjoyed as Saranjam by Kashirao Holkar was now given to Amritrao,

A. D. 1802-1803. 46. Amritrao was about to proceed to Junnar for residance. Orders were therefore issued for cleaning the Government house at the place.

A. D. 1800-1801. 47. The revenues in verious Mahals and villages belonging to the Pratinidhi, which were previously ordered to be given to Sakharam Ghatge and others, were now allowed to be continued to the Pratinidhi.

४ सखाराम घाटगे सर्जेराव याजकडे महाल व गांव येविसीं.

३ जमीदारास.

१ करियात मलवडी.

१ करियात कासेगांव.

१ करियात आटपाडी.

३

१ मौजे बुधपांचेगांव करियात ललगुण, येविसीं मोकदम यास.

४

२ निळकंठराव कुंजीर याजकडे वांगी व करियात वेळापूर येविसीं, करियात हरदु महालांचे जमीदारांस पत्रें.

३ येशवंतराव पाटणकर याजकडे महाल, येविसीं जमीदारांस.

१ करियात निंबसोड.

१ करियात मायणी.

१ करियात खानापूर.

३

१ निंबाजी भास्कर यांजकडे मौजे राजापूर परगणें वाप येथील मोकासबाब, व शेरी येविसीं मोकदमास.

१० दहा पत्रें दिल्हीं असेंत.

छ २५ जिलकाद.

४८।१८६ परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांजकडील फौज व पांयदळ मळ्या घाटाचे घाटमाथा जमा होऊन घाटाखालीं कोंकणांत उतरोन दंगा करणार, ह्मणोन हुजूर विदीत जाहलें. त्यावरून सदरहू बंदोबस्ताचें काम सरकारांतून बाळाजीराम मामलेदार माहालांनिहाय तालुके रत्नागिरी याजकडे सांगोन हे सनद सादर केली असे, तरी तुह्मीं किल्ले व महालानिहाय येथील बंदोबस्त चांगला मजबुदीनें राखोन तेथील नेमणुकी शिबंदीपैकीं लोक दारु व गोळी व पोटाची बेगमी करून देऊन, मशारनिल्हेकडे मळ्याचे वगैरे घाटांचे बंदोबस्तास रवाना करणें. लोकांनीं तेथें जाऊन बाळाजीराम याचे रजातलबेंत वर्तोन यास हजीरी देऊन सरकार लक्ष राखोन हे सांगतील त्याप्रमाणें सरकार चाकरी करित जाणें. ह्मणोन लोकांस ताकीद करून बाळाजीराम याजकडे घाटमाथा लोक जलद रवाना करणें. घाट व वाटा कोंकणांत उतरावया-

इ. स. १८०४–५.
खमस मयातैन व अलफ साबान ७.

48. Government was informed that Parasharam Pandit Pratinidhi had collected an army above the Malya ghant, and was about to attack the Konkan. Balajiram mamlatdar of Taluka Ratnagiri was directed to proceed against him, and the other officers in Konkan were instructed to assist him.

A. D. 1804-1805.

ध्या असतील त्या पाडणें जाहल्यास बाळाजीराम सांगतील त्याप्रमाणें घाट व वाटां पाहून बंदोबस्त राखणें, ह्मणोन किल्लेदार व महालांनिहायचे मामलेदार वगैरे यांस. सनदा.

२ तालुके अंजनवेल.

१ विठोजी गायकवाड महालांनिहाय यांस.

१ विठ्ठल विश्वनाथ किल्लेहाय यांस.

२

१ परशराम रामचंद्र किल्ले बहिरवगड तालुके अंजनवेल यांस.

२ तालुके रत्नागिरी.

१ बाळाजीराम महालांनिहाय यांस.

१ चिंतो वामन किल्लेहाय यांस.

२

१ आपाजी शिंदे किल्ले महीपतगड यांस.

१ खंडेराव निळकंठ तालुके विजयदुर्ग यांस.

१ आनंदराव धुळप सुभा आरमार, विजयदुर्ग यांस.

१ नारो रामचंद्र तालुके देवगड यांस.

१ विठोजी गायकवाड तालुके सुवर्णदुर्ग यांस.

१ खंडोजी जाधव किल्ले प्रतापगड यांस.

१ परशराम लक्ष्मण किल्ले परळी यांस.

१ नारो गोविंद तालुके रायगड यांस.

१ नारो गोविंद प्रांत राजपुरी यांस.

१ सदाशिव जयराम तालुके अवचितगड.

१ अनंदराव पंडित प्रतिनिधी विशाळगडकरी यांस.

१६

रसानगी यादी.

इ० स० १८११–१२
इसने अशर मया तैन व अलफ.
जिलकाद १४.

४९।२३५ राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडे महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरंजामास व सरंजामाखेरीज चालत होते. तें त्यांजकडून दूर करून सरकारांत ध्यावयासी बापूजी गणेश गोखले यांस आज्ञा केली, त्याजवरून त्यांनीं प्रतिनिधीकडील महाल, मुलूख, व किल्ले कोट, वगैरे सरकारांत घेतले. त्यांची जप्ती गोखले यांजकडे आहे. त्यांपैकीं महालगांव वगैरे बितपसील.

A. 1811-12

49. The territory and forts held by Parasharam Pandit Pratinidhi on Saranjam or other tenure, were formerly taken from him by Bapuji Ganesh Gokhle under the orders of Government and were managed by him. A portion of the territory was now restored to the Pratinidhi.

१ करियात आठपाडी येथील हिस्सेदार व दुमालेदार खेरीजकरून अमल.

१ परगणें बागेवाडी देहे सतावीस येकूण तनखा, खेरीज हिस्सेदार करून पेशजी प्रतिनिधी मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजामास लाऊन दिल्हा. ते बेरीज ९८८३०॥ रुपये.

पैकीं वजा, ठाणें परगणे मजकूर सरकारांत ठेविलें आहे. त्याचे लगत कसबे बागेवाडीसुद्धां गांव सरकारांत ठेवावयाचे त्यांची बेरीज ३७२१९॥=॥.

बाकी बेरीज ६१६१०॥।-। रुपये.

येकूण येकसष्ट हजार साहाशें पावणेअकरा रुपये सवा आणा बेरजेचे लाऊन द्यावे.

× × × × × ×

येकूण महाल व गांव वगैरे येथील सदरहू प्रतिनिधीकडील अमलाची जप्ती गोखले यांजकडून दूर करून सालमजकुरीं परशुराम पंडित प्रतिनिधी यांजकडे जातीस वगैरे बेगमी बदल सरंजामास लाऊन देविला येविसी. सनदा.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(४) आंगरे.

५०।९. राघोजी आंगरे मृत्यु पावले. सबब त्यांजकडील महाल व गांव व जमीनी सरकारांतून सरंजामास होते ते व त्यांजकडील अमलाचे गांव वगैरे यांची जप्ती सन आर्बातिसेनांत तुम्हांकडे सांगितली होती. ते सालमजकुरीं त्यांचे पुत्र मानाजी आंगरे, वजारतमाहा, सरखेल, यांजकडे पेशजीप्रमाणें त्यांजकडील अमल सरंजामास गांव व जमीनी वगैरे आहेत, ते करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूची जप्ती मोकळी करून मशारनिल्हेचे दुमाला करणें म्हणोन. सनदा.

इ. स. १७९५–९६.
सीत तिसेन मया व अछफ साबान २०.

५१।३६. मानाजी आंगरे वजारतमाहा, सरखेल, यांचा व बाबुराव आंगरे यांचा घरकलह लागला आहे. त्यास बाबुराव आंगरे यांजकडून धोंडजी लंवडे लोक सुद्धां कुलाब्यास गेले आहेत. त्यांचेबरोबर सतावीसी महालांनिहाय, येथील कमाविसदार यांचे नांवें सनदा.

इ. स. १७९६--९७.
सबा तिसेन मया व अलफ, जिलकाद २१.

१ आनंदराव राम यांस सनद कीं, प्रांत कर्नाळा येथें कुलाबकराकडील चाकरमाने लोकांचीं घरें असतील तीं जप्त करणें, व किल्ले माणीकगड येथील महालांत वजारतमाहा, याजकडील अमल असेल त्याची जप्ती करून, जप्तीमुळें ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंवडे यांजकडे देणें ह्मणोन.

---

50. Raghoji Angria having died his territory was attached in A. D. 1793-94. It was now ordered to be continued to his son Manaji Angria.
A. D. 1796-97.

51. A family dispute having ensued between Manaji Angria Wazarat Maha Sarkhel and Baburao Angria, the Angria's revenue in Government territory was ordered to be attached.
A. D. 1796-97.

१ भास्कर लक्ष्मण परणें सांकसें याचें नांवें सनद कीं, कुलाबे याजकडील चाकरमानें लोकांचीं घरें तालुके छतीसी परगणें मजकूर येथें असतील; तीं जप्त करणें, व परगणें मजकूर पैकीं वजारतमाहा, यांजकडील अमलाची जप्ती करून ऐवज वसूल होईल तो धोंडजी लंवडे यांजकडे देणें ह्मणोन.

सनद.

१ बाबुराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाबा याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके अवचितगड येथें असतील त्यांची व वजारतमहा याजकडील, अमलाचीं जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें ह्मणोन.

सनद.

१ अमृतराव पासलकर याचे नांवें सनद कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस लिहून पाठवितील त्याप्रमाणें पुस्तपन्हा करणें. कुलाब्याकडील चाकरमाने लोकांचीं घरें तालुके उंदेरी येथें असतील त्यांची जप्ती बाबुराव आंगरे करतील त्यांस करूं देणें व तालुके मजकूर येथें वजारतमाहा, यांचा निमे अमल आहे त्याची जप्ती तुम्हीं करून ऐवज वसूल होईल तो लंवडे याजकडे देणें ह्मणोन.

सनद.

४

चार सनदा राजश्री आबाजी कृष्ण शेलूकर, जबाजी गोविंद, नानाजी भानु, दिंमत मजकूर.

५२।३७ मानाजी आंगरे, वजारत महा, सरखेल, यांचा व बाबूराव आंगरे यांचा घरकलह लागला आहे. त्यास बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंवडे लोकसुद्धां कुलाबा प्रांतीं गेलें आहेत. त्यांचे बंदोस्ताविसी चिटणीसी.

इ० स० १७९६-९७
सबा तिसेन मया व अलफ, जिलकाद २१

पत्रें.

१ मेस्त्र (मिस्तर) सर चारलीस वारे मालीट, गोवर्ण दारे, (गव्हरनर) जनराल (जनरल) बंदर मुंबई यांचें नांवें पत्र, कीं धोंडजी लंवडे दारुगोळी वगैरे सरंजाम बंदर मजकुराहून खरेदी करून आणतील त्यांस आणूं द्यावा. सरखेल याजकडील जैसिंगें आंगरे यांजकडे सदरहू सरंजाम येकंदर जाऊं देऊं नये. व त्यांजकडून जवाहीर मोल करावयास येईल तें अटकाऊन बाबूराव आंगरे याजकडील कारकून येतील त्यांचे हवालीं करावें. ह्मणोन पत्र.

---

52. Baburao Angria seut Dhondji Lawande to Kolaba. Sir Charles Warre Malet, Governor of Bombay was requested to allow Dhondji to purchase ammunition at Bombay and to prevent any ammunition being sent to Jaising Angria of the party of Manaji Angria.

A. D. 1796-97.

१ राजश्री शंकरराव पंडित यांस पत्र कीं, कुलाबकर चाकरमाने तालुके सुधागड येथें असतील त्यांची जप्ती मशारनिल्हेकडील सरदार गेले आहेत ते करितील त्यांस आपणाकडून अडथळा होऊं नये. हरएक साहित्यांविसी मशार निल्हेकडील सरदारांचे लिहिलें तालुके मजकूरीं येईल त्याप्रमाणें साहित्य करावें ह्मणोन. पत्र.

१ सदाशिव रघुनाथ यांचे नांवें पत्र कीं, परगणे राजपुरी येथील चाकरमाने कुलाबकराकडे असतील, त्यांचीं घरें बाबूराव आंगरे यांजकडील धोंडजी लंवडे गेलें आहेत ते जप्ती करतील त्यास करूं देणें. तुम्हीं अडथळा न करणें ह्मणोन. पत्र.

१ आनंदराव शिंदे यांस पत्र कीं, धोंडजी लंवडे तुम्हांस सांगतील त्याप्रमाणें पुस्तपन्हा हरयेकविसी करीत जाणें, व रेवदंडा पैकीं दारुगोळी द्यावयाविसी अलाहिदा सनद सादर केली आहे, त्या अन्वयें देणें. कुलाबकर चाकरमाने तालुके मजकुरीं असतील त्यांचे घरचीं व आंगरे यांजकडील महालची जप्ती बाबूराव आंगरे करतील त्यांस करूं देणें. व कुलाबियाकडील रयत तेथें आली असेल त्यांजकडील धान्याचा व बाकीचा वसूल हे घेतील त्यांस घेऊं देणें. तुम्हीं जमाव सुद्धां जाऊन कामकाज करणें ह्मणोन. पत्र.

४

चार पत्रें दिल्हीं असत.

५३।२४५ प्रांत कुलाबा येथील बंदोबस्त तुह्मांकडे सांगोन हें पत्र लिहिलें असें, तरी तुम्हीं सरकार लक्ष धरून प्रांत मजकूरचा बंदोबस्त करून निघोन पुण्यास यावें. ह्मणून मानाजी आंगरे वजारतमाहा सरखेल यांचे नांवें चिटणीसी पत्र. १

इ० स० १८१४–१५
खमस अशर मया तैन व अलफ
साबान १३

५४।२४७ प्रांत कुलाबा येथील महाल व गांवचा अमल मानाजी आंगरे वजारत माहा सरखेल, यांजकडे आहे त्याजपैकीं रुपये १०००० दहा हजार रुपयांचे गांव मशारनिल्हे कडून दूर होऊन सालमजकुरापासून सरकारांत आंगरे यांनीं द्यावयाचा करार केला. त्यास सद. रहु गांवची मामलत सालमजकुरीं चिंतो वामन यांजकडे सरकारांतून सांगितली येविसी सनदा.

इ. स. १८१४–१५
खमस अशर मयातैन व अलफ; रमजान ४

१ मानाजी आंगरे, वजारतमाहा सरखेल, यांस कीं, दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन.

---

53. Manaji Angria Vazarat Maha Sarkhel was appointed to Prant Kolaba and was directed to arrange its affairs and repair to the Huzur.
A. D. 1814-15

54. Manaji Angria agreed to surrender villages valued at Rs. 10000 in Prant Kolaba to Government.
A. D. 1814-15.

१ चिंतो वामन यांस, कीं दहा हजार रुपयांचे गांव सरकारचे सोईचे तुम्हीं हवालीं करून घेऊन इमानें इतबारें वर्तोन गांवचा अंमल चौकशीनें करून जमाखर्चाचा अजमास अलाहिदा करून दिल्हा जाईल, त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद.

२ रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(५) सचीव.

५५।९८ दुखवटा खर्च, चिमणाजी शंकर सचीव यांचे तीर्थरूप शंकरराव रघुनाथ सचीव मृत्यु पावले, सबब मशारनिल्हेस पुत्र घेतले. त्यांस दुखवटा गोविंदराव बाजी जोशी याजबरोबर पाठविला. रवाना भोर, तसलमात देवराम परदेशी प्यादा दिमत गोविंदराव बाजी.

इ० स० १७९९-१८००. मया तैन व अलफ. रबिलावल २३.

छ १९ रबिलावल.

५६।११६ राजश्री चिमणाजी शंकर यांचे तीर्थरूप शंकरराव पंडित सचीव, यांस सन तिसा तिसेनांत देवआज्ञा जाहली. त्यांनीं वर्तमान असतां मशारनिल्हे यांस दत्तपुत्र घेतले. त्यांजकडे सुरनिसी व जिल्हा व सरंजाम व किल्ले कोट वगैरे दौलत पूर्ववत प्रमाणें करार करून, नजर व श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांजकडील खर्चवेंच सुद्धां ऐवज सरकारांत ध्यावयाचा करार करून, हे सनद तुम्हांस सादर केली असे; तरी सुरनिसीच्या पदाचीं वस्त्रें पेशजीचे चालीप्रमाणें यांस द्यावयाचीं, त्यांची यादी अलाहिदा पाठविली आहे. त्याप्रमाणें तुम्हीं महाराजास विनंती करून सरकारांतून कृष्णाजी भगवंत कारकून रवाना केले आहेत, त्यांचे हवालीं वस्त्रें करणें. ते त्यांजकडे पावतीं करतील ह्मणोन. कृष्णराव नारायण याचे नांवें. सनद १.

इ० स० १८००-०१. इहिदे मया तैन व अलफ. जमादिलाखर २६.

सदाशिव भास्कर याचे नांवें सनद कीं तुह्मीं व कृष्णराव नारायण मिळोन महाराजास विनंती करून. १

वस्त्रें हवालीं करण्याविसी. २

रसानगियादी.

---

55. Shankarrao Raghunath Sachiv having died, clothes of condolence were sent to his adopted son Chimnaji Shankar.

A. D. 1799-1800.

56. Shankarrao Pandit Sachiv died in A. D. 1798-99. He adopted Chimnaji Shankar as his son, during his life time, A Nazar was taken from Chimnaji Shankar and the dignity of Surnis, the Zilla revenue, the Saranjam, and forts, and other estate enjoyed by his fathar was continued to him. Krishnarao Narayan the officer of Satara was directed to request the Satara Raja to give the usual dress of honour to Chimnaji Shankar.

A. D. 1800-1801.

१ राजकीय. (ब) इतर माहिती.

(६) दाभाडे व गायकवाड.

इ० स० १७९८–९९
तिसा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज ६.

५७।९५ त्रिंबकराव दाभाडे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम हुजुरून होता, तो पेशजी सरकारांत जप्त केला. त्याची कमावीस मामलेदार यांजकडे आहे ते दूर करून त्रिंबकराव दाभाडे मृत्यू पावले सबब त्यांचे पुत्र येशवंतराव दाभाडे यांस सेनापतीचें पद सांगोन महालांनिहाय व गांव येथील मोकाशाचा अंमल मशारनिल्हे यांजकडे पेशजी प्रमाणें सरंजाम सालमजकुरापासून करार करून दिल्हा असे. तरी यासी रुजू होऊन अंमल सुदामतप्रमाणें सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार व मोकदम यांस, व कमाविसदारांस वगैरे सनदा पत्रें.

बाळोजी कुंजर यांच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८०१–०२
इसने मयातैन व अलफ.

५८।१४५ आबाजी कृष्ण शेलूकर व गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर, यांच्या परस्परें तालुके अमदाबाद संबंधें लढाया होऊन, तालुके मजकूरचीं ठाणीं गोविंदराव यांणीं घेतलीं. आणि आबाजी कृष्ण यांस मंडळी सुद्धां व त्यांजकडील अमृतलाल गुजर वगैरे यांस हस्तगत करून त्यांची चीजबस्त झाडून दौलत जप्तींत ठेविली आहे. त्यास आबाजी कृष्ण यांस मंडळी सुद्धां व अमृतलाल गुजर वगैरे यांस हुजूर आणविलं असेत. तरी ज्यांचे पायांत बिड्या असतील त्या तोडवून मोकळे करून झाडून कुटुंबासुद्धां मंडळीस बसावयास पालख्या व घोडीं वगैरे सामान लागेल तें व रखवालीस समागमें स्वार व प्यादे व यांची वाटखर्चाची बेगमी करून देऊन, हुजुरून मंगाजी नलवडा व हरजी अहीर खीजमतगार पाठविले आहेत; त्यांजबरोबर देऊन पोहोंचवून देणें. ह्मणोन छ १५ रबिलाखर. सनदा.

१ अनंदराव गायकवाड यांस.
१ रावजी आपाजी यांस.
―
२

रसानगी याद.

---

57. Trimbakrao Dabhade being dead, his Saranjam which was under attachment, was released and bestowed on his son Yashwantrao. The title of Senapati was conferred on him.
A. D. 1798-99.

58. Battles were fought between Abaji Krishna Shelukar and Govindrao Gaikwad, Senakhaskhel Samsher Bahadoor, in respect of Taluka Ahamadabad. Govindrao there upon took possession of all the Thanas in the Taluka. and made Abaji and his followers prisoners. Anandrao Gaikwad was directed to release them and to send them to the Huzur.
A. D. 1801-1802.

५९।१५७ येशवंतराव दाभाडे सेनापति हे मुलेंमाणसें सुद्धां पेठेंत आहेत. तीं मुलें- माणसें किल्ल्यावर ठेऊन खुद्द वसईस निघोन येणार. त्यांस मशार- निल्हेचीं मुलेंमाणसें व चीजवस्त किल्ले याजवर घेऊन बरदास्त राखणें, ह्मणोन हसाजी निकम हवालदार किल्ले विसापूर याचे नांवें सनद १. रसानगी यादी.

इ. स. १८०२–३
सल्लास मयातैन व अलफ;
जिलकाद २५

१ राजकीय. (ब) इतर माहिती.

(७) नागपूरचे भोसले.

जमा जामदारखाना.

६०।४१ कमावीस भेट, बाबद रघोजी भोसले सेना- साहेब सुभा यांचे डेऱ्यास मेजवानीस स्वारी गेली, ते समयीं पोषाक दिल्हे. ते गुजारत हाय. सनंगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७–९८
समा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज १८.

१७०० राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत कृष्णाजी अगला खीजमतगार, सनंगें. येकूण रुपये.

४५०	मंदील जरी.	१
४५०	चादर जरी.	१
५००	जामेवार जरी, २ दर २५०.	२
३००	किनखाप.	१
१७००		५

१०५० राजश्री आपासाहेब यांसी, गुजारत आबाजी पडवळ खिजमतगार, सनंगें. येकूण रुपये.

१५०	तिवट छिट्टी हलपुरी भस्मी.	१
५००	दुपेटा छिटी हलपुरी भस्मी.	१
२००	जामेवार छिटी हलपुरी भस्मी. दर १०० प्रमाणें.	२
२००	किनखाप.	१
१०५०		५

59. The officer of the fort Visapuc was directed to receive the family and property of Yeshwantrao Dabhade, Senapati into the fort, as Yeshwantrao intended to proceed to Bassin (where the Peshwa was now encamped.)

A. D. 1802-1803.

60. Bajirao went to a feast at Raghoji Bhosle, Sena Saheb Soobha, at his tent.

A. D. 1797-98.

६७३ राजश्री अमृतराव साहेब यांसी, गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार. सनगें येकूण. रुपये.

१५०	तिवट छिंटी हलपुरी भस्मी.	१
३५०	दुपेटा छिंटी हलपुरी भस्मी.	१
४८	जामेवार छिटी हलपुरी.	२ दर २४ प्रमाणें रुपये.
१२५	किनखाप.	१
६७३		५

५०० राजश्री विनायकराव बापू, गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार सनगें. येकूण. रुपये.

५०	तिवट छिटी हलपुरी.	१.
२५०	दुपेटा छिटी हलपुरी.	१.
५०	जामेवार छिटी हलपुरी.	२ दर २५.
१५०	किनखाप.	१.
५००		५
३९२३		२०

इ० स० १७९७–९८
समानं तिसेन मया व अलफ.
जिल्हेज १९.

६१।४३ राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा, यांजकडे संस्थान गढेमंडले येथील रेवा उत्तरतीरचा अंमल द्यावयाचा करार केला असे. तरी सरकारांतून आपाजी रघुनाथ कारकून पाठविले आहेत त्यांचे गुजारतीनें त्यांजकडील अंमलदार येतील, त्यांचे हवालीं संस्थान मजकूर ठाणें जात सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन बाळाजी गोविंद याचे नांवें सनद. १.

येविसी सदरील अन्वयें मशारनिल्हेचें नांवें दोन सनदा. २

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा तुह्मांस सनद सादर जाहली आहे, त्याप्रमाणें हवालीं करणें ह्मणोन.

१ तिसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर जाहल्या आहेत, त्याप्रमाणें हवालीं करणें ह्मणोन.

२ ३

रनानगी याद.

इ० स० १७९७–९८
समान तिसेन मया व अलफ.
जिल्हेज १९.

६२।४४ राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांजकडे किल्ले चौरागड सरंजाम सुद्धां द्यावयाचा करार केला. येविसी सनदा.

A. D. 1797-98. 61. The territory to the north of the Rewa in Sansthan Gadhemandal, was ordered to be handed over to Raghoji Bhosle.

A. D. 1797-98. 62. The fort of Choragad with the Saranjam attached to it, was also ordered to be handed over to him.

३ बाळाजी गोविंद यांस कीं, सेनासाहेब सुभा यांजकडे किल्ले मजकूर सरंजाम सुद्धां द्यावयाचा करार केला असे. तरी सरकारांतून आपाजी रघुनाथ कारकून पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें त्यांजकडील अमलदार येतील त्यांचे हवालीं किल्ला सरंजाम सुद्धां करून कबज घेणें. ह्मणोन. सनद १.

येविसी, सदरहू अन्वयें मशारनिल्हेचे नांवें. सनदा २.

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा तुम्हांस सनद सादर जहाली आहे, त्याप्रमाणें किल्ला सरंजाम सुद्धां हवालीं करणें. ह्मणोन.

१ तिसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर जाहल्या आहेत, त्याप्रमाणें किल्ला सरंजाम सुद्धां हवालीं करणें. ह्मणोन.

२ ३

१ देशमूख व देशपांडे सरंजाम किल्ले मजकूर यांस कीं, सेनासाहेब सुभा यांजकडील अंमलदार येईल, त्यासी रुजू होऊन किल्ले मजकूर येथील सरंजामाचा अंमल सुरळीत देत जाणें. ह्मणोन. सनद.

४ रसानगी याद.

इ० स. १८११–१२
इसने अशर मयातैन व अलफ; रजब १०

६३।१३३ संस्थान गढेंकोट येविसी सनदापत्रें, दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांचे नांवें सनद कीं, संस्थान मजकूर सरकारचे पेठ्यांतील असतां रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांणीं मसलत करून संस्थानास महसरा दिल्हा. हें वर्तमान अखबारें वरून तुह्मांस कळलें. तेव्हां तुह्मीं फौज पाठवून संस्थान हस्तगत केलें. तें संस्थान बाळोजी कुंजर याचे हवालीं करण्याविषयीं तुम्हांस, व हवालीं करून घ्यावयाविशी कुंजीर यास, व संस्थानास आपले कडून उपद्रव न होतां अलीजा बहादर यांजकडील फौजेसी खटला करूं नये, निक्षून ताकीद आपले कडील फौजेंतील सरदारांस करावी, ह्मणोन सेनासाहेब सुभा यांस, याप्रमाणें पत्रें सदाशिव माणकेश्वर यांणीं पेशजी पाठविलीं. त्याजवरून तुह्मीं माधवराव निकम देशमुख नेवासेकर यास छ २६ जमादिलावलचें पत्र पाठविलें. तें त्यांणीं हुजूर आणून दाखविलें. त्यांत मजकूर सेनासाहेब सुभा यांजकडील वकील पुणीयास आहेत त्यांचें पत्र येथील वकील घारपुरे आहेत त्यांचें नांवें आलें आहे कीं, संस्थान गढेकोट प्रकर्णीं बोलणें जाहलें आहे. येक दोन दिवसांत परवानगी घेऊन पाठवितो. याप्रमाणें लिहिलें आहे. त्यास

A. D. 1811-12.

63. The Sansthan of Gadhekot, though under the jurisdiction of Government was taken by Raghoji Bhosle, Sena Saheb Subha, Daulatrao Scindia having learnt the news from the report of news-writers, sent an army against him; and retook the province. Daulatrao's action was approved and he was directed to hand over the Sansthan to Baloji Kunjir. Raghoji Bhosle was informed of the issue of the order and was directed not to harass the army of the Scindia,

संस्थान हाताखालीं घालावयाकरितां सेनासाहेब सुभा यांजकडील वकील बोलणें बोलतील, त्याजवर नजर न देतां संस्थान सरकारचें सरकारांत ठेवावें. सरकारांत ठेविलें असतां यासी गूण फार आहेत. हें ध्यानांत न यावें असें नाहीं. येवेसी तुम्हीं विनंती करून व कारभारी यांजवळ बोलून पक्के करून कुंजीर याचें स्वाधीन संस्थान करण्याविसी पत्रें आलीं आहेत; त्याप्रमाणें सरकारचें पत्र पाठवावें. ह्मणजे इकडून कोणेविसी गुंता पडणार नाहीं. आज्ञेप्रमाणें घडेल, ह्मणोन विस्तारें लिहिलें. व देशमुख मशारनिल्हे यांणीं विनांति केली. ऐशास संस्थान गढेंकोट हें सरकारचे पेट्यांतील, सेनासाहेब सुभा यांचा कांहीं तेथें संबंध नसतां घेतात, हें तुम्हांस समजल्यावरून तुम्हीं फौज पाठवून किल्ल्यासुद्धां हस्तगत केलें. हें चांगलें केलें. या करण्यांत हुजूरची मर्जी प्रसन्न झाली. संस्थान बाळोजी कुंजर याचें हवालीं करावयाविसी तुम्हांस पेशजी सदाशिव माणकेश्वर यांणीं लिहिलेंच आहे, व हल्लीं संस्थान सेनासाहेब सुभा यांजकडे देऊं नये, सरकारचें सरकारांत ठेवावें, म्हणोन देशमूख मशारनिल्हे याचें पत्रांत तुम्हीं लिहिलें, हें सलाह उत्तम लिहिली. सेनासाहेब सुभा यांजकडील वकील घारपुरे तुम्हांसी बोलतात, कीं गढेंकोट प्रकर्णीं सरकारांत बोलणें लाविलें आहे. एक दोन दिवसांत परवानगी घेऊन पाठवितों. असें पत्र पुण्याहून सेनासाहेब सुभा यांजकडील वकिलाचें आम्हांस आलें आहे ह्मणोन, त्यास या गोष्टीचा हुजूर संभूत नाहीं. घारपुरे वकील तेथें तुम्हास समजावितात तो मजकूर बातल. येविसी सेनासाहेब सुभा यांस पत्र गढेंकोट संस्थान सरकारचें पेटयांतील, तेथें तुम्हांकडून उपसर्ग हरगीज होऊं नये, या मजकुराचें लिहिलें आहे. तुम्हीं संस्थान, महाल, व किल्ले, व ठाणीं जकिरासुद्धां बाळोजी कुंजीर याचे हवालीं करून त्याची पावती घेऊन हुजूर पाठवणें. म्हणोन. सनद १

रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांस कीं, संस्थान मजकूर सरकारचे पेटयांतील दौलतराव शिंदे अलीजाबाहादर यांणीं सरकारांत घेऊन हुजूर विनंति लिहिली. त्याजवरून दरोबस्त संस्थान बाळोजी कुंजीर याचे हवालीं करण्याविसी अलीजाबहादर यांस हुजुरून लिहिलें आहे. त्याप्रमाणें तें संस्थान कुंजीर याचे हवालीं करतील. आपलेकडील फौज त्या प्रांतीं आहे, त्यांनीं संस्थानासी व अलीजाबहादर यांजकडील फौजेसी खटला करूं नये, ह्मणोन फौजेतील सरदार यांस निक्षून ताकीद करावी. येविसी सदाशिव माणकेश्वर यांनीं पेशजी आपणास लिहिलेंच आहे. ह्मणोन. सनद १.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(८) शिंदे व होळकर.

६४१ आपाजी शामजी व बाबाजी अनंत चिकोडकर यांनीं सरकार कामास कस्त

इ० स० १७९५।९६ सीत तिसेन मया व अलफ, रजब ९

मेहनत बहुत करून काम कार्जे केलीं. सबब उभयतांस दोन गांव पांच हजार रुपयांचे नूतन इनाम सरकारांतून द्यावयाचा करार सन अर्बा समानीनांत जाहला आहे. त्या ऐवजीं सन अर्बा व सन खमस समानीन दुसाला साडेसात हजार रुपये इतलाख पावले. त्यांस सन सीत समानीना पासून परगणें मजकूर पैकीं इनाम गांव दिल्हे. त्यांची बेरीज. रुपये.

३७५० मौजे निडसोसी करियात मनोळी, हा गांव तुह्मांकडे कमाविसीनें होता, तो दूर करून दिल्हा. त्याची बेरीज. रुपये.

२९४४॥ बाबद आकार, सन खमस समानीन.

१२०९८≡ जाजती भरतीस रुपये.

३७५० (मुळांप्रमाणें आहे.)

१२५० मौजे गिरगांव करियात कट, हा गांव आपाजी शामजी याचें कर्ज करवीर करांकडे येणें, त्या ऐवजीं रदकर्जास गांव आहेत, त्यांपैकीं मौजे मजकूर दूर करून दिल्हा त्याची बेरीज. रुपये.

८४९८= ऐन तनखा, होन नाणें ४२४॥- दर होनीं २ प्रमाणे. रुपये.

४००|||≡ जाजती भरतीस रुपये.

५००० १२५०

येकूण पांच हजार रुपयांचे कमाल आकाराचे दोन गांव, खेरीज हक्कदार, व कदीम इनामदार करून दरोबस्त नूतन इनाम सरकारांतून करार करून देऊन, हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी सदरहू प्रमाणें गांव यांचे दुमाला करून गांवचा आकार मशारनिल्हेचें नांवें सन सीत समानीनापासून परगणें मजकूरचे हिशेबीं इनाम खर्च लिहीत जाणें. या सनदेची प्रत लिहून घेऊन असल सनद मशारनिल्हे जवल भोगवटीयास परतोन देणें. ह्मणोन बाळकृष्ण लक्ष्मण कमाविसदार परगणें हुकेरी दिमत परशराम रामचंद्र याचें नांवें

सनद.

रसानगी यादी.

आपाजी शामजी यांस, सन समान सबेनांत महादजी शिंदे यांणीं येसाजी शिंदे यांजकडे करवीरास सरकारचे जाबसाला कारितां पाठविलें असतां, आपाजी शामजी याचे डोळे जबरदस्तीनें काढिले. व अंताजी शामजी यांचे पुत्र बाबाजी अनंत यांणीं किल्ले भुदरगड येथील राजकारण सरकारचे आज्ञेप्रमाणें केलें. किल्ला सरकारांत आला. सबब उभयतांस

64. Appaji Shamji was seut by Mahadaji Scindia to Yesaji Scindia at Karvir in A. D. 1777-78 to explain some matters on behalf of Government, while there his eyes were forcibly taken out.

A. D. 1795-96.

As a recompense for this loss and in recognition of the service done by his brother's son Balaji Anant, who obtained the fort of Bhudhargad for Government two villages were given to the family in Inam.

दोन गांव ५ हजार रुपयांचे कमाल आकाराचे सरकारांतून नूतन इनाम द्यावयाचा करार जाहला आहे. त्याप्रमाणें देणें. यांचे यादींत मखलासी जाहली असे.

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ,
सफर ७.

६५।४९ दौलतराव शिंदे अलीजाबहाद्दर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा. येविसी सनदा.

२ व्यंकटराव शिवाजी याचे नांवें सनद कीं, जालनापुर येथील मोकासा व बाबती व सरदेशमुखीचा अंमल व दुमाले गांव खेरीज करून, बाकी दरोबस्त अमलाची मामलत तुह्मांकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचे ठाणें जकिरा सुद्धां याचे हवाली करून कबज घेणें. ह्मणून सनद १.
येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन सनद १.

२ नरसो तुकदेव याचे नांवें सनद कीं, कसबे पुणतांबे प्रांत गंगथडी येथील खेरीज मोकासा करून दरोबस्त अंमल परशराम रामचंद्र याजकडे सरंजामाम होता, त्याची जप्ती सरकारांत करून कमाविस तुह्मांकडे सांगितली आहे. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे कसबे मजकूरचा सदरहू अंमल फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी कसबे मजकूरचे ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें म्हणोन सनद. १.
येविसी मोकदम कसबे मजकूर यांस कीं,
मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. म्हणोन सनद १.
२

२ मोरो हरी कमावीसदार परगणें नेवासें वगैरे महाल याचे नांवें सनद कीं, कसबे सोनई परगणे मजकूर येथील दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करून देऊन, हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी कसबे मजकूर ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून, आकार याचें नांवें परगणें मजकूर येथील हिशेबीं खर्च लिहीत जाणें. म्हणोन सनद. १
येविसी मोकदम कसबे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू हाऊन, कसबे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. म्हणोन. सनद १.
२

A. D. 1797-98. 65. Daulatrao Scindia Alija Bahadoor was given certain Amals in Pargana Jalnapoor, in Pargana Sewagaum &c. in military Saranjam.

२ रामचंद्र आबाजी याचें नांवें सनद कीं, परगणें शेवगांव येथील दुमाले गांव खेरीज करून, बाबती सरदेशमुखीचे अमलाची जकात सुद्धां मामलत तुह्मांकडे होती. त्यापैकीं कसबे तिसगांव सरकरांत ठेवून बाकी अंमल तुम्हांकडून दूर करून, मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचा सदरील अंमल मशारनिल्हे करतील. ह्मणोन. सनद १.

येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन, परगणें मजकूरचा सदरील अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनद.

२

२ रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित यांचे नांवें सनद कीं, परगणे ढाकोणी प्रांत हिंदुस्थान, हा महाल तुम्हांकडे होता. त्याचे मोबदला तुह्मांस द्यावयाचा ठरावून परगणे मजकुरचा अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी परगणे मजकुरचें ठाणें मशारनिल्हेचें हवालीं करून कबज ध्यावें. ह्मणोन. सनद १.

येविसी जमीदार परगणे मजकूर यांस कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनद १.

२

१ परगणे पाचोरें प्रांत खानदेश, येथील दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार परगणें मजकूर यांचें नांवें. सनद.

१ परगणे वरणगांव प्रांत खानदेश, येथील मोकासा खेरीज करून लळींगचे जहागिरीचे गांव सुद्धां दरोबस्त अंमल मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन, परगणे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार परगणे मजकूर यांचें नांवें. सनद.

१ मौजे सविंदणें तर्फ पाबळ प्रांत जुन्नर, येथील मोकासा खेरीज करून, दरोबस्त अमलाची कमावीस खंडेराव यांजकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन, मौजे मजकूरचा सदरहू अंमल सुरळीत देणें. ह्मणोन मोकदम मौजे मजकूर यांचें नांवें. सनद.

१ मौजे मोशी तर्फ हवेली प्रांत पुणें, येथील मोकासी व गोपाळ नारायण

येकबोटे यांस शंभर रुपये नेमणूक आहे. ते खेरीज करून, दरोबस्त अंमल परशराम रामचंद्र यांजकडे सरंजामास होता. त्याची जप्ति सरकारांत करून, कमावीस राघो बल्लाळ यांजकडे सांगितली आहे. ते दूर करून मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन मोकदम मौजे मजकूर याचें नांवें.
सनद.

३ परगणें गांडापूर येविसी सनदा.

१ महादाजी नारायण याचे नांवें सनद कीं, परगणें मजकूर येथील मोकासा व बाबती व दुमाले गांव खेरीज करून, दरोबस्त अमलाची मामलत तुह्मांकडे होती. त्यांपैकीं मौजे सुरेगांव व मौजे जळके हे दोन गांव सरकारांत ठेवून, बाकी परगणें मजकूरचा अंमल तुम्हांकडून दूर करून, मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचे ठाणें जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद.

१ खंडेराव जाधव याचे नांवें सनद कीं, परगणें मजकूर येथील बाबतीचे अमलाची कमावीस तुह्मांकडे होती. ते दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून देऊन, हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी परगणे मजकूरचा सदरहू अंमल मशारनिल्हे करितील. ह्मणोन
सनद.

१ जमीदार, परगणे मजकूर यांस कीं, परगणे मजकूर येथील मोकासा व दुमालेगांव खेरीज करून, दरोबस्त अंमलपैकीं मौजे सुरेगांव व मौजे जळकें हे दोन गांव सरकारांत ठेवून बाकी जहागीर व सरदेशमुखीचा अंमल महादाजी नारायण यांजकडे व बाबतीचा अंमल खंडेराव जाधव यांजकडे कमाविसीनें होता, तो दूर करून मशारनिल्हे यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन परगणे मजकूरचा जहागीर व बाबती व सरदेशमुखी सुद्धां दरोबस्त अंमल सदरहूप्रमाणें सुरळीत देणें. म्हणोन सनद.

३

१७

रसानगी यादी.

जमा जामदारखाना.

६६।५० कमावीसभेट, राजश्री आपासाहेब यांसी बाबत, दौलतराव शिंदे यांचे डेऱ्यास

इ. स. १७९७–९८ समान तिसेन मया व अलफ; सफर २६

गोकूळअष्टमीचे उत्साहनिमित्य स्वारी गेली. ते समयीं पोषाक दिला. तो गुजारत रामजी खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

४०	तिवट छिटी बऱ्हाणपुरी.	१
२५०	दुपेटा छिटी बऱ्हाणपुरी.	१
७०	किनखाप.	१
२४	शेले साधे धुवट २ दर १२ प्रमाणे.	
३८४		

जमा जामदारखाना.

६७।५९ कमावीसभेट, बाबत दौलतराव सिंदे यांचें लग्न जाहलें सबब खासा स्वारी मेजवानीस लष्करांत डेऱ्यास गेली. ते समयीं पोषाक दिल्हे ते गुजारतहाय. सनंगें येकूण. रुपये.

इ. स. १७९७–९८ समान, तिसेन, मया व अलफ; रमजान २७

८०० राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत भोपत खिजमतगार सनंगें येकूण रुपये.

१००	तिवट चुनडी.	१
४५०	दुपेटा चुनडी आसवली किनारदार.	१
१५०	किनखाप.	१
१००	शेले साधे धुवट बंगाली.	२ दर ५०.
८००		५

४७५ राजश्री आपासाहेब यांसी, गुजारत मल्हारजी तनपुरा खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

५०	तिवट छिटी हिलपुरी.	१
२००	दुपेटा छिटी हिलपुरी.	१
१२५	किनखाप.	१
१००	शेले साधे धुवट बंगाली.	२ दर ५० प्रमाणें रुपये.
४७५		५
१२७५		१०

जमा जामदारखाना.

इ. स. १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ. मोहरम ३.

६८।६६. कमावीस भेट बाबदहाय, सनंगें येकूण रुपये.

A. D. 1797-98. 66. Appasaheb went on a visit to Daulatrao Scindia at his tent on the Gokul Ashtami festival.

A. D. 1797-98. 67. The Peshwa went to Daulatrao Scindia's tent for a dinner party given in honour of the latter's marriage.

A. D. 1798-99. 68. The Peshwa went to Khadki to pay a visit to Laxumibai, widow of Mahadaji Scindia.

७२१ बाबद लक्ष्मीबाई महादजी शिंदे यांची स्त्री यांजकडे खडकीचे मुक्कामीं भेटीस गेले, ते समयीं दिल्हीं तीं सनंगें. येकूण रुपये.

३०८ राजश्री रावसाहेब यांनीं लष्करांतून खडकीचे मुक्कामींहून पाठविलीं. गुजारत खंडोजी दहीभाता खिजमतगार, सनंगें येकूण रुपये.

३२॥	तिवट पैठणी.	१
१५०	जाफरखानी पैठणी.	१
२०॥	शेले साधे धुवट.	२
१०५	किनखाप.	१
३०८		

२७१॥ राजश्री बाबासाहेब यांसी, गुजारत भिवजी ढवळा खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

३२॥	विवट पैठणी.	१
१०५	दुपेठा पैठणी.	१
२१॥	शेले साधे धुवट.	२
११२॥	किनखाप.	१
२७१॥		५

१४१॥ राजश्री विनायकराव यांसी, गुजारत कृष्णाजी पराड खिजमतगार. सनंगें येकूण रुपये.

१८॥	तिवट पैठणी.	१
६२॥	दुपेटा पैठणी.	१
१०॥	शेला साधा धुवट.	१
५०	किनखाप.	॥
१४१॥		३॥

७२१	१३॥

६८८ राजश्री आप्पासाहेब यांसी, गुजारत रामजी जोशी खिजमतगार, सनंगें येकूण रुपये.

३०२ बाबत लक्ष्मीबाई महादजी शिंदे यांची स्त्री, यांजकडे खडकीचे मुक्कामीं भेटीस गेले ते समयीं दिल्हीं. सनंगें येकूण रुपये.

२५	तिवट पैठणी.	१
१५०	दुपेटा पैठणी.	१
२७	शेले साधे धुवट.	२
१००	किनखाप.	१
३०२		५

६९।७९ बदल देणें. दौलतराव शिंदे अलीजाबहादर हिंदुस्थानांत जातात. सबब रवानगीबाबद ऐवज खर्चास द्यावयाचा ठरला आहे. त्यापैकीं राजश्री नारो शिवराम कारकून निसबत दफ्तर.

इ. स. १७९८–९९
तिसा तिसेन मया व अलफ.
रजब २६.

४००००० रुपये.

चार लक्ष रुपये कर्ज गुजारत हरीभक्ती याजपासून कर्जाचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यापैकीं देविले.

७०।८० गंगाजल निर्मळ लक्ष्मीबाई शिंदे यांजकडील बारभाई वगैरे लोक कोंकणांत उतरोन दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास हुजुरून गोविंद बल्लाळ कारकून निसबत नारो शिवराम या समागमें स्वार देऊन पाठविले असेत. तरी तालुके मजकूर पैकीं लोक मशारनिल्हेकडे पाठवून ते सांगतील त्याप्रमाणें जागा जागा नाकेबंदी करून बंदोबस्त करणें. त्याजकडील घोडीं पाडाव करून वस्तभाव वगैरे जें सांपडेल तें गोविंद बल्लाळ यांजकडे जमा करणें. ह्मणोन मामलेदार तालुकेहाय यांचे नांवें सनदा.

इ. स. १७९८–९९.
तिसा तिसेस मया व अलफ.
साबान ३.

१ प्रांत कल्याण भिवंडी निसबत सदाशिव केशव.
१ तालुके राजमाची निसबत नारायणराव रामचंद्र.
१ किल्ले माहुली निसबत परशराम भगवंतराव शिंदे.
१ किल्ले कर्नाळा निसबत परशराम निळकंठ.
१ किल्ले विसापूर निसबत सदाशिव भास्कर.
२ तालुके शिवनेर.
　१ रामचंद्र नारायण मामलेदार यांस.
　१ नारसांवत हवालदार किल्ले मजकूर.
　———
　२
१ तालुके रतनगड निसबत येशवंतराव महादेव.
१ तालुके त्रिंबक निसबत पांडुरंग धोंडाजी.
१ तालुके कावनई निसबत गोविंद रंगनाथ.
१ तालुके वसई व मामले कोहज निसबत वामनाजी हरि यांस.
१ किल्ले लोहगड निसबत राजश्री बाळाजी जनार्दन यांस.
———
१२ रसानगी नारो शिवराम चक्रदेव कारकून निसबत दप्तर.

69. Rs. 4 Lacs were paid to Daulatrao Scindia, in past payment of the amount agreed to be paid to him for his expenses, now that he was about to return to his territory in upper India.

A. D. 1798-99.

70. Men in the service of Laxumibai Scindia descended into the Konkan and were harassing the country. A body of Sowars under Govind Ballal was sent to put them down.

A. D. 1798-99.

७१।९९ कमावीस भेट. राजश्री अमृतरावसाहेब यांसी बाबत, दौलतराव शिंदे यांचे डेऱ्यास गोकुलअष्टमीचे उत्साहनिमित्त स्वारी गेली, तेसमयीं पोषाक दिल्हा. तो गुजारत राणोजी दुधाणा खिजमतगार सनगें येकूण. रुपये.

इ० स० १७९७–९८
मया तैन व अलफ.
रबिलावल २७.

४०	तिवट पैठणी आबासी.	१
२००	दुपेटा पैठणी आबासी आसवली जरी किनारदार.	१
१५०	किनखाप.	१
३०	शेले साधे धुवट २ दर १५.	२
४२०		५

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

७२।१२५ दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सालमजकुरापासून करार करून दिल्हा. येविसी छ ३ रमजान सनदापत्रें.

इ. स. १८००–०१
इहिदे मयातैन व अलफ;
मोहरम २२

३ परगणे हवेली विजापूर व परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल परशराम पंडित प्रतिनिधी यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्यांजकडून दूर करून मशारनिल्हेकडे हरदु महालांचा सदरहू अमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

१ परशराम पंडित प्रतिनिधी यांस कीं, सदरहू महालचीं ठाणीं मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घ्यावें ह्मणोन.

२ रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन हरदु महालाचे जमीदारांस सनदा.

३

२ परगणे देवासें प्रांत माळवा, येथील बाबतीखेरीजकरून दरोबस्त अंमलपैकीं निमे अंमल तुकोजी पवार यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्याजकडून दूर करून मशारनिल्हेकडे परगणे मजकूरचा सदरहू अंमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

---

71. Amritrao Saheb went to Daulatrao Scindia's tent on the occasion of
A. D. 1799-1800. the Gokul Ashtami festival.

72. The following Saranjam was taken from its holders and conferred on
A. D. 1800-1801. Daulatrao Scindia.

1 Pargana Haveli Bijapur and Pargana Bagewadi—taken from Parasharam Pandit Pratinidhi.

1 Half the Amal in Pargana Dewas, taken from Tukoji Powar.

1 Pargana Sarangpur in Prant Malwa taken from Tukoji Powar and Sadoji Powar.

१ तुकोजी पवार यांस कीं, परगणे मजकुरचे ठाणें मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणे. ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन.

२ परगणे सारंगपूर प्रांत माळवा येथील बाबतीखेरीजकरून दरोबस्त अंमल तुकोजी पवार, व सदाशिव पवार, यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. तो त्यांजकडून दूर करून, मशारनिल्हेकडे परगणेमजकुरचा सदरहू अंमल करार करून दिल्हा. येविसी सनदा.

१ तुकोजी पवार व सदाशिव पवार यांस कीं, परगणेमजकूरचे ठाणें मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें. ह्मणोन.

१ जमीदार परगणे मजकूर यांस कीं, रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. म्हणोन.

२

७ रसानगीयाद.

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

इ० स० १८००–०१ इहिदे, मया तैन व अलफ मोहरम २२.

७३।० दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांचे नांवे सनद कीं, महाल बीत तपसील.

१ परगणे हवेली विजापूर येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल.

१ परगणे गोटे येथील दुमालेगांव खेरीज करून तिजाईचा व बाबतीचा अंमल.

१ परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल.

येकूण तीन महालांचा सदरहू अंमल परशराम पंडित प्रनिनिधी यांजकडे फौजेचे संरजामास होता. तो सालमजकुरीं तुह्मांकडे संरजामास लावून दिल्हा आहे, तो दूर करून महालांनिहायचा लिहिल्याप्रमाणें अंमल पंडित मशारनिल्हे यांजकडे फौजेचे संरजामास पेशजीप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी सदरहू महालची ठाणीं त्यांचे हवालीं करून कबज घेणें. म्हणोन. सनद १.

येविसी जमीदार यांस कीं, पंडित यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनदा ३.

१ परगणे हवेली विजापूर येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमालेगांव खेरीजकरून दरोबस्त अंमल येविसी.

A. D. 1800-1801

73. The Parganas of Haveli Bijapur, Gote, and Bagewadi were taken back from Scindia and ordered to be restored to Pratinidhi.

१ परगणे बागेवाडी येथील सरदेशमुखी व बाबती व नाडगौडी व दुमाले गांव खेरीजकरून दरोबस्त अंमल येविसी.

१ परगणे गोट येथील दुमालेगांव खेरीजकरून तिजाईचा व बाबतीचा अंमल येविसी.

३ ४

रसानगी याद छ २२ जिलकाद.

बाळोजी कुंजरच्या कीर्दीपैकीं.

७४।१२६ देहाय येथील अंमल पेशजीचे अंमलदार यांजकडे चालत होता. तो त्यांजकडून दूर करून सालमजकुरीं दौलतराव शिंदे अलीजाबहादुर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम करार करून दिल्हा. येविसी छ २४ सवाल. सनदा.

इ. स. १८००-०१ इहिदे मयातैन व अलफ; मोहरम २२

बाळोजी कुंजीराच्या कीर्दीपैकीं.

७५।१५१ काशिराव होळकर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम व इनाम चालत आहे. त्यास मशारनिल्हेस दौलतराव शिंदे आलीजाबाहादर यांजकडे जाण्याची सरकार आज्ञा असतां गेले नाहींत. सबब सरंजाम व इनामाची जप्ती सरकारांत करून, जप्तीची कमावीस कमावीसदार यांजकडे सांगितली असे. तरी यासी रुजु होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन छ २० जमादिलावल. सनदा.

इ० स० १८०१-०२ इसन्ने मयातैन व अलफ. जमादिलावल २०.

७६।१५२ काशिराव होळकर यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम व इनाम चालत आहे. त्यास मशारनिल्हेस दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांजकडे जाण्याची सरकार आज्ञा असतां गेले नाहींत. सबब सरंजाम व इनामाची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमाविस लोकाकडे सांगितलेली होती. त्यास हल्लीं पेशजीप्रमाणें सरंजाम व इनाम काशिराव होळकर यांजकडे चालवावयाचा करून जप्ती मोकळी केली असे. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन जमीदार व मोकदमास पत्रें.

इ० स० १८०१-०२ इसने मया तैन व अलफ. सफर ३.

७७।१५३ गुजराथ प्रांतीं होळकर यांजकडील फौज व पायदळ जाऊन सरकारचे

A. D. 1800-1801. 74. The Amal in few villages in Deccan was also given to Daulatrao Scindia as Military Saranjam.

A. D. 1801-1802. 75. Kashirao Holkar having failed to join Daulatrao Scindia as directed by Government, his Saranjam and Inam were ordered to be attached.

A. D. 1801-1802. 76. The above attachment was ordered to be removed.

इ० स० १८०२-०३ सल्लास मया तैन व अलफ. रबिलाखर २६.

महालांपैकीं सरभुवन व परगणे बलवड यांस उपद्रव केला. ह्मणोन तुह्मीं हुजूर विदित केलें. त्यास गुजराथेंत फौज व पायदळ जाण्याचे मार्ग असतील ते झाडून बंद करावयाकरितां, सरसुभाकडे स्वार व गाडदी व प्यादे यांची नेमणूक आहे; त्याखेरीज जास्ती स्वार व गाडदी नेमून दिल्हे असेत. तरी हे, व राजे रजवाडे, व गायकवाड, व बावचे वगैरे सामील होऊन सरकार लक्ष राखोन सरकार तालुक्यांस काडीमात्र उपद्रव न होतां घांटमाथा सदरेवर सरंजाम पाठऊन, गुजराथ प्रांतीचे झाडून मार्ग बंद करून, मुलखास होळकराकडील उपद्रव लागो न देणें. गायकवाड व संस्थानिक यांस येविसी अलाहिदा पत्रें सादर केलीं आहेत. ह्मणोन आनंदराव रामचंद्र सरसुभा प्रांत मजकूर यांचे नांवें सनद. रसानगी.

७८।२४२ रामचंद्र बल्लाळ यांचें नांवें पत्र कीं, तुम्हीं चैत्र वद्य पंचमी सालगुदस्त

इ. स. १८१३-१४. आर्बा अशर मयातैन व अलफ. रजब २०

सन सल्लास अशर मयातैनचें विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. परगणे भवरासे वगैरे महाल व ठाणें मल्हारगड येथील मामलतीच्या सनदा माझे नांवें व मामलतीचा बंदोबस्त करून देण्याविसी दौलतराव शिंदे अलीजाबहादर व मल्हारराव होळकर व बाळोजी कुंजर यांस, सरकारचीं पत्रें व मेस्त्र आलपिस्टिन (मि. एलफिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर पुणीयांत आहेत त्यांचे पत्र दौलतराव शिंदे यांचें लष्करांत इंग्रजाकडलि वकील आहेत त्यांस, याप्रमाणें पाठविलीं. तीं पत्रें कारकुनाबरोबर शिंदे व होळकर व कुंजर व शिंदे यांचे लष्करांत इंग्रजाकडील वकील आहेत त्यांजकडे पाठविलीं. परंतु महालचा व ठाणें मल्हारगडचा बंदोबस्त होत नाहीं. व सरवरखान पठाण दिमत होळकर यानें परगणे भवरासे व परगणे मुगावली व ठाणें मल्हारगड येथें दंगा करून आपला अंमल बसविला आहे. याजकरितां हल्लीं दुसरीं सरकारचीं पत्रें शिंदे व कुंजर यांस महालचा व ठाण्यांचा अंमल बसवून देवण्याविसी, व परगणे भवरासे व परगणें मुगावली व ठाणें मल्हारगडचा अंमल सरवरखान पठाण यास ताकीद करून सदरहु

---

77. Anandrao Ramchandra Sir Subha of Gujerath reported that the army of Holkar made in roads in the Parganas of Serbhoovan and Balwad and oppressed the territory. Additional men were therefore sent for the protection of the province, and the Rajas of the province, the Gaikwad, and the Bawaches were requested to affored them full assistance and to guard the roads leading into the province against Holkar.

A. D. 1802-1803.

78. At Ramchandra Ballal's request, letters were sent by the Peshwa to Daulatrao Scindia, Malhar rao Holkar, and Baloji Kunjir, asking them to bestow Pargana Bhavarase and the Thana of Malhargad in mamlat to him (Ramchandra). A letter to the same effect was sent by Mr. Elphinstan to the English Agent with Daulatrao Scindia. The request was not complied with and Sarwarkhan Pathan in the service of Holkar usurped the Pargana Bhavarase &c Letters as above were again issued at the request of Ramchandra.

A. D. 1813-14.

महाल व ठाणें जकिरासुद्धां माझे हवालीं करण्याविसी मल्हारराव होळकर यांस व पुणीयांतील इंग्रजाचें पत्र शिंदे यांचे लष्करांत इंग्रजांकडील वकील आहेत त्यांस, याप्रमाणें पाठविलीं पाहिजेत. ह्मणोन तुमचे विनंतिपत्र आलें. त्याजवरून दौलतराव शिंदे अलीजाबहादर व मल्हारराव होळकर व कुंजर यांस सरकारचीं पत्रें, व अलफिस्टन वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर याचें पत्र शिंदे याचें लष्करांत इंग्रजांकडील वकील आहे त्यांस, सदरहू महाल व ठाण्याचे बंदोबस्ताविसी पाठविलीं आहेत. हीं ज्यांचीं त्यांस देऊन तुह्मीं सरकारचा अंमल परगणे भवरासें वगैरे महालचा व ठाणें मल्हारगडचा बसवून बंदोबस्त यथास्थित करून विनंतिपत्र हुजूर पाठवावें. ह्मणून पत्र १.

रसानगीयादी.

राजकीय (ब) इतर माहिती.

—:०*०:—

(९) विंचूरकर.

रत्नशालेपैकीं.

७९।१८० देणें, नरसिंह खंडेराव विंचूरकर यांस स्वारीस पाठविले. सबब निरोपसमयीं विद्यमान खासा शुक्रवारचे वाड्यांत रूबरू पाहोन दिल्हे.

इ. स. १८०४–०५ खमस मयातैन व अलफ; रबिलावल १२

किंमत रुपये.

२२७०॥।॥ ऐन.
५६७॥≡ सवाई.

२८३८।≡॥

खाशांस कंठी मोत्याची. बाबद सावळ भक्ती साहुकारपैकीं किंमत रुपये.

१६६०।≡॥ ऐन.
४१५‍८ ॥। सवाई.

२०७५॥।

शहत.

६ धुगधुगीस घांट साधा किंमत रुपये.
४४८॥।

५ हिरे.
१ पांच. मणीलोलक, वजन रती १४॥।

६

79. Jewelery worth Rs. 2838 was presented to Narsinh Khanderao Vinchurkar when proceediug on a campaign. A. D. 1804-1805.

५६ मोत्यें, माळेस वजन टांक ६।३॥। चव २४२।~॥ किंमत रुपये १२११॥≡॥.

६२

एकूण दागीना १.

रुपये.

बाळाजी लक्ष्मण यांस चौकडा मोत्यांचा किंमत

६१०।~ ऐन.

१५२॥~। सवाई.

७६२॥।=।

मोत्यें बाबद खरेदी वजीर चंद जोहरी पैकीं वजन रती १०॥≈ येकूण खंडीत किंमत. रुपये ६००.

मोत्यें ४

वजन तोळे सोनें पिंपळ्यास व कोंड्यास शिलकी दर तोळा रुपये १५ प्रमाणें. १०।~ रुपये.

एकूण तोळे. -॥=।

खाजगत खर्च, खासी (खाशाची) आंगठी हिऱ्याची खासगीकडील. त्याचे दांडीचा पाचकिर्डा हारवला, सबब दुसरा लाविला. पाचकिर्डा शिलकी वजन रती ८≈ येकूण दर रतीस रुपये ५ प्रमाणें रुपये. ॥≈ पाचकीर्डा १.

लागवडखर्च दागिन्यांचे लोलक तुटले, त्यांस व नथांस वगैरे वजन लागलें तें किंमत. -॥।-॥। सोने तोळे.

८०।२०३ देणें विठ्ठलराव नरसिंह, नरसिंह खंडेराव यांचे पुत्र, नरसिंह खंडेराव मृत्यु पावले सबब मशारनिल्हेचे दत्तविधान करून सरदारीचीं वस्त्रें दिल्हीं. त्याजवर विद्यमान राजश्री बाबासाहेब यांनीं शुक्रवारचे वाड्यांत रुबरू पाहून दिल्हा. शिरपेच घांट साधा. बाबत लक्ष्मीबाई प्रतिनिधी पैकीं, छ ६ रबिलावल खमस मयातैन, किंमत रुपये.

इ. स. १८०६–०७
सबा मयातैन व अलफ;
सफर ३०

६०० शिरपेच.

१५० सवाई.

७५०

शहत.

एकूण

७९ हिरे व हिरकण्या.

१ पाच, मणी व लोलक.

८०

जडाव दागिना १.

80. Narsinh Khanderao having died, Vithalrao was allowed to be adopted as his son and was invested with the dignity of his father.

A. D. 1806-1807.

राजकीय (व) इतर माहिती.

(१०) पटवर्धन.

८१।२० किल्ले महिमानगड तर्फ देवरुख महाल परशुराम रामचंद्र यांजकडे होता. तो सरकारांत जप्त करून किल्ल्याचे व महालाचे बंदोबस्तास सरकारांतून शिवाजी बल्लाळ यासमागमें लोक देऊन पाठविले आहेत. त्यांस लोक सुद्धां किल्ल्यावर घेणें. ह्मणोन तुम्हांस पेशजी सनद सादर जहाली आहे. ऐशास तुह्मीं सरकार लक्ष राखोन आहा. येविसी मशारनिल्हेनीं लिहिलें. याजवरून हें अभयपत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी किल्ले मजकूर जाकिरासुद्धां व किल्ल्याचे बेगमीस तर्फ मजकूर हा महाल आहे, तो व परशुराम रामचंद्र यांची वस्तवानी नक्त रोकड वगैरे जे किल्ल्यावर असेल, ते जराबाजरा शिवाजी बल्लाळ यांचे हवालीं करून कबज घेणें. आणि तुह्मीं कोणेविसी वसवसा न धरितां निघोन हुजूर येणें. ह्मणोन भगवंतराव मोहिते हवालदार किल्ले मजकूर यांस.

इ. स. १७९६-९७
सबा तिसेन मया व अलफ;
जमादिलावल २५

सनद १.

गोंदजी भुजबळराव सरनोबत किल्लेमजकूर यांस कीं, परशुराम रामचंद्र यांची वस्तवानी, नक्त, रोकड वगैरे जे किल्यावर असेल तें जराबाजरा व किल्ला शिवाजी बल्लाळ यांचे हवालीं करणें. हे किल्लेमजकूरचा व किल्ल्याचे बेगमीस देवरुख महाल आहे त्याचा बंदोबस्त करितील. तुह्मीं कोणेविसी वसवसा न धारितां निघोन हुजूर येणें. ह्मणोन सदरहू अन्वयें.

सनद १.

२

दोन सनदा दिल्या असेत छ २७ जमादिलावल परवानगी रुबरू. [ह्या महिन्यांत त्यांचीं दुसरीं ठाणीं सरकार हुकुमावरून जप्त झालीं.]

८२।२३८ परशुराम रामचंद्र यांजकडे जातीस व फौजेचे बेगमीस महाल व गांवचा अंमल वगैरे सरंजामास चालत होता. त्यास ते मृत्यू पावल्यावर महाल व गांवचा अंमल त्यांचे पुत्र रामचंद्र परशुराम करीत आहेत. त्यांपैकीं त्यांजकडून महाल व गांवचा अंमल दूर करून साल मजकूरी परशुराम रामचंद्र यांचे धाकटे पुत्र गणपतराव परशुराम यांजकडे जातीस व फौजेचे बेगमीबद्दल सरंजामास लाऊन देविला. त्यास महाल व गांवची वगैरे बेरीज रुपये.

इ० स० १८११-१२
इन्ने अशर मया तैन व अलफ
सफर ५

---

81. The fort of Mahipatgad in tarf Dewrukh under the management of Parasharam Ramchandra was ordered to be attached. (His other possessions were also ordered to be attached in this month.)

A. D. 1796-97.

82. A portion of the Saranjam continued to Ramchandra Parasharam after his father Parasharam Ramchandra's death was now made over to his younger brother Ganpatrao Parasharam.

A. D. 1811-12.

१७२८९९॥≡ प्रांत कर्नाटक पैकीं.

१२१६७५॥ परगणे मुळगुंद येथील खेरीज दुमाले व नेमणुका करून अमलाची बेरीज.

१३२२४८≡ कसबे इंगळहळी येथील खेरीज नेमणुका करून अमलाची बेरीज.

३८००० परगणे यादवाडपैकीं गांव कसबे मजकुर सुद्धां अडतीस हजार रुपये बेरजेचे.

१७२८९९॥≡

४६२३ परगणें जमखिंडीपैकीं खेरीज कसबे मजकुर ठाणें सुद्धां करून चार हजार सहाशें तेवीस रुपये बेरजेचे गांव.

११९९७। मौजे पळूस तर्फ वाळवें येथील खेरीज दुमाले जमीन करून, अमलाची बेरीज.

४००० कसबे भिलवडी प्रांत मिरज येथील खेरीज दुमाले जमीन करून, निम्मे अमलाची बेरीज सरंजामास लागली आहे. ते रुपये ८००० पैकीं निमे चार हजार, व कसबे मजकुरचे निमें कुरण सरंजामास आहे त्या पैकीं निमें.

१५६७ परगणे कासेगांव पैकीं देहेखेरीज हिसेदार व दुमाले जमीन करून.

मौजे गोपाळपूर.

मौजे टाकळी.

१५६७

३००० मौजे अकलखोप प्रांत पन्हाला येथील निमे अमल व दरोबस्त सरदेशमुखी मिळोन बेरीज लागली नाहीं, सबब अजमासें धरिली आहे. त्यास पुढें कमजास्त होईल तशी धरावी.

१३९०९।– कर्यांत तासगांव पैकीं गांव कसबे मजकुरासुद्धां तेरा हजार नऊशें सवा नऊ रुपये येक आणा बेरजेचे.

१०००० संस्थान सुरापूर येथील खंडणीपैकीं तीस हजार रुपये सरकारांत बेरीज धरिली आहे. त्यापैकीं तिजाई. रुपये.

२२१९९६।

येकूण दोन लक्ष येकवीस हजार नऊशें सवा शाहणव रुपये बेरजेचे महाल व गांव वगैरे सदरहूप्रमाणें सरंजामास लाऊन देविले. येविसी सनदा.

१ रामचंद्र परशुराम यांस, कीं वर लिहिल्याप्रमाणें महाल व गांवचा अमल ठाणीं यांचे हवालीं करून कबज घेणें म्हणून.

१० जमीदार व मोकदम गांवगन्नांचे यांस, कीं यांसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन. सनदा.

१ परगणे मुळगुंद येथील जमीदारांस.

१ परगणे यादवाड पैकीं कसबे मजकुरसुद्धां अडतीस हजार रुपये बेरजेचे गांव येविसी जमीदारास.

१ परगणे जमखिंडीपैकीं खेरीज कसबे मजकूर ठाणें सुद्धां करून चार हजार सहाशें तेवीस रुपये बेरजेचे गांव येविसी जमीदारांस.

१ कर्यात तासगांव पैकीं कसबे मजकूर सुद्धां तेरा हजार नऊशें सबानऊ रुपये येक आणा बेरजेचे गांव येविसी जमीदारांस.

१ कसबे इंगळहळी येविसी मोकदम यांस.

१ मौजे पळूस तर्फ वाळवे येविसी मोकदम यांस.

१ कसबे भिलवडी प्रांत मिरज येथील चार हजार रुपये व कुरण निमेपैकीं येविसी मोकदम यांस.

२ मौजे गोपाळपूर व मौजे टाकळी परगणे कासेगांव यांविसीं मोकदम यांस.

१ मौजे अक्कलखोप प्रांत पन्हाळा येथील निमे अमल व दरोबस्त सरदेशमुखी येविसी मोकदम यांस.

१०

११ अकरा सनदा दिल्ह्या असेत. रसानगी यादी.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(११) रास्ते.

इ० स० १८००-०१ इहिदे मयातैन व अलफ जिलकाद १६

८३।१२१ किल्ले पांडवगड सरंजामाचे गांवसुद्धां आनंदराव भिकाजी यांचे निसबतीस होता. ते मृत्यु पावले. त्यांचे पुत्र माधवराव अनंत हे सरकारचे अपराधी, सबब किल्ले मजकूर सरंजामाचे गांव सुद्धां सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितली असे, तरी तुम्हीं मशारनिल्हेचे रजातलबेंत वर्तोन सरकार लक्ष राखोन अलंग, नौबत, चौकीपहारे यांचा बंदोबस्त यथास्थित करीत जाणें. ह्मणोन हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचे नांवें

सनद.

परवानगीरूबरू

८४।१३५ माधवराव अनंत रास्ते यांचीं मुलें किल्ले कोरीगडाहून निघाली ह्मणोन

A. D. 1800-1801.

83. The fort of Pandavgad with the Saranjam attached to it was in the possession of Anandrao Bhikaji. He was dead and his son Madhavrao Anant was under the displeasure of Government. The fort and the Saranjam were therefore attached and made over for management to Baloji Kunjir.

इ० स० १८०१-०२ इसने मयातैन व अलफ. रजब ६

अकबार आली त्यास तुम्हीं नाक्यास चौक्या बसऊन बंदोबस्त चांगला राखून त्यामार्गें जाऊं लागल्यास हस्तगत करून, पक्या बंदोबस्तानें हुजूर पोहचाऊन देणें तुह्मांकडील तालुक्यांतून गेल्यास कार्यास येणार नाहीं. ह्मणोन तालुकेहाय व किल्लेहाय येथील मामलेदार यांचे नांवें सनदा.

२३ प्रांत कोंकण, येथील मामलेदार यांस सनदा.

२ तालुके वसई व मामले कोहज.

१ महालानिहाय, निसबत खंडेराव निळंकठ यांस.

१ किल्लेहाय, निसबत केशवराव जगन्नाथ यांस.

२

२ प्रांत कल्ल्याण भिवंडी व तालुके नेरळ यांस.

१ महालानिहाय, निजबत बापूजी बल्लाळ यांस.

१ किल्लेहाय प्रांत कल्लयाण, निसबत नारो बल्लाळ यांस.

२

१ तालुके कर्नाळा, व तालुके आठगांव, निसबत रघुनाथ धोंडदेव यांस.

१ किल्लेमाहुली, निसबत भगवंतराव शिंदे.

२ प्रांत राजपुरी.

१ महालानिहाय, निसबत विठ्ठल जयराम.

१ किल्लेहाय, निसबत आपाजी रामचंद्र.

२

१ तालुके अवचितगड व बीरवाडी, निसबत कृष्णाजी बल्लाळ.

१ तालुके रायगड व तालुके सुवर्णगड, निसबत बाळोजी कुंजीर.

२ तालुके अंजनवेल.

१ महालानिहाय, निसबत रघुनाथ त्रिंबक.

१ किल्लेहाय, निसबत बाबुराव कृष्ण.

२

२ तालुके रत्नागिरी.

१ महाला निहाय, निसबत मोरो अनंत व विठ्ठल नारायण.

१ किल्ले हाय, निसबत भास्करराव जगन्नाथ.

२

---

84. The children of Madhavrao Anant Raste, having escaped from the fort of Korigad, orders were issued to the Mamlatdars of Konkan to be on the look out and to arrest them, if they entered their charge.

A. D. 1801-1802.

१ किल्ले महिपतगड निसबत आपाजी शिंदे.
१ तालुके विजयदुर्ग निसबत बापूजी यास.
१ तालुके सोदन महाल निसबत आनंदराव धुळप.
१ तालुके देवगड निसबत सदाशिव जयराम.
१ प्रांत बेलापूर निसबत त्रिंबक गणेश.
१ तालुके सरसगड निसबत विठोजी गायकवाड.
१ परगणे सांकसें निसबत नारो रामचंद्र व पुरुषोत्तम भास्कर.
१ तालुके उंदेरी निसबत आपाजी बापूजी व महादाजी निळकंठ.
१ तालुके रेवदंडा निसबत बळवंतराव रामचंद्र.

२३

१ किल्ले प्रतापगड निसबत बाळाजी रघुनाथ, यांस सनद.
१ तालुके राजमाची निसबत नारायण रामचंद्र.

२५

रसानगीयादी.

बाळोजी कुंजिराच्या कीर्दीपैकीं.

इ. स. १८०२–३
इसने मयातैन व अलफ; जमादिलावर २१

८९।१९० सरकारचे अपराधी सबब कैद करून समागमे बंदोबस्तास स्वार व गारदी देऊन पाठविले आहेत. तरी यांस राहावयास घर निवाऱ्याचें पाहून देऊन पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शिधा उत्तम प्रत देत जाणें. व यांचे चाकरीस ब्राह्मण व आचारी चांगला पाहून स्वयंपाकास ठेऊन देणें. व यांच्या हजामती करवीत जाणें. यांचे शरीर प्रकृतीविसी जपून निगा चांगली करीत जाणें. हे तेथें पोंहचल्यावर स्वार व गाडदी माघारे पाठऊन देणें. ह्मणोन

सनदा.

१ तालुके रायगड निसबत बाळोजी कुंजीर यांस कीं, माधवराव अनंत रास्ते यांस किल्ले मजकूर येथें ठेवणें. व यांचे चाकरीस ब्राह्मण व आचारी स्वयंपाकास चांगला पाहून ठेऊन देणें. ह्मणोन सनद.

१ तालुके सरसगड उर्फ पाळनी निसबत विठोजी गायकवाड यांस कीं,

असामी

१ बळवंतराव माधव, माधवराव अनंत रास्ते यांचे पुत्र.
१ शामराव लक्ष्मण, लक्ष्मणराव भिकाजी रास्ते यांचे पुत्र.

२

A. D. 1801-1802.

85. Madhavrao Anant Raste was sent for imprisonment in the fort of Raygad. His son Balwantrao and Laxman Bhikaji Raste's son Shamarao, was sent to fort Sarasgad.

येकूण दोन, असामी किल्ले सरसगड, तालुके मजकूर येथें ठेवणें, व यांचे चाकरीस ब्राह्मण व स्वयंपाक करावयास आचारी चांगला पाहून ठेऊन देणें ह्मणोन. सनद.

१ किल्ले सिंहगड निसबत नारो गोविंद यांस कीं, कृष्णाजी अनंत ढेकणे दिमत माधवराव अनंत रास्ते यांस किल्ले मजकुरीं ठेवणें. यांचे चाकरीस व स्वयंपाकास ब्राह्मण असामी ठेऊन देणें. ह्मणोन सनद.

१ तालुके शिवनेर निसबत रामचंद्र नारायण यांस कीं, सदाशिव रघुनाथ गद्रे यांस किल्ले चावड तालुके मजकूर येथें ठेवणें. यांचे चाकरीस व स्वयंपाकास ब्राह्मण असामी येक ठेऊन देणें. ह्मणोन सनद.

४

छ २१ जमादिलावल, रसानगी याद.

राजकीय. (ब) इतर माहिती.

(१२) बाळाजी जनार्दन.

८६|५५ बाळाजी जनार्दन यांचे व त्यांजकडील कारकून व त्यांजकडे मिलाफी यांचे निसबतीस प्रांत कर्नाटक येथील सरसुभ्याकडे वगैरे महालीं असाम्या दरकी वगैरे असतील त्यांची चौकशी करून सदरहूची जप्ती करून ऐवज सरसुभाकडील हिशेबीं जमा करणें. ह्मणोन मोरो बापूजी यांचे नांवें सनद. १.

इ० स० १७९७–९८
समान तिसेन मया व अलफ,
रजब २०

रसानगी मोरो बापूजी फडके.

८७|७३ राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम होता त्याची जप्ती सरकारांत केली होती. ते हल्लीं मोकळी केली असे. तरी मशार निल्हे कडील कमावीसदारासी रुजू होऊन अंमल सुरळीत देत जाणें. ह्मणोन चिटणीसी पत्रें.

इ. स. १७९८--९९.
तिसा तिसेन मया व अलफ,
रबिलावल २१.

१ व्यंकटराव नारायण सरसुभा प्रांत खानदेश यांस.
 १ परगणा चोपडे.
 १ परगणा जळोदे देखील मौजे पातोडे व मौजे रोळवद मिळोन.

---

86. The offices in Karnatic held by Balaji Janardan, his Karkuns, and dependents were ordered to be attached.
A. D. 1797-98.

87. The military Saranjam of Balaji Janardan was formerly attached. It was now released from attachment and orders were issued to the various officers to pay the revenues of the Saranjam to Balaji's Kamavisdars.
A. D. 1798-99.

१ परगणा भामेर.
१ मौजे मुडी परगणा डांगरी.

४

येकूण तीन महाल व येक गांवाविसीं. पत्रें.

३ देशमुख व देशपांडे यांस.

१ परगणा जळोदे.
१ परगणा चोपडें.
१ परगणा भामेर.

३

१ मोकदम मौजे मुडी परगणा डांगरी प्रांत खानदेश यांस. पत्रें.
१ पोरा कोतूळ सरकार जुन्नर येथील देशमुख व देशपांडे यांस. पत्रें.

६

इ. स. १७९८–९९.
तीसा तिसेन मया व अलफ रबिलाखर ४

८८।७५ बाळाजी बाजीराव यांचे नांवें सनद कीं, सरकारचे जवाहीरखान्यापैकीं दागीने व जामदारखान्यापैकीं सनंगें किल्ले सिंहगड येथें ठेविलीं आहेत. त्यांत राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांचे जप्ती बद्दल जवाहिराचे व सोनें रुप्याचे दागीने व सनंगें आहेत. तीं पुण्यास आणावकरितां रुद्राजी नारायण व अंताजी गणेश कारकून निसबत दप्तर, व धोंडजी कांबळ व शिदोजी काव्या वें बहिरजी चव्हाण खिजमतगार, यांस पाठविले आहेत. हे दागीने व सनंगें काढून ओझीं बांधितील, तीं ओझीं तुम्हीं किल्ल्यावरील लोक देऊन किल्ल्याखालीं उतरोन बलवंतराव कृष्ण यांजकडील पथक व धाको गोविंद कारकून व मनोहरगीर गोसावी याजकडील गाडदी पाठविले आहेत, यांचे स्वाधीन करणें. ते पुण्यास घेऊन येतील म्हणोन.

सनद १.

रसानगी नारो शिवराम कारकून निसबद दप्तर.

जमाजामदारखाना.

इ. स. १७९८–९९.
तिसा तिसेन मया व अलफ. जिल्काद २

८९।९१ कमावीस भेट. राजश्री आपासाहेब यांसी बरहुकूम राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांचें घरीं मेजवानीस गेले, ते समयीं पोशाक दिल्हा. तो गुजारत रामजी जोरी खिजमतगार. सनंगें एकूण.

		रुपये.
८०	तिवट छिटी	१
३५०	दुपेटा छिटी	१

A. D. 1798-99. 88. The jewelry, silver and golden ornments, and valuable clothing of Balaji Janardan Fadnis, which was attached and kept at fort Sinhgad was ordered to be sent to Poona.

A. D. 1798-99. 89. Appasaheb went to a dinner party at Balaji Janardan Fadnis' house.

३५ शेले साधे धुवट.	२
७५ किनखाप लाल.	१
५४०	५

९०।१०४ कमावीस भेट. राजश्री आपासाहेब यांसी बाबद. राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांचे घरीं रोजगुदस्ता स्वारी गेली. ते समयीं पोशाक दिल्हा तो गुजारत रामजी जोरी खिजमतगार.

इ. स. १७९९ १८०० मयातैन व अलफ सवाल ८

सनंगें एकूण रुपये.

३० तिवट पैठणी नारंगी.	१
२५० दुपेटा पैठणी असावली किनारदार	१
४० शेला साधा धुवट बंगाली.	१
१७९ किनखाप हिरवा सुरती.	१
४९५	४

९१।१०६ बाळाजी जनार्दन यास ज्वर येऊन फाल्गुन वद्य तृतीया गुरुवारीं रात्रौ देवाज्ञा जाहली. ईश्वरेच्छेस इलाज नाहीं. त्यास किल्ह्याचा बंदोबस्त चांगला राखून तेथें यांची वस्तभाव वगैरे जें काय आहे तें अफरा तफरी न होतां इमानें इतबारें बंदोबस्तानें ठेवणें. या कामास सरकारांतून खिजमतगार पाठविले आहेत त्यांस किल्ल्याचे दरवाज्यावर बंदोबस्तास ठेवणें. म्हणोन सनदा.

इ. स. १७९९–१८०० मयातैन व अलफ. सवाल १७

१ धोंडो बल्लाळ किल्ले लोहोगड यांस कीं, दुलाजी शिंदा व हसोजी झबका खिजमतगार असामी दोन पाठविले आहेत येविसी.

१ माहादाजीराम किल्ले केळजा यांस कीं, मोराजी मगर व अबाजी पवार खिजमतगार असामी दोन पाठविले आहेत येविसी.

२

परवानगी रुबरु.

९२।११२ बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडे सरंजाम इनामगांव व जमिनी व कुरणें

A. D. 1799-1800. 90. Appasaheb went to Balaji Janardan Fadnis' house and received presents of clothes.

A. D. 1799-1800. 91. Balaji Janardan died of fever at night on Thursday the 3rd of Falgun Vadya. The officers of the forts of Lohogad and Kelja, were directed to keep order at the forts and to take care of all the property left there by the deceased.

इ० स० १८००-०१ इहिदे मया तैन व अलफ. रविलावल २०.

चालत होतीं. त्यास ते मृत्यु पावले सबब गांव व जमीनी व कुरणें सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितली असे. तरी यासी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें, व जमीन व कुरणें मशार निल्हेकडे चालवणें. ह्मणोन मोकदम यांस व जमीदार वगैरे यांस.

सनदा व पत्रें.

६ जातीस सरंजाम गांव येविसी.

२ मौजे भोसे तर्फ चाकण प्रांत जुन्नर येथील दरोबस्त अंमल जातीस येविसी.

१ मोकदम मौजे मजकूर यांस सनद.

१ जमीदार तर्फ मजकुर यांस पत्र.

२

४ पालखीचे सरंजामास गांव येविसी.

१ मौजे रोटवद परगणे जळोद येथील दरोबस्त अंमलापैकीं निमे अंमल येविसी मोकदम यास.

३ मौजे मुंडी परगणे डांगरी येथील मोकासाखेरीज करून दरोबस्त अमलापैकीं निमे अमल येविसी.

१ मोकदम मौजे मजकूर यास सनद.

१ जमीदार परगणे मजकूर यांस पत्र.

१ कमावीसदार दिमत बाळाजी जनार्दन यांस कीं, मौजे मजकूरचा सदरहू अंमल मशारनिल्हेचे हवालीं करणें. हे अंमल करितील ह्मणोन सनद.

३

४

६

९ इनाम गांव व जमीनी सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस मशारनिल्हेकडे सांगोन गांवचा व जमीनीचा ऐवज बाळाजी जनार्दन यांचे स्त्रीकडे खर्चास देविला येविसी.

२ मौजे वाकसई तर्फ नाणें मावळ येथील दरोबस्त अंमलापैकीं निमे अमल येविसी.

A. D. 1800-1801. 92. Balaji Janardan Fadnis having died, his Saranjam, Inam villages, and lands were handed over for management to Baloji Kunjar.

१ मोकदम मौजे मजकूर यास सनद.
१ जमीदार तर्फ मजकूर यांस पत्र.
२

५ संमत हवेली प्रांत वाईपैकीं.

मौजे मेणवली येथील	जमीन	चावर
दरोबस्त अमल १	कसबे बावधन पैकीं	·।।।·
	मौजे कपूरपैकीं	·।·
	मौजे येकसरपैकीं	·।।·
		१।।

येकूण येक गांव दीड चावर जमीन येविसी. सनदा.
४ मोकदम देहाय यांचे नांवें
१ जमीदार प्रांत मजकूर यांस. पत्र.
५

९ (कांहीं चूक आहे.)

२ कुरणाविसी मोकदम यांस सनदा.
१ मौजे पाडळी तर्फ खेड प्रांत जुन्नर येथील कुरण येविसी.
१ कसबें चाकण तर्फ मजकूर प्रांत जुन्नर येथील शिवेचें कुरण येविसी.
२

१७ रसानगी चिंतो वामन कारकून निसबत दप्तर.

९३।११९ बाळोजी कुंजीर यास पेठ सदाशिव शहर पुणें येथें बाळाजी जनार्दन फडणीस यांजकडील वाडा सरकारांत जप्तीस आहे, तो हल्लीं राहण्याकरितां दिल्हा आहे. त्यास वाड्यानजीक पाण्याचा हौद आहे, त्या नहरांपैकीं हाताचे करांगुलिपुढील पेराचे बेताप्रमाणें पाणी मशार निल्हे यास देविलें असें. तरी सदरहू करांगुलीचे बेताप्रमाणें नहरास तोटी लाऊन नहर बांधून वाड्यांत पाणी नेतील त्यास नेऊं देणें. ह्मणोन आपाजीराम कमावीसदार पेठ मजकूर यांचे नांवें. सनद १.

इ. स. १८००–०१
इहिदे मयातैन व अलफ;
जमादिलावल २१.

रसानगीयाद.

९४।१३९ श्री भीमाशंकर देव याचें देवालयाचें काम बाळाजी जनार्दन यांनीं ला-

93. A house in Sadashiv Peth belonging to Balaji Janardan Fadnis, which was attached by Government was given for residence to Baloji Kunjir and permission was accorded to his conveying water by means of a pipe of the circumference of a finger out of the cestern adjoining the house.

A. D, 1800-1801.

इ० स० १८०१–०२ इसने मया तैन व अलफ. सवाल १७.

विलें होतें. त्यास देवालयाचें काम पानापर्यंत होऊन शिखराचे पांच सात थर तयार झाले आहेत. पुढें शिखराचें काम कळस पावेतों करावयाचें ह्मणोन अंताजी येशवंत बाळाजी जनार्दन यांजकडून देवालयाचें कामावर आहेत, त्यांणीं हुजूर विदित केलें. त्यास देवालयाचें काम जाहलें पाहिजे याजकरितां देवालयाचें कामास रुपये ५०००० पन्नास हजार रुपये चांदवड धोंडो-बल्लाळ मामलेदार किल्ले लोहोगड यांसी सांगोन सदरहू ऐवज बाळाजी जनार्दन यांचे ऐवजापैकीं अंताजी येशवंत याजकडे मशार निल्हेकडून देवणें. ह्मणोन सदाशिव नारायण याचें नांवें.

सनद १.

रसानगीयादी.

बाळोजी कुंजीराच्या कीर्दीपैकीं.

इ० स० १८०१।०२ इसन्ने मया तैन व अलफ, सफर २.

९५।१४७ बाळाजी जनार्दन यांजकडे तुह्मांकडून गांव चालत आहेत. त्यांस ते मृत्यु पावले. सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहू गांव सरकारांतून दिल्हे असतां तुह्मीं त्यांजकडे चालवावयासी दिकत करतां, ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असें. तरी सदरहू गांव बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशार निल्हेचे स्त्रीकडे चालविणें. म्हणोन चिटणीसी.

पत्रें.

१ काशीराव होळकर यांजकडून देहें बितपशील.
  ३ मौजे कोऱ्हाळे वगैरे देहें तीन परगणें रावेर.
  १ मौजे रुई तर्फ कोऱ्हाळें.

  ४

चार गांव चालवावयाविसीं. पत्र.

१ नरसो खंडेराव यांजकडून देहे बितपशील.
  १ मौजे पंचाळें.
  १ मौजे निंबगांव.
  १ मौजे भोंकणी.
  १ सुलतानपूर.
  १ मौजे शाहापूर.

  ५

94. Balaji Janardan had commenced the construction of the temple of Shri Bhima Shankar. The work was not completed when Balaji Janardan died. Sanction was given to spend Rs. 50000 out of Balaji Janardan's property for completing the work.
A. D. 1801-1802.

95. Kashirao Holkar, Pratinidhi, Baburao Angria, the Subhedar of Khandesh, Daulatrao Scindia, and others were directed to continue to Balaji Janardan's widow the villages held from them by Balaji Janardan as already ordered by Government.
A. D. 1801-1802.

पांच गांव तर्फ देपूर पैकीं आहेत, ते चालवावयाविसी पत्र.

१ परशुराम पंडित प्रतिनिधी यांस कीं, आपणाकडून देहेंबितपशील.

८ प्रांत वाई.

१ मौजे किरोडे.
१ मौजे वडवली.
१ मौजे भिवंडी.
१ मौजे सोनगांव, संमत निंब.
१ मौजे बसली.
१ मौजे कोंढवळें.
१ मौजे रेणवळें.
१ मौजे कवठें.

८

१ मौजे वासे तर्फ वंदन.
१ मौजे सरज्यापूर, तर्फ कुडाळ.
१ मौजे जांभळी, तर्फ जोरखोरें.

११

आकरा गांव आपलेकडील कमाविसदार चालवावयाविसी दिकत करितात म्हणोन निवेदन जाहलें. त्याजवरून हें पत्र आपणांस लिहिलें असे, तरी सदरहू आकरा गांव बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशारनिल्हेचे स्त्रीकडे चालवावें ह्मणोन.

१ बाबुराव आंगरे वजारतमहा सवाई सरखेल यांजकडून देहें वगैरे इनाम आहेत. बितपशील.

३ तर्फ बोरेटी.

१ मौजे खारोळी.
१ मौजे देवखेड.
१ मौजे भांदूस.

३

१ मौजे वावे तर्फ ब्राह्मणगांव.
१ मौजे गदल तर्फ चेऊल.
१ कसबे चेऊल येथील वाडी.
१ मौजे नितनळे तर्फ तळोजे तालुके नेरल.

७

देहे साहाववाडी येक चालत आहे त्यांस ते मृत्यु पावले सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहू गांव व वाडी सरकारांतून दिल्ही असतां तुह्मी अडथळा केला आहे. ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र लिहिलें

असें. तरी सदरहू सहा गांव व येकवाडी बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें मशार निल्हेचे स्त्रीकडे चालवावें ह्मणोन पत्र.

१ रामचंद्र बल्लाळ यांस कीं, संस्थान पेठ परगणे मजकूर येथील जप्तीचें काम सरकारांतून तुह्मांकडे सांगितलें आहे. त्यास मौजे जांबविहीरे, व मौजे भड, परगणे मजकूर हे दोन्ही गांव संस्थान मजकुरचे राजाकडून बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आहेत त्याविसी.

१ व्यंकटराव नारायण सरसुभा प्रांत खानदेश यांस कीं, मौजें कोऱ्हाळें वगैरे देहें ३ प्रांत खानदेश हे गांव काशीराव होळकर यांजकडून बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आहेत. त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे स्त्रीकडे सदरहु गांव सरकारांतून दिल्हे असतां त्यांजकडे चालवावयाविसी होळकर दिकत करतात. त्यास तुम्ही गांवचा ऐवज वसूल करून मशारनिल्हेचे स्त्रीकडे देणें ह्मणोन.

१ मल्हार धोंडदेव दिंमत दौलतराव शिंदे अलीजाबहादर यांस कीं, निंबालकर यांजकडून बाळाजी जनार्दन यांजकडे जहागिरीचे अमलाचे गांवतर्फ पेडगांवपैकीं बितपशील.

१ मौजे खडकें.
१ मौजे खंडाळें.
१ मौजे दसर्मगव्हाण.

३

येकूण तीन देहे येथील जहागिरीचा अमल सरकारांतून दिल्हा, त्यास तुम्ही जहागिरीचा अंमल कचेरींत ध्यावा असें म्हणता, ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हें पत्र केलें असे, देहे मजकूरचे जहागिरीची वहिवाट पेशजीपासून सुदामत बाळाजी जनार्दन यांजकडे चालत आल्याप्रमाणें त्यांचे स्त्रीकडील कमाविसदार वहिवाट करून किल्ले नगर येथील अंमल सदरहू गांवीं असेल, त्याप्रमाणें पावता करतील. तुम्ही दिकत न करणें ह्मणोन पत्र.

७

बाळोजी कुंजीरच्या कीर्दीपैकीं.

९६।१४८ बाळाजी जनार्दन फडणवीस यांनीं श्रीकाशी नजीक कर्मनाशी नदीचें पुलाचें कामाबद्दल बैल खरेदी केले होते. त्यास ते हल्लीं पुणीयास सरकारांतून आणविले असत, तरी भिकाजी अनंत श्रीकाशीस अन्नछत्राचे कामावर आहेत.ते काशीहून बैल तुम्हांकडे

इ. स. १८०१–०२.
इसने मयातैन व अलफ.
जमादिलावल २९

96. Balaji Janardan Fadnis had purchased some bullocks for use on the work of constructing a bridge over the river Karmanashi near Benarus. The bullocks were now ordered to be brought to Poona.

A. D. 1801-1802.

पाठवितील त्यांचे चंदी वैरणीची बेगमी करून माणसें बरोबर देऊन पुणीयांत पावते करणें, म्हणोन कारकून दिमत बाळाजी गोविंद याचें नांवें छ २९ जमादिलावल.

सनद. १

९७।१७० पेठ सदाशिव शहर पुणें येथें बाळाजी जनार्दन यांजकडील पागेची जागा सरकारांत आहे, त्यापैकीं जागा मोजणी गुजारत एलपा वलद मल्हारजी गवंड्या पंधरा तसूंचे हातें हात सुमारें.

इ. स. १८०३–०४
आर्बा मयातैन व अलफ.
जिल्हेज १४

× × × × ×

येकूण दोन जागांपैकीं येक जागा लांबी एकशें साडे अठरा हात व रुंदी पावणे अठावीस हात, व दुसरी जागा लांबी सवाएकूणहात्तर हात व रुंदी सवातीस याप्रमाणें भिंतीचे इमल्यासुद्धां विठ्ठल विश्वनाथ पटवर्धन कारकून शिलेदार यांस घर बांधोन रहावयाकरितां बक्षीस देविली असे. तरी सदरहू जागा वर चतुःसीमा लिहीली आहे, त्याप्रमाणें मशारनिल्हेचे हवालीं करणें. हे या जाग्यांत घर बांधोन राहतील ह्मणोन विठोबा गायकवाड कमाविसदार पेठ मजकुर यांचे नांवें.

सनद. १

रसानगी यादी.

९८।१८२. बदल देणें, जिऊबाई भानु, बाळाजी जनार्दन यांची स्त्री यांस सालीना नेमणूक बारा हजार रुपये त्यांपैकीं तूर्त खर्चास रसानगीयाद ३००० रुपये.

इ. स. १८०४-०५.
खमस मयातैन व अलफ,
रबिलावल २९.

तीन हजार रुपये तालुके वसई, निसबत खंडेराव निळकंठ यांजकडे, सालमजकुरचे रसदेचा ऐवज येणें त्यांपैकीं देविले.

राजकीय (ब) इतर माहिती.

—:०*०:—

(१३) मोरो बाबूराव फडणीस.

९९।५२. मोरो बाबुराव यांस किल्ले रतनगड येथें ठेविलें सबब बंदोबस्तास ज्यास्ती लोक ठेवावे त्याविसी वगैरे. कलमें

इ. स. १७९७-९८.
समान तीसेन मया व अलफ,
जनादिलावल ९.

लोक असामी २०० दोनशें जदीद ठेवावे. त्यांचा शेरा तालुके त्रिंबक येथील लोकांचे

किल्ले मजकुरीं माचीस मशारनिल्हेस व लोकांस रहावयास घर व अलंगा पाहिजेत,

---

A. D. 1803-1804. 97. A portion of Site in Sadashiv Peth of Poona used for Balaji Janardan's horse, was now given to Vithal Vishwanath Patwardhan.

A. D. 1804-1805. 98. Jiubai widow of Balaji Janardan Bhanu was given an allowance of Rs. 12000 a year.

A. D. 1797-98. 99. Moro Baburao was kept in the fort of Ratangad and additional men were appointed for his safe custody.

शेऱ्याप्रमाणें, दरमहा दर असामीस सरासरी सहा रुपये प्रमाणें छ० २५ मोहरमपासून लोक ठेवून त्यांजपासून चाकरी घेऊन रोजमेरे वगैरे तालुके मजकुरचे शिरस्ते बमोजिब देऊन हिशेबीं खर्च लिहिणें. कलम १

खुद्द मोरोबाबुराव यांजकडील भोजनखर्च, व वस्त्रें, व औषधें, वगैरे मिळोन किल्ले अहमदनगर येथें सालांत रुपये ३००० तीन हजार खर्च होत होता त्या अन्वयें खर्च करून हिशेबीं लिहिणें मजुरा पडेल. कलम १.

त्यांचें काम करावयास येकसाला अजमासें रुपये १५०० दीड हजार पावेतों चौकसीनें खर्च करून घर व अलंगा तयार करून ऐवज हिशेबीं खर्च लिहिणें. कलम १

येकून तीन कलमें, लिहिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन येशवंतराव महादेव याचें नांवें सनद १.

रसानगी मोरो त्रिंबक गडबोले.

१००।५८ राजश्री मोरो बाबुराव फडणीस यांस सरकारांतून कैद करून तुमचे हवालीं केलें आहेत. त्यांस त्यांची कैद हल्लीं मोकळी करून ही सनद तुम्हांस सादर केली असे, तरी मशारनिल्हेस मोकळें करणें. चौकी पहाऱ्यास प्यादे तुह्मांकडील आहेत ते त्यांनीं ठेऊन घेतल्यास ठेवणें. बाहेर कोठें गेलें आल्यास व त्यांजकडे कोणी गेल्यास मनाई न करणें. प्याद्यांनीं त्यांचे रजातलबेंत राहवें म्हणून ताकीद करणें, आणि कैद मोकळी झाली ह्मणोन मशारनिल्हेचे हातचे पत्र हुजूर पाठऊन देणें. ह्मणोन धोंडो महादेव यांचे नांवें सनद १.

इ. स. १७९७–९८
समान तिसेन मया व अलफ; साबान २६

परवानगी रुबरू.

जमा जामदारखाना.

१०१।११३ कमावीस भेट, राजश्री आपासाहेब यांसी बद्दल राजश्री मोरो बाबूराव फडणीस यांचे घरीं श्रीगणपतीचे उच्छाहानिमित्त स्वारी रात्रीस कीर्तनास गेली. ते समयीं पोशाक दिला. तो गुजारत लक्ष्मण जोरी खिजमतगार सनगें येकूण.

इ० स० १८०१–०२
इहिदे मया तैन व अलफ; रबिलाखर. ६

		रुपये.
४०	तिवट धुवट जैनाबादी.	१
१५०	दुपटा काशीचा सफेत कोरा.	१
३०	झगा धुवट.	१
५०	तुंबा किनखाबी लाल सुरती अस्तर गुलबादल पिंवळें समेत नाडी रेशमी जाळीदार.	१
२७०		४

A. D. 1797-98. 100. Moro Baburao Fadnis was now set at liberty.

A. D. 1801-1802. 101. Appasaheb went to Baburao Fadnis' house during the Ganpati festival.

राजकीय (ब) इतर माहिती.

(१४) त्रिंबकराव पेठे.

किरकोळी रुपये.

१०२।२१४–१००० त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे यांणीं सरकारांत लिहून दिल्हे कीं, मजपासून स्वामीचे सेवेसी अंतर पडोन महत अपराध घडला. त्याजवरून स्वामीचा रोष होऊन जातीस व फौजेच्या खर्चास सरंजाम सरकारांतून होता तो व इनाम गांव जमीनीसुद्धां कुल सरकारांत घेतला, हें योग्य केलें. सेवकाचा आब न घेतां घरीं बसून स्वस्थ राहावें फंद फितूर या उपर करूं नये ऐशी आज्ञा झाली. त्याजवरून आज्ञेप्रमाणें आपले घरीं पुण्यांत स्वस्थ बसलें. कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे म्हणोन स्वामींचे सेवेसी विनंति केली. स्वामीनीं आज्ञा केली कीं, तुम्हांकडे सरंजाम फौजेचे खर्चास व जातीस व इनामगांव व जमीनी वगैरे जें काय सरकारांतून व परभारें चालत होतें तें सरकारांत द्यावें; असें तुम्हांस पतकरल्यास दोन हजार रुपये दरसाल तुम्हांस कुटुंब सुद्धां सालबेगमीचे खर्चास सरकारांतून पावत जातील. ते तुम्हीं घेऊन सरकार चाकरी येकनिष्ठेनें करावी. फंदफितुर करूं नये. सरकारचाकरी सोडून स्वराज्यांत व परराज्यांत कोठें चाकरीस राहूंनये म्हणोन आज्ञा केली. ते मी आपल्या स्वसंतोषें कबूल करून हें विनंतीपत्र सेवेशीं लिहून दिल्हें आहें. स्वामींचे राज्यांत लहानमोठे सरदार आदिकरून कोणाशींही व परदौलतींत कांहीं एक राजकारण व फंदफितूर करणार नाहीं. मजकडे फौजेच्या खर्चास व जातीस सरंजाम व इनाम गांव जमीनी वगैरे जें काय सरकारांतून व परभारें चालत होतें तें सर्व सरकारांत घ्यावें त्याजविसीं जातीनें व दुसरे यांजकडून रदबदलीची विनंति होणार नाहीं. दरसाल दोन हजार रुपये कूल पडले पानप्रपंचाचे खर्चाची नेमणूक सालबेगमीची सरकारांतून करून दिल्ही आहे, ती घेऊन आपला प्रपंच करून स्वामींचे पायांपाशीं राहून येकनिष्ठेनें चाकरी करीन. दुसरे कोणाची चाकरी करणार नाहीं. म्हणोन माघ शुद्ध नवमी शके १७२९ प्रभव नाम संवत्सरेचे मितीचें पत्र पेठ्ये यांणीं सरकारांत लिहून दिल्हें तें जवाहिरखान्यांत ठेवावयास रघुनाथ सदाशिव शेंडे कारकून निसबत दप्तर यांचे हवालीं केलें. त्यास त्रिंबकराव अमृतेश्वर पेठ्ये यांस सालीना जातीस व कुटुंबाचे व घोडीं व पालखी व उंटें वगैरे बिलकूल खर्चास दोन हजार

इ० स० १८०७–०८
समान मया तैन व अलफ.
रबिलाखर ६.

---

102. Trimbak Amriteshwar Pethe having acted treacherously against the Peshwa, his Saranjam and Inams were attached. He now prayed that provisiou might be made for his maintenance. He was allowed an allowance of Rs. 2000 a year, all his Saranjam and Inam being surrendered to Government. He was enjoined to entcr into no canspirecy wether in the Government territory or in the foreign states and to serve Government with loyalty.

A. D. 1807-1808.

रुपये द्यावयाचे करार केले. त्यापैकीं रसानगी यादी छ १७ मोहरमीं तालुके आमदाबाद प्रांत गुजराथपैकीं देविले. रुपये १०००.

---

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(१५) निंबाळकर.

१०३।१०७ आपाजीराव मोरे यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडे सरलष्करचें पद सांगितलें होतें, त्यासंबंधें फौजेचे बेगमीस सरंजाम चालत होता. त्यास हल्लीं तुह्मांकडून सरलष्करचें पद व सरंजाम दूर करून सिदोजीराव नाईक निंबाळकर यांजकडे सरलष्करचें पद सांगोन त्यासंबंधें फौजेचे बेगमीस सरंजाम पेशजीप्रमाणें पेस्तरसाल सन आर्बा मयातैनापासून करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी महालचीं ठाणीं जकिरासुद्धां व हत्ती व घोडीं व उंटें व नगारखाना वगैरे सरकारचे शिलकी दागीने सरलष्करचे पदासंबंधें तुह्मांकडे असतील ते मशारलिल्हेचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन. सनद १

इ. स. १८०२–०३
सल्लास मयातेन व अलफ; सफर १४

रसानगीयादी एकंदर.

---

१. राजकीय (ब) इतर माहिती.

(१६) त्रिंबकजी डेंगळे.

१०४।२१५ मुकाम सातारा येथील कामकाज कृष्णराव नारायण यांजकडे होतें तें दूर करून सालमजकुरीं त्रिंबकजी डेंगळे यांजकडे सांगितलें येविसी सनदा.

इ. स. १८०८–०९
तिसा मयातैन व अलफ; जमादिलाखर २७

१ त्रिंबकजी डेंगळे यांस कीं, इमानें इतबारें वर्तोन मुकाम मजकूर येथील बेगमीचे गांव वगैरे सुद्धां अंमल चौकशीनें करून जमाखर्चाचा बेहेडा अलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. व मुकाम मजकुरीं निसबतवार बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून घेणें व डौलाची शिक्केकटार कृष्णराव नारायण यांजवळ आहे ते त्याजपासून घेणें ह्मणोन सनद.

A. D. 1802-1803. 103. The dignity of Sir Laskar together with the Saranjam, connected therewith, was taken from Appajirao More and conferred on Sidojirao Naik Nimbalkar.

A. D. 1808-1809. 104. Trimbakji Dengle was appointed to manage the affairs at Satara, displacing Krishnarao Narayen.

१ कृष्णराव नारायण यांस कीं, मुकाम मजकूर येथील कामकाज मशारनिल्हे करतील, डौलाची शिक्केकटार तुम्हांजवळ आहे ते यांचे हवालीं करून कबज घेणें, व मुकाम मजकुरीं निसबतवार वगैरे बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून देणें. म्हणोन सनद.

२

रसानगी यादी.

---

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(१७) बापू गोखले.

१०५।२००. देणें बापुजी गणेश गोखले, यांस वाई प्रांतीं बंडाचा उपद्रव जाहला सबब बंदोबस्तास पाठविलें. त्यांस निरोप समयीं विद्यमान राजश्री बाबासाहेब शुक्रवारचे वाडयांत रुबरु पाहून दिल्हा. शिरपेंच घाट साधा तीन फुलांचा, बद्दल जनराल वसली

इ० स० १८०६–०७.
सबा मयातैन व अलफ.
सवाल १५.

(जनरल वेलस्ली) दिमत इंग्रज कलकत्तेकर पैकीं. किंमत रुपये.

२६० बरहुकूम दाखला.
२८० जाजती, येकसाला.

५४०

शहत

७१ हिरे व हिरकण्या किंमत रुपये ४४२॥
१ पांचमणी लोलक वजन रती ७८=
दर ६ प्रमाणें किंमत रुपये ४२।॥.
० सोनें व अजुरा किंमत रुपये ९४।॥.

७२

जडाव दागिना १

१०६।२२६ बापूजी गणेश यांचें नांवें सनद कीं, तुम्हां समागमें सरकारची नेम-

---

A. D. 1806-1807. 105. A present of jewels was made to Bapuji Ganesh Gokhale on the eve of his departure to Wai to quell a disterbance.

A. D. 1810-11. 106. Bapuji Ganesh was directed to disband from the begining of the current year half the Government army that was under his command.

इ० स० १८१०-११ इंह्दिे अशर मयातैन व अलफ जमादिलावल १५.

णुकी फौज व गाडदी वगैरे लोक आहेत. त्यांपैकीं निमे लोकांस साल मजकूर अवल सालापासून निरोप द्यावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे. तरी सदरहूप्रमाणें निमे लोकांस निरोप सालमजकूर अवल सालापासून देणें म्हणोन. सनद १.

रसानगी यादी.

राजकीय· (ब) इतर माहिती·

(१८) कोल्हापुरचे राजे.

इ० स० १७९८-९९ तिसा तिसेन मया व अलफ मोहोरम १५.

१०७|६७ तालुके देवगड येथें करवीरकर व बावडेकर रोखे करून दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास नवे लोक ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे, म्हणोन तुम्हीं विनंतीपत्र पाठविलें त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी तीनचारशें माणूस काम जरूराती लागल्यास महालचे शेऱ्याप्रमाणें जदीद ठेवून बंदोबस्त चांगला राखणें. काम जाहल्यावर सदरहू लोक दूर करणें. म्हणोन गंगाधर बचाजी यांचे नांवें. सनद.

रसानगी, गोविंदराव भगवंत पिंगळे.

इ० स० १७९८|९९ तिसा तिसेन मया व अलफ सफर १४.

१०८|७२ तालुके रत्नागिरी येथें बावडेकर आमात्य यांजकडील लोक येऊन दंगा करितात. त्यांचे बंदोबस्तास कांहीं जदीद शिबंदी ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. म्हणून त्याजवरून जदीद लोक असामी १५० महालचे शेऱ्याप्रमाणें ठेवावयाची आज्ञा करून हे सनद सादर केली असे; तरी सदरहू दीडशें माणूस चांगले ठेवून बंदोबस्त करणें. काम जाहल्यावर सदरहू लोक दूर करणें. म्हणून लक्ष्मणराम याचे नांवें. सनद.

रसानगी यादी.

इ० स० १७९८-९९ तिसा तिसन मया व अलफ जमादिलावल १८.

१०९|७७ धोंडो बल्लाळ यांचे नांवें कीं, करवीरकर यांणीं सरकारचे महाल व किल्ले दाबिले आहेत. ते सरकारांत घ्यावयाची मसलत, व महालानिहाय प्रांत कर्नाटक येथलि बंदोबस्त मोरो बापूजी यांजकडे सांगितला असे. तरी तुम्हीं फौज वगैरे सरंजामसुद्धां मशारनिल्हेकडे जाऊन फौ-

---

A. D. 1798-99. 197. Additional men were permitted to be entertained at Taluka Deogad in consequence of the disturbances created by the Raja of Kolhapur and the Bawdekar.

A.. D. 1798-99. 108. Additional men were permitted to be entertained at Taluka Ratnagiri, in consequence of the disturbances created by the men of Bawadekar Amatya.

A. D. 1798-99. 109. Moro Bapuji was deputed to recover the Government Mahals and forts usurped by the Kolhapur Raja. Dhondo Ballal was directed to place his army at his disposal.

जेची हजिरी गणती घेऊन कामकाज सांगतील त्याप्रमाणें करीत जाणें. व महालानिहाय तपे तेगूरसुद्धां ठाणीं तुह्मांकडे असतील तीं जकिरासुद्धां मशारनिल्हेचे हवालीं करून कबज घेणें. ह्मणोन छ १ जमादिलावल. सनद १.

रसानगी यादी.

११०|० महाराज राजश्री छत्रपति स्वामी करवीरकर यांजकडील सरंजाम चिकोडी व मनोली व फुटगांव जे तुह्मांकडे असतील ते सखाराम घाटगे सर्जेराव यांजकडील कमाविसदाराचे स्वाधीन करणें. ह्मणून रामचंद्र परशुराम यांचे नांवें चिटणीसी पत्र १.

इ० स० १८००-१
इहिदे मयातैन व अलफ
रबिलाखर १०.

१११|१३४ बावडेकर वगैरे सरकार तालुक्यांत उपद्रव करितात. त्यांचे पारिपत्यास पेशजी सरकारांतून फौजा रवाना जाहल्या. तेव्हां सुरळीतपणें जाबसाल लाऊन फौजा माघाऱ्या आणविल्या. त्यांस सालमजकुरीं तें कांहींच मनांत न आणितां सरकार तालुक्यांत दंगा करितात. यास्तव त्यांचे पारिपत्यास सरकारांतून सरदार मोठा माणूस फौजा बरोबर देऊन रवाना होत आहे. तरी तुम्हांकडील लोक बरकदाज हेटकरी व पटेकरी व जेजाल बारदार जेजालासुद्धां माणूस चांगले चिलखी (उत्तम) नेमणूकी भरण्यापैकीं तयार लेश, पोटाची व दारुगोळीची पोक्त बेगमी करून खंडेराव निळकंठ निसबत सरसुभा प्रांत कोंकण हे तुम्हांस लिहितील तेथें लोक रवाना करणें. लोकांची हजिरी रुबरु पाहण्यांत येईल. ह्मणोन किल्ले व तालुकेहाय प्रांत कोंकण येथील मामलेदार यांचें नांवें. सनदा.

इ० स० १८०१-०२
इसन्ने मया तैन व अलफ;
जमादिलाखर २

१ किल्लेहाय तालुके वसई, निसबत केशवराव जगन्नाथ पैकीं लोक ५०० पांचशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय तालुके रत्नागिरी, निसबत भास्कर जगन्नाथ पैकीं लोक असामी २०० येविसी. सनद.

१ तालुके विजयदुर्ग, निसबत आबाजी बापूजी पैकीं लोक असामी २०० दोनशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय प्रांत कल्याण भिंवडी, निसबत नारो बल्लाळ पैकीं लोक असामी १५० दिडशें येविसी. सनद.

---

110. Ramchandra Parasharam was directed to hand over to Sakharam Ghatge Sarjerao, the villages of Chikodi, Manoli and any other villages belonging to the Maharaja of Karvir which were under his management.

A. D. 1800-1801.

111. The Bawadeker and others having formerly made raids on Government territory, an army was sent against them. They then came to terms and the army was recalled. They however again began to give trouble and an army was proposed to be sent against them. The Mamlatdars of Konkan were directed to send their men to join the army.

A. D. 1801-02.

१ तालुके सुवर्णदुर्ग, निसबत बाळोजी कुंजीर पैकीं लोक असामी २०० दोनशें येविसी. सनद.

१ किल्लेहाय प्रांत राजपुरी, निसबत आपाजी रामचंद्र पैकीं लोक असामी १०० येकशें येविसी. सनद.

१ तालुके अवचितगड बिरवाडी, निसबत कृष्णाजी बल्लाळ पैकीं लोक असामी ७५ पाऊणशें येविसी. सनद.

१ तालुके उंदेरी, निसबत आपाजी बापूजी व महादाजी निळकंठ पैकीं लोक असामी २५ पंचवीस येविसी. सनद.

१ तालुके रेवदंडा, निसबत बळवंतराव रामचंद्र पैकीं लोक असामी ७५ पाउणशें येविसी. सनद.

१ किल्ले महिमतगड, निसबत आपाजी शिंदे पैकीं लोक असामी २५ पंचवीस येविसी. सनद.

१ तालुके सरसगड, निसबत विठोजी गायकवाड पैकीं लोक असामी ५० पन्नास येविसी. सनद.

१ तालुके कर्नाळा, निसबत रघुनाथ धोंडदेव पैकीं लोक असामी ७५ पाउणशें येविसी. सनद.

१ किल्ले माहुली, निसबत भगवंतराव शिंदे पैकीं लोक असामी ७९ पाऊणसें येविसी. सनद.

१ किल्ले हाय, मामले कोहजपैकीं केशवराव जगन्नाथ पैकीं लोक असामी ५० पन्नास येविसी. सनद.

१४

रसानगी याद.

जमाजामदारखाना.

११२।१७१. कमावीसभेट, बाबद महाराज छत्रपति संस्थान करवीर यांजकडून बाळोजी थोरात वगैरे हुजरे असामी पांच पोषाक घेऊन आले. ते जमा सनगें एकूण किंमत रुपये.

इ० स० १८०३।०४ आर्बा मयातैन व अलफ जिल्हेज १६.

२६३ राजश्री बाबासाहेब यांस, गुजारत त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार. रुपये.

३०	तिवट पैठणी.	१
२५०	दुपटा पैठणी.	१
७५	किनखाप.	१
८	शेला धुवट.	॥
२६३		३॥

A. D. 1803-1804. 112. Presents were received from the Kolhapur Raja.

१८३ राजश्री आपासाहेब यांस, गुजारत रामजी जोरी खिजमतगार, सनगें येकूण रुपये.

१९	तिवट पैठणी.	१.
१००	दुपटा पैठणी.	१.
६०	किनखाप.	१.
८	शेला साधा, धुवट॥.	
१८३		३॥.

१०४ घरांत, गुजारत शिवाजी घुला खिजमतगार. रुपये.

१००	पातळ पैठणी.	१.
४	चोळखण पैठणी.	१.
१०४		२.

९३ सौभाग्यवती सिताबाई यांस, गुजारत कृष्णाजी घाटगे खिजमतगार. रुपये.

९०	पातळ पैठणी.	१.
३	चोळखण.	१.
९३		२

७४३ ११.

राजकीय (ब) इतर माहिती.

(१९) निझाम.

जमा, जामदारखाना.

११३।१३ अ कमावीस भेट, राजश्री आपा साहेब यांसी बाबत नबाब निजामआली खान बहादर यांणीं हैदराबादेहून पाठविलीं, ती मैनुबैले यांणीं सरकारांत आणून दिल्हीं. ती गुजारत रायाजी वागमारा खिजमतगार, सनगें येकूण. रुपये.

इ० स० १७९६।९७ सबा तिसेन मया व अलफ सफर १२.

२१	चिराजरी.	१.
६	गोषपेच.	१.
१०९॥	जामेवार जरी ३ येकूण.	रुपये.
२१	पटका जरी.	१.
१५०	शालफर्द २, दर ७५ प्रमाणें रुपये.	
१५०	किनखाप.	१.
४५७॥		

113. Presents were sent by Nabab Nizam ali Khan Bahadur from Hyderabad to Appasaheb.

A. D. 1796-97.

११४।१५ मसिरूलमुल्क बाहादुर यांचे नांवें जाब कीं, नबाब निजामआली खान बहादूर यांणीं साल गुदस्ता तुम्हांस खर्चाबद्दल पन्नास हजार रुपयांच्या हुंड्या करून पाठविल्या. त्यास तो ऐवज परभारा सावकारापासून गुजारत छ २३ रमजानीं पोतेचाल सरकारांत घेतला. त्या ऐवजीं तुम्हांस खर्चास रुपये, २५००० पंचवीस हजार सरकारांतून दिले. बाकी रुपये २५००० पंचवीस हजार राहिले ते सन खमस तिसेनांत नबाबापासून सरकांत ऐवज घ्यावयाचा ठरला आहे; त्या ऐवजीं मजुरा पडतील. ह्मणोन जाब.

इ० स० १७९६–९७
सबा तिसेन मया व अलफ;
रबिलावल २१

११५।२७ वामनाजी हारि यांचें नांवें सनद कीं, तुम्ही विनंति पत्र छ ३० साबानचें पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. परगणे जालनापूर येथील ठाणें घ्यावयाकारितां शहरच्या सुभ्याकडील सात आठशें स्वार, व सातशें प्यादे, व तीन तोफा इतका सरंजाम बदलापुरास आला आहे. पाऊण महिना होत आला. सांप्रत हैदराबादेहून दोन चारशें स्वार मदतीस आले आहेत. या आठ दिवसांत त्यांणी फारच जलदी केली. परंतु स्वार व प्यादे ठेऊन व आठोळे व मोरे शिंदखेडकर मदतीस आणून मजबुदीनें आहों. त्यास ठाणें नबाबाकडे द्यावें. किंवा न द्यावें, येविसि विस्तारेंकरून लिहिलें तें कळलें. ऐशास तुह्मीं स्वार व प्यादे ठेऊन ठाण्याचा बंदोबस्त केला आहे. त्याप्रमाणें मजबुदीनें राहणें, नबाबाकडे ठाणें न देणें, ह्मणोन.

इ. स. १७९६–९७
सबा तिसेन मया व अलफ;
रमजान ५

सनद.

परवानगी रुबरु.

११६।२८ परगणे मोहोळ, येथील ठाणें घ्यावयाकारितां, नबाबाकडील लोक आले आहेत. त्यांची व आमची नित्य गोळा गोळी होत आहे. याजमुळें शिबंदीचा पेंच पडतो. त्यास परगणे मजकुरचे ठाणें त्यांजकडे द्यावें किंवा न द्यावें ह्मणोन तुम्हांकडील कारकून यांणीं विनंति केली. त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी परगणें मजकुरचे ठाण्याचा बंदोबस्त चांगला करून मजबुदीनें राहणें. नबाबाकडे ठाणें न देणें. ह्मणोन रामचंद्र शिवाजी यांचें नांवें.

इ. स. १७९६–९७
सबा तिसेन मया व अलफ;
रमजान १५.

सनद.

रवानगीरुबरु.

---

114. Nabab Nizamali Khan Bahadur sent last year Hundis of Rs 50000 to Musirulmuluk Bahadur for his expenses. Rs. 25000 out of the sum were given to Masirul for his expenses and the remaining amount was adjusted against the sum payable to Government by the Nabab.

A. D. 1796-97.

115. Wamnaji Hari officer of Pargana Jalnapur reported that Nizam's troops had attacked the Thana, that he was trying to do his best to defend it with the assistance of Atole and More of Sindkhede, and requested instructions whether he should surrender the Thanna to the Nabab. He was directed to defend the Post.

A. D. 1796-1797.

116. A similar Report was received from the officer of Pargana Mohol and similar orders were issued to him.

A. D. 1796-97.

११७।३४ हवेली दौलताबाद येथील जहागिरीचा अंमल नबाब निजामआली खान बहादर यांजकडून सन खमस तिसेनांत सरकारांत घेतला. त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली होती. ते दूर करून सदरहू अंमल नबाबाकडे दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमावीसदार हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवाली हवेली मजकुरचें ठाणें करून कबज घेणें. ह्मणोन रामचंद्र महादेव याचें नांवें. सनद.

इ. स. १७९६–९७.
सबा तिसेन मया व अलफ
जिलकाद २०.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे, कारकून निसबत दप्तर.

११७ पैकीं.

नबाब निजामअली खान बहादर यांजपासून सन खमस तिसेनांत महालानिहाय येथील जाहागिरीचा अंमल सरकारांत घेतला होता. त्यापैकीं माघारा दिल्हा येविसी. सनदा.

इ० स० १७९६–९७
सबा तिसेन मया व अलफ
जिलकाद २४.

१ महालानिहाय येथील जमीदार यांस कीं, नबाबाकडील कमाविसदारासी रुजु होऊन जहागिरीचा अंमल सुरळीत देणें ह्मणोन.

३ सरकार परांडे.
- १ हवेली परांडे.
- १ परगणे मांडवे.
- १ परगणे मोहोळ.

३

५ सरकार धारुर.
- १ परगणे आंबे जोगाईचें.
- १ परगणे परळी.
- १ कसबे पानगांव बाराबिदींचें.
- १ कसबे खळविहिरें.
- १ परगणे बारशी, परगणे मौजे देवळाली.

५

३ सरकार पैठण.
- १ हवेली पैठण, खेरीज खातगांव वगैरे देहें.
- १ परगणें दाऊरवाडी.
- १ परगणें शेंदूरवादे.

३

117. The Jahagir Amal of Haveli, Daulatabad, and various Mahals in Parande, Dharur, Paithan, &c. taken from Nabab Nizamali Khan in A. D. 1794-95 was ordered to be restored to him.

A. D. 1796-97.

२ सरकार वासीम.

१ परगणें आंवढे.

१ परगणें चारठाणें, परगणें मौजे उमरखेडे.

२

१ हवेली पाथरी.

१ मामले बीड.

४ सरकार नांदेड.

१ परगणे इंदूर.

१ परगणे बोधन.

१ परगणे म्हैस.

१ परगणे उदगीर, परगणे मौजे जळगांव.

४

२ सरकार दौलताबाद.

१ हवेली दौलताबाद.

१ कसबे खराडी, उर्फ तुर्काबाद.

२

१ परगणें पडदूर, परगणें देहें.

२२ महाल व गांव बेवीस येविंसी सनद.

१ महालानिहाय येथील अंमल लावून घेतला होता. त्यांस महाल व गांव खराब सबब जाहागिरीचा अंमल बसविला नव्हता, तो हल्लीं माघारा दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमावीसदाराशीं रुजू होऊन जाहागिरीचा अंमल सुरळीत देणें म्हणोन जमीदार यांस.

१ परगणे हरदापूर.

१ परगणे रेणापूर.

१ परगणे नळदुर्गपैकीं गांव.

३ महाल व गांव तीन येविसी. सनद.

१ रामचंद्र शिवाजी यांस कीं, परगणे मोहोळ सरकार परांडें येथील जहागिरीचे अंमलाची मामलत तुम्हांकडे सांगितली होती. ते दूर करून नबाबाकडे अंमल दिल्हा असे. तरी त्यांजकडील कमाविसदार हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवालीं परगणें मजकुरचीं ठाणीं करून कबज घेणें म्हणोन सनद.

२

येकूण तीन सनदा सदरहूप्रमाणें करून दिल्ह्या, येविशी रसानगी यादी दोन.

११८।३९ किल्ले दौलताबाद येथील अंमल दरोबस्त तुम्हांकडे सांगितला आहे. तो दूर करून नबाब निजामअल्ली खानबहादर यांजकडे किल्ला देविला असे. तरी नबाबाकडील हे सनद व त्यांचें पत्र घेऊन येईल त्याचे हवालीं किल्ले मजकूर करून कबज घेणें. म्हणोन दिनकर बल्लाळ यांचें नांवें. सनद १.

इ. स. १७९६।९७
सवा तिसेन मया व अलफ.
जिलकाद २२

येविसी सदरहु अन्वयें मशारनिल्हेचें नांवें. सनदा २.

१ दुसरी सनद कीं, अलाहिदा सनद सादर जाहली आहे त्याप्रमाणें किल्ला हवालीं करणें ह्मणोन.

१ तीसरी सनद कीं, अलाहिदा दोन सनदा सादर झाल्या आहेत. त्याप्रमाणें किल्ला हवाली करणें ह्मणोन.

२

रसानगी त्रिंबक नारायण परचुरे, कारकून निसबत दप्तर.

११९। ४६ परगणें आंबडापूर सरकार मेहेकर येथील जाहागिरीचा अंमल सन खमस तिसेनांत नबाब निजामअल्ली खान बहादर यांनीं सरकारांत दिला असतां नबाबा कडील चैनसिंग यानें सरकार सनदेशिवाय ठाणें घेतलें आहे. त्यास हल्लीं पेशजीप्रमाणें जाहागिरीचा अंमल सरकारांत घेऊन, कमावीस लक्ष्मण खंडेराव यांजकडे सांगितली असे; तरी मशारनिल्हेशीं रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. नबाबाकडील अंमलदाराकडे वसूल न देणें. ह्मणोन जमींदार परगणें मजकूर यांचे नांवें. सनद १.

इ.स. १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ.
मोहरम ९.

रसानगी अंताजी गोविंद आपटे कारकून निसबत दप्तर.

१२०।४७ परगणें मनरुप सरकार सोलापूर येथील जाहागिरीचा अंमल नबाब निजामअली खान बहादर यांणीं सरकारांत दिल्हा. त्याची कमावीस सालमजकूरीं तुम्हांकडे सांगितली असे; तरी इमाने इतबारे वर्तोन अंमल चौकसीनें करून आलाहिदा अजमास ठरा-

इ० स० १७९७–९८
समान तिसेन मया व अलफ.
मोहरम १४.

---

118. Similarly the fort of Daulatabad was restored to him.
A. D. 1796-97.

119. The Jahagir of Pargana Amdapoor in Sirkar Mehekar was in A. D. 1794-95, surrendered to Government by Nabab Nizamali Khan. The Thana was however taken back by Chensing in the service of the Nabab. It was now ordered to be recovered.
A. D. 1797-98.

120. The Jahagir Amal of Pargana Manrup in Sirkar Sholapur was surrendered by Nizamali Khan.
A. D. 1797-98.

ऊन दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. ह्मणोन जनार्दन शिवाजी याचे नांवें सनद १.
येविसी सनदा २.

१ रामचंद्र शिवाजी यांस कीं, परगणें मजकूर येथील मामलत मशारनिल्हे यांजकडे सांगितली असे. तरी तालुके सोलापूर पैकीं सरंजाम देऊन, अंमल बसऊन देणें. ह्मणोन सनद.

१ जमीदार परगणें मजकूर यांसी कीं, मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणें. ह्मणोन सनद.

२

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.

१२१।१०० नबाब निजामअल्ली खान बहादर यांचे पुत्राचें लग्नाचे अमंत्रणाकरितां शौकतदौला बहादर पुण्यास आले. त्यांस निरोप समयीं सरकारांतून हत्ती नग १ बक्षीस देविला असे, तरी गोविंदरावकृष्ण यांजकडील हत्ती धारासीवाचे ठाण्यांतील तुह्मांजवळ आहे, तो मशारनिल्हे यांस देऊन रसीद घेणें. ह्मणोन निजाम नबाबजंगबाहदर यांचें नांवे

इ. स. १७९९।१८००.
मयातैन व अलफ.
जमादिलावल २२

सनद १.

रसानगी धोंडो नारायण लिमये.

बाळोजी कुंजीरच्या कीर्दीपैकीं.

१२२।१४९ तालुके सोलापुर येथें किल्ल्यानजीक नबाब निजामअल्ली खान बहादर यांजकडील फौजा फिरतात. त्यांस कदीम शिबंदी आहे ती किल्याचे बंदोबस्तास लागते. त्या शिबंदीनें तालुक्याचा बचाव होत नाहीं. सबब जास्ती शिबंदी ठेवण्याची आज्ञा झाली पाहिजे. ह्मणोन तुह्मांकडील कारकुनांनीं हुजूर विनंति केली. त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी तालुक्याचे बंदोबस्तास शिबंदी कार्याकारण लागेल तशी ठेऊन किल्ल्याचा व तालुक्याचा बंदोबस्त करून हुशारीनें राहणें. काम जाहल्यानंतर शिबंदी दूर करणें. ह्मणोन रामचंद्र शिवाजी मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवें. छ १० जमादिलाखर

इ. स. १८०१।०२
इसने मयातैन व अलफ.
जमादिलाखर १०

सनद १.

रसानगीयाद.

---

121. Shoukat Doula Bahadoor came to Poona to give an invitation to the Peshwa for the marriage ceremony of Nabab Nizamali Khan's son.

A. D. 1799-1800.

122. The forces of Nizamali Khan Bahadoor were moving about the fort of Sholapur. Additional men were therefore ordered to be employed for its protection.

A. D. 1801-1802.

१२३।१७५ देणें, नबाब पोलाद अल्लीखान बाहादर यांचे तीर्थरूप नबाब निजाम-
इ. स. १८०३-०४ आर्बा मयातैन व अलफ. सफर ९ अल्ली खान बाहादर मृत्यु पावले सबब त्यांचे नांवें मुबारकबादीचीं वस्त्रें सरकारांतून कृष्णाजी माणकेश्वर कारकून शिलेदार याज बरोबर पाठविलीं त्यां समागमें जवाहिराचे दागीनें खाशांनीं रु-
बरु पाहून दिले ते.

किंमत. रुपये.

६९४८॥ ऐन किंमत

१७३७८= सवाई.

८६८९॥= येकूण जडावदागिने

६ खासा यांस किंमत. रुपये.

४९७९। ऐन किंमत. रुपये.

१२४४॥।- सवाई

६२२४८-

१ शिरपेंच घाट साधा, तीन फुलांचा, रुप्याचे किरणाचा. बाबद खरेदी वजीरचंद जोहरी पैकीं. किंमत रुपये.

८०० ऐन किंमत. रुपये.

२०० सवाई.

१००० येकूण शहत.

५३ हिरे, हिरकण्या मदनाईकसुद्धां.

४ माणके.

१ पाच, लोलक.

५८

१ जगो घाट साधा, रुप्याचें किरणाचा, बाबद खरेदी वजीरचंद जोहरीपैकीं. छ ६ जिलकाद सन मजकूर. किंमत रुपये.

९०० ऐन किंमत. रुपये.

२२५ सवाई.

११२५ येकूण शहत.

---

123. Nabab Nizamali having died a letter of condolence together with a present of jewels worth Rs. 8685 was sent to his son Poladali Khan Bahadoor by the Peshwa.
A. D. 1803-1804.

६३ हिरे, हिरकण्या मदनाईकसुद्धां.
२ माणकें.
१ पाचलोलक.

६६

१ कंठी मोत्याची, बाबद कमावीस भेट व्यंकाजी दादाजी दिपड यांजकडून आली. (सर्व दागिन्याचा तपशिल दिला नाहीं. माहिती अपूरी आहे.)

१२४।१९८ कमावीस आहेर, राजश्री बाबासाहेब यांचें लग्नाबद्दल. दिमत नबाब पोलादजंग बाहादर यांनीं हैदराबादेहून भिवराव कृष्ण यांजबरोबर आहेर पाठविला. त्याजवर जवाहिराचे दागीने आले. ते जमा गुजारत दिपाजी थोरात खिजमतगार. किंमत गुजारत वजीरचंद जोहरी जामदार, सुकराय काशीकर, व रुपचंद जोहरी. ८९८७ रुपये.

इ. स. १८०६।०७
सबा मयातैन व अलफ.
सवाल २.

येकूण जडावदागीने.

१६ खाशांस आले ते किंमत रुपये.

८ बद्दल नबाब पोलादजंग यांजकडील.

किंमत रुपये.

१ शिरपेंच घाट मिनेगार, मिना हिर्वा व पांढरा, तीन पेट्यांचा किंमत रुपये ४९९.

येकूण शहत.

९० हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती सुमारे १२ दर २८ प्रमाणें किंमत. रुपये ३३६.
३ पाचा, मदनाईक अजमासें वजन रती १६ दर ५प्रमाणें रुपये ८०.
१ मोतीं, लोलक खर्डा खंडीत रुपये ३०
० सोनें, व आजुरा रुपये ४९

५४

१ जगो घाट मिनेगार, मिना हिरवा व सफेत. किंमत रुपये ६१६.

येकूण शहत.

६६ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती १७ दर २८ प्रमाणें रुपये ४७६.
१ मोती लोलक लांबट खंडित. रुपये ४५.

---

124. A present of jewelry was sent to the Peshwa and Lady Waranashibai by Poladjnng Bahadoor from Hydrabad on the occasion of their marriage. The names of the different jewel ornaments and their prices are given.

A. D. 1806-1807.

१ पाच, मदनाईक अजमासें रती८दर ५ प्रमाणें किंमत रुपये ४०
० सोनें व आजुरा रुपये ५५

६८

१ कंठी मोत्याची किंमत १६७५ रुपये.

येकूण ——— शहत.

१० धुगधुगी घाट साधा किंमत रुपये २०५.

९ हिरे व हिरकण्या अजमाशें वजन रती, रुपये ११२॥.

१ प्रत हिरा नाईक पानघाट, वजन रती, येकूण रुपये५०.

८ प्रत हिरकण्या वजन रती २॥ दर२५प्रमाणें रुपये६२॥.

९

१ मोतीं लोलक अजमासें रती ६, चव २०॥= दर ४ प्रमाणें रुपये ८२॥

० सोनें व आजुरा. १०

१०

५८ मोत्यें माळेस, वजन टांक ६॥१॥, चव २४९ दर ६ प्रमाणें रुपये १४७०

६८

२ पोहोच्या हिरे टिकाच्या घाटमीनेगार, मिना लाल व हिरवा व सफेत, पेव्या दर १६ प्रमाणें३२व फुलें दर१प्रमाणें२येकूण किंमत रुपये ४००.

येकूण ——— शहत.

११० हिरे व हिरकण्या आजमांशें वजन रती, ३२४ रुपये.

९६ प्रत पेव्या, दर १६ प्रमाणें ३२ येकूण दर ३ प्रमाणें. वजन रती १४ दर १८ प्रमाणें रुपये २५२.

१४ प्रत फुलांस दर७प्रमाणें, रती ३दर२४प्रमाणें रुपये ७२.

११०

० सोनें, व अजुरा रुपये ७६.

११०

२ बाजूदंडाच्या मिनेगार. मिना हिरवा, निळा, व सफेत किंमत रुपये९१९.

येकूण ——— शहत.

१०० हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती, रुपये ७३९.

४ प्रत बाजूस पानघाट वजन रती, दर ४०प्रमाणें रुपये १२०.

८ प्रत पानाचें, वजन रती ४ दर ३५ प्रमाणें रुपये १४०.

८८ प्रत घेराचे वगैरे, वजन रती १९ दर २५ प्रमाणें किंमत रुपये ४७५.

१००

२ पांचाचौक्या दर १ प्रमाणें वजन रती १२ दर ४ प्रमाणें किंमत रुपये ४८.

० सोनें व अजुरा रुपये १४२.

१ तुरा माणीकमणी, व पाचमणी, मोत्यांचे सर ८, खेरीज दांडी मळसूत्री, वर जडाव किंमत रुपये ५१६.

येकूण ——— शहत.

२० फुलांस किंमत रुपये २००.

१० हिरे अजमासें वजन रती २॥ दर २५ प्रमाणें, किंमत रुपये ६२॥.

५ पाचा लोलक मणी लटकते समोवतें, अजमासें रती ५ दर ५ प्रमाणें रुपये २५.

५ मोत्यें लटकतीं, अजमासें रती चव १७ दर ४ प्रमाणें, रुपये ६८.

० खोटें हिरवे दखलबाद.

——— सुमार.

१ नाईक,

१० फुलांचे मागें,

११

० सोनें व आजुरा रुपये ४४॥.

२०

१० दांडीस, दांडी मिनेगार, एका अंगास रावा व फूल येकूण रुपये ५०.

९ हिरे, हिरकण्या अजमासें वजन रती, १। दर २० प्रमाणें, रुपये २५.

७ फुलांस.

२ राव्याचे पंखास.

९

१ मोतीं राव्याचे मुखास, लटकतें.
अजमासें चव १। रुपये ७.
० सोनें, व आजुरा रुपये १८.
―――
१०

१२६ सरास सर ८ येकूण किंमत रुपये २६६.
११ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती, दर १५ प्रमाणें. रुपये ३०.
३ प्रत, माथामणी १ येकूण.
८ प्रत टांका, खालील सराचे शेवटास.
―――
११

७३ मोत्यें, सरास व टिकेस लटकतीं मिळोन,
अजमासें चव ४० दर ९ प्रमाणें रुपये २००.
१० टिकास लटकतीं.
३ वरील मण्यास लटकतीं.
६० सरास.
―――
७३

२१ पांचमणी, अजमासें रती ३ दर ९ प्रमाणें. रुपये १५.
२१ माणीक मणी दर १ प्रमाणें रुपये २१.
―――
१२६
―――
१५६

तपसील,
३० हिरकण्या.
२१ माणकें चुर्णी.
२६ पांचा व किर्डे.
७९ मोत्यें.
―――
१५६

८ प्रत बदल मीर अमल, दिंमत मशारनिल्हेपैकीं, किंमत रुपये २७५९.
येकूण ―――――――――――――― दागिने.
१ हार टीकाचा, घांट मिनेगार मिना हिरवा व पांढरा, खेरीज, पदक, किंमत रुपये ६२९.
२० पदकांस किंमत रुपये १७६.
१८ हिरे व हिरकण्या, अजमासें रती४दर २५ प्रमाणें रुपये १००.
२ पाचा किंमत रुपये ५१.

१ प्रत मदनाईक चौकी, अजमासें रती५दर७ प्रमाणें, रुपये ३५.
१ प्रत लोलकमणी, अजमासें रती सुमारे २ रुपये १६.
२
० सोनें व अजुरा रुपये २५.
२०
३३८ टीका, दर २१ प्रमाणें ४२ येकूण रुपये ४४९.
२९४ हिरे, हिरकण्या, अजमासें रती १७ दर १५प्रमाणें रुपये २५५.
२४० टीका ४० दर ६ प्रमाणें.
१४ टीका २ दर ७.
२५४
७२ मोत्यें, टीका ३६ येकूण दर २ प्रमाणें, अजमासें चव २५ दर १॥ प्रमाणें रुपये ३७॥.
१२ माणीक मणीं, टीका ६ दर २ प्रमाणें, किंमत दर -।॥- प्रमाणें रुपये. ९.
० सोनें, व आजुरा रुपये. १४७॥.
३३८
३५८
१ शिरपेंच, घाट मिनेगार, मिना हिरवा व पांढरा, रुपये ३१५.
येकूण ——— शहत.
४६ हिरे व हिरकण्या, अजमासें रती १० दर २२ प्रमाणें किंमत रुपये २२०.
४ पाचा किंमत रुपये ५२॥.
३ प्रत मदनाईक, अजमासें रती १५ दर २ प्रमाणें रुपये ३०.
२ प्रत बाजूस लांबट,
१ नाईक गडा थोर,
३
१ प्रत, मणी लोलक, वजन रती ९ दर ३॥ प्रमाणें रुपये २२॥.
४
० सोनें व आजुरा ४२॥.

१ जगोघांट मिनेगार, मिना हिरवा व सफेद किंमत रुपये. ३४०.

———————————————— शहत.

५४ हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती १० दर २५ प्रमाणें रुपये. २५०.

२ पाचा किंमत रुपये. ४६॥.

१ प्रत मदनाईक लांबट, अजमासें रती ६ दर ४ प्रमाणें रुपये. २४.

१ प्रत लोलकमणी, अजमासें रती ९ दर २॥ प्रमाणें रुपये २२॥.

२

० सोनें व अजुरा रुपये. ४३॥.

५६

२ पोंहोंच्या घाट मिनेगार, मिनालाल व निळा व सफेद, पेट्या व सोमासें दर १० प्रमाणें २० व मधील फूलें दर १ प्रमाणें २ येकूण किंमत रुपये. ७००.

———————————————— शहत.

१२२ हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती, रुपये. ५८५.

२४ प्रत वजन रती १० दर ३० प्रमाणें रुपये ३००.

८० प्रतफुलाचे मोतीं, चौक्या वजन रती दर ४० प्रमाणें रुपये ६०.

१६ प्रतफुलांचे घेरास रती ५ दर ३० प्रमाणें किंमत रुपये १९०.

१२२ (नग २ रुपये ६० चे नमूद नाहींत.)

० सोनें व अजुरा रुपये. ११९.

१२२

२ बाजूदंडाच्या घाट मिनेगार, मिना लाल व हिरवा व पांढरा, किंमत रुपये. ५२५.

———————————————— शहत.

८८ हिरे व हिरकण्या दर ४४ प्रमाणें, अजमासें वजन रती १८ दर १८ प्रमाणें रुपये. ३२४

६ पाचामदनाईक, दर ३ प्रमाणें, अजमासें वजन रती २५ दर ४ प्रमाणें किंमत रुपये. १००

० सोनें व अजुरा रुपये. १०१

९४

१ तुरा, खेरीज दांडी व फुल घाट मिनेगार, किंमत रुपये २५०.

३५ फूल खेरीज दांडी मळसुत्री, मिनेगार. रुपये १३०.

९ हिरे व हिरकण्या, आजमासें वजन रती २॥

दर २० प्रमाणें. रुपये ५०.

४ फुलास.

५ दांडीस फूल १ व बेलाचें पान येक येकूण.

९

१८ पाचा अजमासें वजन रती. रुपये ३५।.

१ प्रत मदनाईक, माथेदार वजन रती ३. रुपये १८.

४ प्रत वजन रती २॥ दर ३ प्रमाणें. रुपये ७॥.

८ प्रत फुलांचे मागें रती. रुपये ६.

५ दांडीचे फुलांस व बेलाचें पानास,

रती १। दर ३ प्रमाणें, रुपये ३॥।.

१८

८ मोतीं लटकतीं सभोंवती, दर दाणा रुपये १।प्रमाणें किंमत रुपये १०.

० सोनें फुलाचें व दांडीचें मिळोन व आजुरा, रुपये ३४॥।.

३५

१३० सरास, सर मोत्यांचे येकूण किंमत रुपये १२०.

६ सरांचे माथामणी १ येकूण रुपये. १३.

३ पाचा रुपये ३.

३ मोत्यें लटकती. रुपये ५.

६

० सोनें व आजुरा रुपये ५.

६

१०८ मोत्यें सरास, आजमासें चव १२ दर ६ प्रमाणें, रुपये ७२.

१६ टीका, शेवटास लटकत्या. रुपये ३५.

३ हीरे, अजमासें रती -॥· दर १४ प्रमाणें रुपये ७.

४ पाचा. रुपये ४.

९ मोत्यें लटकतीं. दर दाणा रुपये १। प्रमाणें रुपये ११।.
० सोनें व अजुरा रुपये. १२॥।.

१६

१३०

१६५

तपसील.

१२ हिरे व हिरकण्या.
२५ पाचा व किर्डे.
१२८ मोत्यें.

१६५

२ सौभाग्यवती वाराणशीबाई यांस आले ते किंमत रुपये १६०५.

जडाव दागिनें,

१ बाबत नबाब पोलादजंग बहादरपैकीं हार टीकाचा, घाट मिनेगार, मिना हिरवा व पांढरा, किंमत रुपये ८४०.

शहत.

३७ पदकास घाट मिनेगार, किंमत रुपये १९२.
३६ हिरे व हिरकण्या अजमासें वजन रती. रुपये १११.
१३ प्रत घेराचे मोत्यांसुद्धां रती ३
दर २५ प्रमाणें. रुपये ७५
२३ प्रत बारीक घेराचें, वजन रती २
दर १८ प्रमाणें. रुपये ३६.

३६

१ पाचमणी लोलक वजन रती ७ दर ८ प्रमाणें. रुपये ५६.
० सोनें व आजुरा. रुपये २९.

३७

३२६ टीका व सोमासें दर २० प्रमाणें ४० येकूण किंमत. रुपये ६४८.
२४२ हिरकण्या अजमासें रती २४ दर १६ प्रमाणें. रुपये ३८४.
४ पाच किर्डे, सोमाशांस, रुपये. ।•

८० मोत्यें अजमासें चव ३० दर ३॥ प्रमाणें, रुपये १०५.
० सोनें व आज़ुरा रुपये १५८॥.

३२६

३६३

२ बाबद मिर अलम दिमत मशारनिल्हे पैकीं पोंहोच्या, घाट मिनेगार मिना हिरवा व सफेद, टीका २८ व मधील फुलें दोन एकूण किंमत रुपये७६९.

शहत.

१०० हिरे व हिरकण्या, अजमासें वजन रती २९ दर २५ प्रमाण किंमत रुपये. ६२५.
२ पाचा मदनाईक दर १ प्रमाणें, अजमासें वजन रती ८ दर ८ प्रमाणें किंमत रुपये. ६४.
० सोने व अज़ुरा किंमत रुपये. ७६.

१०२

३

१९

१ राजकीय (ब) इतर माहिती.

(२०) जंजिऱ्याचा नवाब.

१२५।२३९. सिद्दी अबदूल करीमखान शामल जंजिरेकर यांजकडे जहागीर सरकारांतून चालत होती, त्यास ते मृत्यु पावले. त्यांचे पुत्र आहेत त्यांचीं नांवें.

इ. स. १८११।१२ इसन्ने अशर मयातैन व अलफ रबिलावल १.

१ सिद्दी इभ्रामखान.
१ सिद्दी इसमानखान.
१ सिद्दी महमदखान.

---

125. Siddi Abdul Karimkhan of Jangira died leaving 6 sons—Siddi Ibhramkhan, Siddi Ismankhan, Siddi Mahamadkhan, Siddi Yousabkhan, Siddi Abdulkadarkhan and Siddi Abdulakhan. The 2nd of these sons asked for a portion and represented that he could not live amicably with his brothers and requested the Peshwa to give him his share in the Jahagir enjoyed by his father from the Peshwa's Government. His request was granted and the revenues of 3 villages were assigned to him.

A. D. 1811-12.

१ सिद्दी युसबखान.
१ सिद्दी अबदुल कादरखान.
१ सिद्दी अबदुलाखान.

६

येकूण सहा पुत्र, यांपैकीं दुसरे पुत्र सिद्दी इसमानखान यांणीं हुजूर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले भाऊ पांचजण यांसी एकत्र बनेना, यांजकरितां वडील भाऊ सिद्दी इभ्रामखान यांजवळ आपले हिशाची सहावी वांटणी मागितली परंतु ते देत नाहींत, याजकरितां सरकारांतून वांटणी करून देविली पाहिजे. म्हणोन त्याजवरून सिद्दी अबदुल करीमखान यांचें नांवें सरकारांतून जहागीर चालत आहे त्याची बेरीज रुपये.

७०२७९। परगणें सत्रागांव प्रांत गुजराथ येथील आकार सन सीत समानीनांत जाहला आहे ते बेरीज ऐन जमा व शिवाय जमा वगैरे मिळोन बेरीज रुपये७५१०८॥ पैकीं वजा सरकारांत सरसुभा प्रांत मजकुराकडे

२३२९। मुलजा फकरूद्दीन यांजबाबत दीड गांवची जप्ती सरसुभाकडे आहे त्याची बेरीज रुपये.

२५०० देसाईगिरी बाबत सरसुभा सालाबाद द्यावे लागतात ते रुपये.

४८२९।

बाकी रुपये.

१५९७६६≈ परगणे पारचोल प्रांत गुजराथ पैकीं तीन गांव आहेत तेथील आकार सन सबा समानीनांत जाहला, त्याप्रमाणें ऐन जमा व खेरीज जमा मिळोन.

८२४७८≈ मौजे वडेछा.

४१४६। मौजे कोथा.

३५८२॥। मौजे वासण.

१५९७६८≈

८६२९५।≈

येकूण शायसी हजार दोनशेंसवापंचावन रुपये तीन आणे, पैकीं त्यांचे दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांजकडे सहावे हिशाचे वाटणीचे जहागिरीची बेरीज रुपये.

१४३७५॥।=॥ यांसी गांव परगणें पारचोल पैकीं.

८२४७८≈ मौजे वडेछा.

४१४६। मौजे कोथा.

१९८२।≈॥ मौजे वासण येथील जमा ३५८२॥। रुपये पैकीं नेमणूक रुपये.

१४३७५॥।=॥

येकूण चवदा हजार तीनशें पावणेंशहात्तर रुपये अडीच आणे बेरजेची जहागीर सिद्दी इस्मानखान यांजकडे परगणें पारचोल पैकीं गांवचा अंमल पेशजीचे जहागिरींतील सालमजकुरीं लावून देविला येविसी सनदापत्रें.

१ सिद्दी इभ्रामखान यांस कीं तुमचे तीर्थरूप सिद्दी अबदुल करीमखान यांजकडे जहागीर सरकारांतून चालत होती, त्या बेरजेंत परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं तीन गांवचा अंमल आहे, त्यास ते मृत्यु पावले, त्यांचे पुत्र तुह्मांसुद्धां साहा, यांजपैकीं दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांणीं हुजूर पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले भाऊ पांचजण यांसी येकत्र बनेना, याजकरितां वडील भाऊ सिद्दी इभ्रामखान यांजवळ आपले हिशाची सहावी वांटणी मागितली परंतु देत नाहीं, याजकरितां सरकारांतून वांटणी करून देविली पाहिजे. म्हणून त्याजवरून सिद्दी अबदुल करीमखान यांचे नांवें सरकारांतून जहागीर चालत आहे त्याची बेरीज रुपये ८६२५५।≡ शायसी हजार दोनशें सव्वापंचावन रुपये तीन आणे, पैकीं त्यांचे दुसरे पुत्र सिद्दी इस्मानखान यांजकडे सहावे हिशाचे वांटनीचे जहागिरीची बेरीज रुपये १४३७५॥।=॥ चवदा हजार तीनशें पावणेंशहात्तर रुपये अडीच आणे, यांसी परगणें पारचोल प्रांत गुजराथ पैकीं सदरहु गांव आहेत त्यापैकीं बेरीज रुपये.

८२४७८≡ मौजे वेडेछा.
४१४६। मौजे कोथा.
१९८२।≡॥ मौजे वासण येथील जमा ३५८२॥। पैकीं नेमणूक रुपये.

१४३७५॥।=॥

येकूण चवदा हजार तीनशें पावणे शाहात्तर रुपये अडीच आणे बेरजेची जाहागीर पेशजीचे जाहागिरीपैकीं सालमजकुरीं लाऊन देविली असे. तरी वर लिहिल्याप्रमाणें मौजे वडेछा व मौजे कोथा येथील अमल व मौजे वासणपैकीं एक हजार नऊशें सवाब्यायशीं रुपये साडे तीन आणे नेमणूक सिद्दी इस्मानखान घेतील म्हणोन. सनद.

४ यासी रुजू होऊन अंमल व नेमणुकेचा वसूल सुरळीत देणें म्हणून

३ गांवचे मोकदम यांस. सनदा.

१ मौजे वडेछा.
१ मौजे कोथा.
१ मौजे वासण, येथील नेमणूक रुपये १९८२।≡॥ येविसी.

३

१ जमीदार परगणें मजकुरचे यास.

४

५

रसानगीयादी.

१ राजकीय (व) इतर माहिती.

(२१) हैदरअली व टिपू.

१२६।१६. कमावीस भेट राजश्री आपासाहेब यांसी, बाबद टिपू सुलतान बहादर यांणीं पाठविलीं, ती गुजारत मल्हारजी गाइकवाड खीजमतगार, सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९६-९७. सबा तिसेन मया व अलफ रबिलाखर १.

१४	चिरा जरी, कारचोबी	१.
१६	पटका जरी, कारचोबी	१.
६०	जामेवार जरी, कारचोबी	२ दर ३०.
१००	किनखाप	१.
१९०		५.

जमा जामदारखाना.

१२७।८२. कमावीसभेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत नबाब टिपू सुलतान यांजकडील वकील वाड्यांत भेटीस आले ते समयीं दिल्ही. गुजारत मुरारजी येवला खीजमतगार सनगें येकूण रुपये.

इ० स० १७९८।९९. तिसा तिसेन मया व अलफ. साबान ३.

२४	चिरा जरी, कारचोबी सोनेरी	१.
२३	पटका जरी, सोनेरी कारचोबी	१.
९२॥	जामेवार जरी, कारचोबी सोनेरी	२.
६०	किनखाप	१.
१९९॥		५

१ राजकीय (व) इतर माहिती.

(२२) यूरोपांतील राष्ट्रें.

(अ) इंग्रज.

१२८।३०. रघुनाथ रणसोड याजकडे मुंबईचें वकीलीचें काम होतें तें दूर करून रामचंद्र कृष्ण याजकडे सांगोन नेमणूक सालीना रुपये.

इ. स. १७९६।९७ सबा तिसेन मया व अलफ; सवाल ३.

A. D. 1796-97. 126. Present of cloths was received by Appasaheb from Tipoo Sultan Bahadoor.

A. D. 1798-99. 127. Tipoo's Agent came to the palace to pay a visit to the Peshwa.

A. D. 1796-97. 128. Ramchandra Krishna was appointed to the office of Government agent at Bombay displacing Raghunath Ransod.

५४२ रघुनाथ रणसोड यास नेमणूक होती त्याप्रमाणें.

रुपये.

३८८ नक्त.

१०० जातीस.

२८८ पर दरबारी आहेत सबब दरमाही खर्चास रुपये.

१२ गाडीस.

१२ पोटखर्चाबद्दल.

२४

बारमाहीचे.

३८८

१९४ ऐन जिन्नस भात गोडें खंडी १० येकूण, दर खंडीस अजमासाचे दराप्रमाणें रुपये १५।=। येकूण.

५४२

१५८ जाजती मशारनिल्हे यांस दिवट्या व आत्फागिरा व पोरगासुद्धां.

७००

येकूण सातशें रुपये नेमणूक सालमजकुरापासून द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून प्रांत बेलापुर पैकीं दरसाल देत जाणें. म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें सनद.

रसानगीयादी.

१२९।६१. कमावीस भेट, बाबद कर्नल पालमर वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांजकडे मेजवानीस गेले तेथें आली तीं सनंगें एकूण रुपये.

इ. स. १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जिल्काद ५.

७९२ राजश्री बाबासाहेब यांसी गुजारत भिवजी ढवळा खिजमतगार, सनंगें एकूण.

रुपये.

१७	तिवट.	१.
४९	दुपटा.	१.
२००	शालफर्द.	२. दर १०० प्रमाणें.
२५	पटका.	१.
१३०	शेले साधे.	६.

A. D. 1797 98. 129. The Peshwa went to a feast at Col Palmer's and was given a present of clothes.

१९० किनखाप २.
९१॥=मुसेजर सनंग ॥|.

६१८॥= १३॥|
१३३॥ गजवार गज येकूण रुपये.
७५ मखमल गज १० दर ७॥.
९८॥ सकलाद गज ६॥ दर ९.

१३३॥ १६॥

७५२८= सनंगें १३॥| गज १६॥
४३९ राजश्री आपासाहेब यांसी गुजारत रामजी जोरी खिजमतगार सनंगें येकूण.
१८ तिवट १.
३५ दुपटा १.
१८० शालफर्द २ दर ९० प्रमाणें रुपये.
३० पटका १.
७५ किनखाप १.
६९ शेले साधे धुवट ३.

४०३ ९
३६ मखमल गज ४ दर ९ प्रमाणें रुपये.

४३९ सनंगें ९ गज ४.

११९१८= सनंगें २२॥| गज २०॥.

१३०।६९. रामचंद्र कृष्ण यांजकडे मुंबईचें वकीलीचें कामकाज होतें तें सालमजकुरीं त्यांजकडून दूर करून हरि सदाशिव यास सांगोन तैनात सालीना रामचंद्र कृष्ण यास पावत होती ती रुपये ७०० पैकीं वजा दिवट्या, अबदागिरा, व पोरगा मिळोन रुपये सालगुदस्तां नेमणूक करून दिल्हे होते ते कमी केले १९८, बाकी मशारनिल्हे यांस तैनात सालीना रुपये.

इ. स. १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
जिल्हेज ३.

३८८ नक्त रुपये.
१०० जातीस.
२८८ परदरबारी आहेत, सबब दरमहा खर्चास रुपये.
१२ पोटखर्चाबद्दल.

---

130. Hari Sadashiv was appointed Agent at Bombay in place of Ramchandra Krishna. His annual emoluments were fixed at Rupess 542.

A. D. 1797-98.

१२ गाडीस.

२४

बारमाही रुपये.

३८८

१९४ ऐन जिन्नस भात गोडें खंडी १०, दर खंडीस अजमासें दराप्रमाणें १५।=। प्रमाणें रुपये.

५४२

येकूण पांचशें बेचाळीस रुपये सालीना करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून सदरहुप्रमाणें तैनात प्रांत बेलापूर पैकीं देत जाणें, म्हणोन आपाजी विष्णु याचें नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

इ. स. १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
जिलकाद १५.

१३१।९३. तालुके रत्नागिरी येथें इंग्रज कलकत्तेकर यांजकडील पलटणें आली आहेत याजकरितां तालुके मजकुरचे बंदोबस्तास दोनशें लोक जाजती जदीद ठेवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. म्हणोन तुम्ही विदित केलें त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी तालुके मजकुरचे बंदोबस्तास लोक असामी २०० दोनशें जदीद तालुक्याचे शिरस्त्याप्रमाणें इंग्रजाकडील पलटणें तालुके मजकुरीं राहतील तोंपर्यंत ठेऊन बंदोबस्त करणें.

इ० स० १७९८–९९
तिसा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज २२.

१३२।९६. कमावीस भेट, राजश्री बाबासाहेब यांसी बाबत मेस्त्रपालमर (मि. पालमर) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर श्रीरंगपटणचें लढाईचें वर्तमान सांगावयासी वाड्यांत आले ते समयीं दिल्हीं, तीं गुजारत मुरारजी येवला खीजमतगार. सनंगें येकूण रुपये.

१९।	चिरा जरी कारचोबी	१.
६७॥	जामेवार जरी कारचोबी	२.
१९।	पटका जरी कारचोबी	१.
६०	किनखाप	१.
१६६।		५.

131. An army of the English at Calcatta having gone to Taluka Ratnagiri, A. D. 1798-99, the force in the Taluka was increased.

132. Clothes were received from Mr. Palmer Agent of the English at Calcatta on the occasion of his visit to the palace to communicate news of the battle of Seringapatan. A. D. 1798-99.

१३३।११९ बदल देणें परदरबारखर्च, शोरजनराल (सर जॉन शोअर) यांजकडे कलकत्यास लाला चिमणलाल कारकून शिलेदार यास हत्ती व घोडे व पोषाक देऊन सन अर्बा तिसेनांत पाठविलें होते, त्यास खरेदी हत्ती व घोडे करावयास वगैरे तेच सालीं खर्च जाहला. तो रुपये.

इ० स० १८००–०१ इहिदे मया तैन व अलफ. सवाल २७.

१७४१॥ हत्ती व घोडे खरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१०३७॥। हत्ती छ ९ जमादिलाखरीं अजिमाबादचे मुकामीं खरेदी केला. नग १ किंमत रुपये.

७०३॥। घोडे खरेदी केले त्यांची किंमत रुपये.

१७४१॥

१०६८⁄ महात व गडेकरी व मोतादार जदीद ठेविले, त्यांचा तागाईत छ १९ साबान पावेतों मुदत माफक आकार, कलकत्यांहून माघारे जातां येकमहा दिल्हा तो मिळोन. रुपये.

९० नूरेखान वलद पीरखान महात.

१३।⁄। शेखहुसेन वलद शेखइनायत गडेकरी.

२३॥।⁄। जहानखान वलद रुस्तुमखान मोतादार.

१८॥।=॥ महमदखान वलद हमीदखान मोतादार.

१०६८⁄

९०॥।= हत्ती व घोडे यांस कलकत्यास जातां मार्गीं चंदी, रतीब, व वैरण वगैरे खरेदी करून चारिलें त्याची किंमत तागाईत छ १५ साबान पावेतों रुपये.

५९॥।≡॥। हत्ती नग १ यास रतीब वगैरे इस्तगबील छ ९ जमादिलाखर मुदत माहे २८११ वजा येकूण तिसा रोज ८१ बाकी एकादशीस मजलींमुळें रतीब चारिला त्या सुद्धां मुदत माहे २८१० रुपये.

३०॥।=। घोडे २ यांस चंदी वगैरे मिळोन रुपये.

९०॥।=

७२॥≡ हत्ती व घोडे यांस लागवड सामान कलकत्याचें मुकामीं केलें त्यास खर्च रुपये.

---

133. Elephants, horses, and dresses of honor were sent as a present to General Shore of Calcatta in A. D. 1793—94.

A. D. 1800-1801.

५०|||= हत्ती नग १ यास गाशा व सरी सकलादी केली त्यास रुपये.
२१|||- घोडे २ यांस. रुपये.
७२||≡
७० हुंडणावळ पुण्यांत लाला काशमरी याचें दुकानीं दोन हजार रुपयांची हुंडी कलकत्याची करून घेतली त्यास हुंडणावळ पडली ते रुपये.

२०८१८=

पैकीं वजासूट मखलासी समयीं घातली ते रुपये ११८=.
बाकी रसानगीयाद. रुपये २०७०.

दोन हजार सत्तर रुपये तसलमात लाला चिमणलाल कारकून शिलेदार याचे तसलमातीस छ २६ जिलकाद सन सीत तिसेनांत अखेर सालीं पोतापैकीं सदरहु रुपये खर्च पडले आहेत, ते जमा धरून देविले. रुपये.

१३४|१९८ इंग्रजाकडील पलटणे सहा सरकार तैनातीस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपीचे यादीवर शिक्का केला आहे. त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत, त्यांपैकीं गुजराथेंतील व कर्नाटकाचे महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्कयाचे यादीपैकीं इंग्रज आपला अंमल बसवितील त्यास तुह्मीं अडथळा न करणें. ज्या ज्या महालीं अमल बसवितील तेथें बसूं देणें आणि अमक्या महालांत अंमल बसविला ह्मणोन हुजूर विनंति लिहून पाठवणें. ह्मणजे अलाहिदा शिक्कयाचे यादीवरील व तुमचे लिहिणें येईल त्या महालास ताळा पहावयास येईल ह्मणोन

इ० स० १८०२–०३
सलास मया तैन व अलफ.
जिल्हेज १४.

सनदा.

१ खंडेराव निळकंठ सरसुभा प्रांत गुजराथ यांस गुजराथेंतील महालाविसी.
१ समस्त सरदार महालानिहाय प्रांत कर्नाटक यांस कर्नाटकचे महालाविसी.
२

रसानगीयादी.

---

134. It was settled that the English should keep 6 battalions for service under Government and that they (the English) should be given a territory worth Rs. 26 Lacs in Guzerath and Karnatic as detailed in a separate memo in English. Orders were issued to the officers of Guzerat and Karnatik to allow the English to occupy the territory specified in the memo.

A. D. 1802-1803.

१३५।१६३ इंग्रजांकडील पलटणें सहा सरकार तैनातेस ठेऊन त्यांचे खर्चास सवीस लक्ष रुपयांचे महाल नांवनिशीवार गुजराथ व कर्नाटक मिळोन अलाहिदा इंग्रजी लिपीचे यादीवर शिक्का केला आहे, त्यांत सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे महाल ठरले आहेत. त्यांपैकीं गुजराथेंतील महाल यादींत नेमले आहेत. त्या शिक्क्याचे यादींपैकीं किल्ले पारनेरा प्रांत मजकूर व महाल येथें इंग्रज आपला अमल बसवितील. त्यास मशार निल्हेचे स्वाधीन किल्ला करून कबज घेणें ह्मणोन. सनदा.

इ० स० १८०३–०४ आर्बा मया तैन व अलफ रबिलाबल ७.

१ किल्ले मजकूर निसबत गोविंदराव कृष्ण यांस.
१ हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस.
१ परगणें मजकूर निसबत धोंडोराम यांस.
३

रसानगीयाद.

१३६।१६७ सरकारचा व कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचा तह वसईचे मुकामीं सालगुदस्ता सनसह्लास मया तैनांत जाहला, ते समयीं कुंपणी इंग्रज बहादूर यांचे सरकारचीं पलटणें सरकारांत चाकरीस ठेविलीं त्यांचे खर्चास प्रांत गुजराथपैकीं परगणें उरपाड वगैरे महाल व प्रांत कर्नाटक येथील प्रांत सावनूर वगैरे महाल मिळोन सवीस लक्ष रुपयांचे बेरजेचे ला-

इ० स० १८०३–०४ आर्बा मया तैन व अलफ. जमादिलाखर. १८.

---

135. The fort and amal of Parnera in Guzerath were included in the territory worth Rs 26 lacs assigned to them(Engltsh) in consideration of their placing 6 battalions at the disposal of Government. Orders were now issued for the surrender of the fort and Mahal in question.

A. D. 1803-1804.

बाळाजी कृष्ण भोगले.	१	१	१०
बाजी रघुनाथ भावे.	१	१॥	१५
महादाजी नारायण अभ्यंकर.	१	१	१०
विसाजी बहिरव ढवळे.	१	२	२०
जगन्नाथ बल्लाळ गानु.	१	१	१०
जनार्दन बाबुराव गोडबोले.	१	१	१०
मोरो आबाजी साठे.	१	१	१०
वासुदेव त्रिंबक अचवळ.	१	१	१०
आबाजी त्रिंबक जोगळेकर.	१	२	२०

नारो कृष्ण गद्रे.	१	२	२०
बाळाजी सदाशिव करमरकर.	१	१	१०
धोंडो बल्लाळ लेले.	१	१	१०
आपाजी राम सदावर्ती.	१	१	१०
बाळाजी रघुनाथ वेलणकर.	१	१	१०
लक्ष्मण दादाजी खाडीलकर.	१	१	१०
आबाजी भिकाजी फडके.	१	१	१०
बापुजी अनंत देवधर.	१	१	१०
लक्ष्मण सदाशिव अभ्यंकर.	१	१	१०
गणेश बल्लाळ हडप.	१	१॥	१५
अंताजी विश्वनाथ खांडेकर.	१	१	१०
हरि नारायण कोल्हटकर.	१	१	१०
मोरो हरि करंदीकर.	१	२॥	२५
मोरो कृष्ण दाभोळकर,	१	१॥	१५
बाळाजी सदाशिव वैशंपायन.	१	२	२०
दादो बल्लाळ अचवळ.	१	१	१०
निळो रंगनाथ करमरकर.	१	१	१०
नारो शिवराम चक्रदेव.	३	१३	३०
त्रिंबक महादेव जोशी.	१	१	१०
मोरो आपाजी भावे.	१	२	२०
रामचंद्र गोपाळ करकरे.	१	३	३०
लक्ष्मण दिनकर करंदीकर.	१	१	१०
गोविंद हरि देवधर.	१	२	२०
रघुनाथ मोरेश्वर देवधर.	१	४	४०
राघो नारायण ओक.	१	१	१०
अंताजी बल्लाळ जोशी.	१	१	१०
नारो महादेव अभ्यंकर.	१	१॥	१५
कृष्णाजी गणेश रहाळकर.	१	१॥	१५
नारो गणेश लिमये.	१	१	१०
कृष्णाजी रघुनाथ दातार.	१	१	१०
गोविंद हरि भट.	१	१॥	१५
लक्ष्मण बल्लाल गोखले.	१	१॥	१५
गोपाळ लक्ष्मण लवाटे.	१	१	१०
रामचंद्र बल्लाळ गोखले.	१	१	१०

मोरो गोविंद पटवर्धन.	१	१	१०
अंताजी गोविंद केळकर.	१	१	१०
चिमणाजी नारायण फडके.	१	१	१०
चिमणाजी बल्लाळ ह्मसकर.	१	-॥-	७
त्रिंबक नारायण जोशी.	१	-॥-	७
बाळाजी अनंत पंडित.	१	-॥-	७
आबाजी राम जोशी.	१	-॥-	७
सदाशिव गोविंद देवधर.	१	१॥	१५
आबाजी शंकर जोशी.	१	-॥-	७
विठ्ठल बल्लाळ दाल्ये.	१	१	१०
गोविंद केशव बिवलकर.	१	१	१०
महादाजी बल्लाळ कर्वे.	१	१	१०
पांडुरंग रामचंद्र देवधर.	१	३	३०
राघो नारायण साठे.	१	१	१०
विनायक नारायण गोखले.	१	-॥-	७
बाळाजी गणेश जोशी.	१	-॥-	७
बापुजी अनंत.	१	-॥-	७
पांडुरंग गोविंद.	१	-॥-	७
बाजी रवलनाथ घाटे माजी प्रतापगडकरी.	१	२	२०
नारोराम.	१	१	१०
महादाजी रघुनाथ जोशी.	१	१	१०
कोन्हेर राम.	१	१	१०
निलकंठ खंडेराव कारकून.	२	३	७०
रामचंद्र गोपाळ.	१	१॥	१५
बाळाजी केशव.	१	१	१०
वासुदेव शिवराम जोशी निसबत दप्तर पोतनिशी	१	२	२०
महादाजी गोविंद.	१	१	१०
केसो जगन्नाथ.	१	-॥-	५
पांडुरंग हरि वैद्य.	१	१॥	१५
बाळाजी सदाशिव निसबत जिराईतखाना.	१	१	१०
रामचंद्र नारायण.	१	१	१०
आबाजी हरि.	१	१	१०

शिवराम बल्लाळ.	१	-॥-	५
भालचंद्र विनायक.	१	-॥-	५
अंताजी महादेव.	१	-॥-	५
लक्ष्मण गणेश गोगटे.	१	१	१०
शिवराम विश्वनाथ सोवनी.	१	२	२०
महिपतराव हारे.	१	२	२०
नारो लक्ष्मण.	१	३	३०
गोपाळ महादेव.	१	१	१०
बाळकृष्ण बाबाजी वैद्य.	१	१॥	१५
विठ्ठल मोरेश्वर.	१	२	२०
त्रिंबक विश्वनाथ भाटवडेकर.	१	२	२०
भगवंत गंगाधर मौजे माळशिरस येथें आणतील त्याविसी.	१	१॥	१५
विसाजी आबाजी.	१	-॥-	५
रामचंद्र बल्लाळ वैद्य.	१	१॥	१५
मोरो नारायण.	१	१	१०
बापुजी महादेव गुणे.	१	-॥-	५
रामचंद्र गणेश परांजपे.	१	१	१०
हारे त्रिंबक भावे.	१	१	१०
	१९१	४२०॥।	३८४८

येकूण चारशें पावणे एकवीस खंडी. येकूण बैलसर तीन हजार आठशें आठेचाळीस. यांचीं दस्तकें एकशें एक्याणव दिल्हीं असत.

१९८।६९ प्रांत गुजराथ मही दक्षिणतीर येथील सरसुभा आनंदराव भिकाजी याजकडे होता. तो दूर करून सालमजकुरीं बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितला येविसी. सनदा पत्रें.

इ. स. १७९८।९९.
तिसा तिसेन मयाव अलफ
मोहरम २०

१ अनंदराव भिकाजी यांस कीं, महालानिहाय येथील घांस दाण्याचे ऐवजीं वगैरे तुह्मा-कडे वसूल पडला असेल त्यापैंकीं महाल मजकूर खर्चाची हिशेरसीद नेमणुकेप्रमाणें मुदत माफक होईल ते वजा करून बाकी ऐवज राहील तो याजकडे माघारा देऊन कबज घेणें ह्मणोन सनद. १.

११ कमावीसदार महालानिहाय व फुटगांव यांस कीं, वहिवाट मशारनिल्हेचे विद्य-मानें करीत जाणें. ह्मणोन सनदा.

---

198. Baloji Kunjar was appointed to the office of Sir Subha of Prant Gujarath to the South of the Mahi in supercession of Anandrao Bhikaji.
A. D. 1798-99.

१ अनंदराव विठ्ठल कमावीसदार शहर सुरत व मौजे फुलपाडे वगैरे तीन गांव परगणें चौऱ्यायशी येविसी.
१ सदाशिव कुंजीर फाल्हई यांस.
१ खंडो मोरेश्वर कमावीसदार परगणें सावला यांस.
१ महादाजी बल्लाळ कमावीसदार परगणें बलवाड यांस.
१ सदाशिव केशव कमावीसदार परगणे सरभुवन यांस.
१ आबाजी बापूजी कमावीसदार जकात तापी दक्षिणतीर.
१ विठ्ठल नारायण व चिंतो अनंत कमावीसदार परगणें हांसोट.
१ बाळोजी कुंजीर यास कीं, इमानें इतबारें (वर्तावें) ह्मणोन परगणें बलसाड वगैरे तीन महाल व पारनेरा येविसी.
१ नारायणराव यादव कमावीसदार परगणे अमोद व देहेनबारे.
१ आजीमजंग यांस परगणे जंबूसर व परगणें अंकलेश्वर व कसबें बारडोली येविसी.
१ निंबाजी भास्कर कमावीसदार परगणें पारचोलें यांस.

११

१७ रुजु होणें ह्मणोन सनदा पत्रें.

२ सनदा.

१ मौजे फुलपाडे वगैरे तीन गांव परगणें चौऱ्यायशी.
१ कमावीसदार बारडोली.

२

१५ महालानिहायचे जमीदारांस चिटणीसीं पत्रें.

१ परगणे बलसाड.
१ परगणे सावली.
१ परगणे बोहारी.
१ परगणे देहजबारें.
१ परगणे आमोद.
१ परगणे भुतसर.
१ परगणे पारनेरा.
१ परगणे पारचोल.
१ परगणे ढबई.
१ परगणे सरभुवन.
१ परगणे हांसोट.
१ परगणे बलवड.
१ परगणे अंकलेश्वर.

१ परगणे जंबूसर.

१ परगणे चौऱ्यायशी पैकीं मौजे फुलपाडे वगैरे देहे तीन येविसी.

१९

१७

१ बाळोजी कुंजीर यांस कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा साल मजकुरीं तुह्मांकडे सांगितला असे. तरी इमानें इतबारें वर्तोन चौकशीनें वहिवाट करून आलाहिदा बेहडा ठराऊन दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन सनद. १.

३०

येकूण तीस सनदा व पत्रें मिळोन दिल्हीं असेत.

रसानगीयादी.

१९९।८१ प्रांत कोंकण येथील सरसुभा चिरंजीव राजेश्री विनायक अमृतराव यांचे नांवें आहे. तेथील कामकाज वामनाजी हरि यास सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं गणपतराव जीवाजी यांस सांगितलें येविसी. सनदा.

इ. स. १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ साबान ३

१ गणपतराव जीवाजी याचे नांवें कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा यांचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांकडे सांगितलें असें. तरी इमानें इतबारें वर्तोन जमाखर्चाचा बेहडा आलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन. सनद.

१ वामनाजी हरि यास कीं, प्रांत मजकूर येथील सरसुभा याचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांस सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं गणपतराव जीवाजी यास सांगितलें असे. तरी सरसुभ्याकडे ऐवज जमा जाहला असेल त्यापैकीं नेमणुकी खर्च मुदत माफक हिसेरसीद वजा करून बाकी ऐवज राहील तो मशारनिल्हे यांजकडे देऊन कबज घेणें. व निसबतवार वगैरे बाकी असेल त्याची रुजुवात करून घेणें. ह्मणोन सनद.

२

रसानगीयाद.

२००।११० प्रांत गुजराथ येथील सरसुभा महिपतराव भवानी यांजकडे होता तो दूर

199. The Sir Soobha of Konkan stood in the name of Peshwa's nephew. Vinayak Amritrao, Ganpatrao Jiwaji was now appointed his deputy.
A. D. 1798-99.

200. The office of Sir Soobha of Guzarath was taken from Mahipatrao Bhawani and conferred on Baloji Kunjar.
A. D. 1800-1801.

इ. स. १८००।०१
इहिदे मयातैन व अलफ
सफर २२

करून सालमजकुरीं बाळोजी कुंजिर यांजकडे सांगितला आहे. त्यांस परगणें सत्रागांव प्रांत मजकूर येथील देसाईगिरिचा ऐवज सालाबाद सरसुभाकडे पावत असतो त्या बमोजिब देत जावा. ह्मणोन सिदि अबदुलकरीमखान यांस चिटणीसी पत्र १.

२०१।१११ प्रांत कोकण येथील सरसुभा चिरंजीव राजेश्री विनायक अमृतराव यांचे नांवें आहे. तेथील कामकाज तुह्मांकडे सांगितलें होतें. तें दूर करून सालमजकुरीं बाजीराव गोविंद यांजकडे सांगितलें असे. तरी तुह्मांकडे मुतालिकीचा शिक्का व मोर्तब व कटार व शिक्के दऊत येणेंप्रमाणें दागिने आहेत. ते आणावयाकारितां कृष्णाजी रोकडा व मोराजी ह्मसका खिजमतगार पाठविले आहेत यांजबरोबर सदरहूप्रमाणें दागिने हुजूर पाठवून देणें ह्मणोन गणपतराव जिवाजी यांचे नांवें सनद. १.

इ० स० १८००।०१
इहिदे मयातैन व अलफ
सफर १६.

परवानगीरुबरू.

२०२।१३० तालुके विजयदुर्ग येथील पोतनिशी धोंडो भोजदेव याजकडे आहे. ते त्याजकडून दूर करून नारो शंकर चितळे यास सालमजकुरापासून सांगोन नेमणूक सालीना धोंडो भोजदेव यास होती त्याजप्रमाणें रुपये.

इ० स० १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ
लफर १४

२५० नक्त मोईन.
२० कापड आंख ५० येकूण.
१०० कारकुनी.
३७०.

पैकीं वजा कमी रुपये ७० बाकी रुपये ३०० तीनशे सालीना करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी याचा पुत्र थोर चाकरीचे उपयोगी होईतों पावेतों मशारनिल्हे कारकून पाठवितील त्याचे हांतून तालुके मजकुरचे पोतनिशीचें कामकाज घेऊन सदरहू प्रमाणें तैनात व कारकुनी मिळोन सालीना पाववीत जाणें ह्मणोन आबाजी बापूजी मामलेदार याचे नांवें. सनद. १.

नारो शंकर चितळे याची असामी वाडयांत आचारीयांत होती. त्यास दरमहा रुपये १२ बारा रुपये पावत होते. त्यास तालुका विजयदुर्ग येथील पोतनिसीची असामी सांगोन सदरहू दरमहा दूर केला असें. रसानगीयाद येकंदर.

---

201. The Sir Soobha of Prant Konkan was held by Peshw's nephew Vinayak Amritrao and Bajirao Govind was appointed as his deputy.
A. D. 1800-1801.

202. Naro Shankar Chitale, a cook at the palace on Rs. 12 per month was appointed Potnis of Taluka Vijaydurga and was permitted to send a deputy to do the duties of the office till his son should come of age.
A. D. 1801-1802.

२०३।१३१ प्रांत बेलापूर येथील हशमनिशी लक्ष्मण हरि याजकडे आहे. ते त्याजकडून दूर करून महादाजी गणेश काणे यांस सालमजकुरापासून सांगोन तैनांत सालीना लक्ष्मण हरि यांस होती ते रुपये २०६ पैकीं वजा कमी रुपये ६ बाकी रुपये २०० दोनशें सालीना करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी याजपासून प्रांत मजकुर येथील हशमनिशीचें काम-काज घेऊन सदरहू प्रमाणें तैनांत सालीना पाववीत जाणें व लक्ष्मण हरि यांस कारकुनी पावत आली असेल ते प्रमाणें मजकुरचे हिशेबी जमा धरीत जाणें ह्मणोन त्रिंबक गणेश मामलेदार प्रांत मजकुर यांचे नांवें. सनद. १.

इ० स० १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ
सफर १४

महादजी गणेश काणे यांची असामी वाड्यांत शागिर्दांत तैनांत सालीना रुपये १७५ पावणेंदोनशे व कापड आंख १०० याप्रमाणें होती. त्यास मशारनिल्हे यांस प्रांत बेलापूर येथील हशमानिशि सांगून सदरहू शागिर्दांतलि असामी दूर केली असे. रसानगी याद येकंदर.

---

७. न्याय खातें.

(अ) दिवाणी.

२०४।२५ रघुपतराव दशरथ देशपांडे परगणें हुकेरी यांणीं हुजूर कसबे तासगांव प्रांत मिरज येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, आमचे भाऊबंद भीमराव व्यंकटेश देशपांडें परगणें मजकूर याणीं पुण्याचे मुक्कामीं हुजुर जाऊन विदित केलें कीं तिमाजी निलकंठ देशपांडे परगणे मजकूर यांस पुत्र संतान नव्हतें. सबब त्यांणीं आमचे बंधु शामराव यांस दत्तक घेतले दशरथराव कन्येचे पुत्र यास तिमाजी निळकंठ याणीं दत्त घेतला नाहीं. धर्मार्थ मुंज केली असतां दशरथराव तिमाजी निलकंठ यांच्या हिशाचें वतन खातात याजकरितां त्या वतनाची जप्ती झाली पाहिजे. त्याजवरून तिमाजी निलकंठ यांच्या वतनाची जप्ती करून जप्ती माहिपतराव कृष्ण यांजकडे सांगितली. त्याजवरून आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी देशपांडे परगणें मजकूर याणे हुजूर पुण्याचे मुक्कामीं जाऊन विदित केलें कीं, तिमाजी निल-कंठ यांणीं आह्मांस दत्तपुत्र घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याचे तक्षीमीचें वतन आम्हीं अन-भवीत आलों. व भिवराव यांचे वडिलांस तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं कापसी कर्यात धर्मवांटा दिल्हा असतां त्यांणी सरकारांत गैरवका समजाऊन आमच्या वतनाची जप्ती कर-

इ० स० १७९७।९८
समान तिसैन मयातैन व अलफ
मोहरम १०

---

203. Mahadaji Ganesh Kane, a Shagirda at the palace on Rs. 175 a year in addition to the clothes worth Rs 100 was appointed Hashamnis of Prant Belapoor.

A. D. 1801-1802.

204. A Deshpande of Hukeri adopted his daughter's son as his son. The fact of the adoption was however questioned by one of the Bhaubunds. The matter was inquired into the adoption having been proved, the adopted son was allowed to enjoy the watan.

A. D. 1797-98.

विली. यास्तव स्वामींनीं भिवराव व्यंकटेश याच्या वतनाची जप्ती करून उभयतांची पंचाईत मनास आणावयाची आज्ञा जाहली पाहिजे. त्याजवरून परशुराम रामचंद्र यांस सन समानिनांत सरकारांतून सनद सादर जाहली. जे दशरथराव तिमाजी यांच्या वतनाची जप्ती माहिपतराव कृष्ण यांजकडे सांगितली होती; ते दूर करून हल्लीं तुह्मांकडे सांगितली आहे. तरी तुम्ही भिमराव व्यंकटेश याचे वतनाची जप्ती करून उभयतांची पंचाईत करणें ह्मणोन. त्याजवरून आह्मी हरदुवाद्यांस परस्थळीं पंचाईतीस पाठवावयाचा ठराव केला. तों आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी निवर्तले, तेव्हां आम्हीं व आमचे बंधु रामाजी दशरथ यांचें व भीमराव व्यंकटेश यांचे राजीमतें अमदानगरचे स्थळ नेमून स्थळीं जाण्याचे राजीनामे व वर्तणुकेविसीं जामीन घेऊन परशुराम रामचंद्र यांणीं अमदानगरास महादाजी नारायण यांजकडे पत्रें देऊन मनसुबीस पाठविलें. तेथें त्यांनीं आह्मां उभयतांची मनसुबी पंचाईतमतें मनास आणितां भिमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यास तिमाजी निलकंठ यांणीं दत्तक घेतला. दशरथराव यांस तिमाजी निलकंठ यांणीं दत्तक विधिपूर्वक घेतलें नाहीं. धर्मार्थ मुंज केली असें ह्मणत होते. त्यांची पुरवणी त्याजकडून जाहली नाहीं. परंतु दशरथराव तिमाजी यांस तिमाजी निलकंठ यांणीं दत्त विधीपूर्वक घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याप्रमाणें दशरथराव तिमाजी, तिमाजी निलकंठ यांचें वृत्तीस अधिकारी होऊन भोगवटा करीत आले. ऐसी आह्मीं पुरवणी केली. त्याजवरून महादाजी नारायण यांणीं अमदानगरहून हरदुवाद्यांचे निवाड्याचीं कागद पत्रें पंचाईतमतें करून परशुराम रामचंद्र यांजकडे तासगांवीं पाठविलीं आणि आह्मां हरदुवाद्यांस निरोप दिल्हा. आम्हीं तासगांवीं आलों. भीमराव व्यंकटेश अमदानगराहून निघाले ते पुण्यास येऊन राहिले आणि सदरहूच्या फडशाकरितां आपले पुत्र येशवंत भीमराव यांस तासगांवीं पाठविलें. त्यास परशराम रामचंद्र यांनीं सांगितलें कीं, येविसीचे कागदपत्त भीमराव व्यंकटेश यांचे नांवचे आहेत यास्तव ते आले पाहिजेत. याजकरितां त्यास आणवणें. त्याजवरून भीमराव व्यंकटेश पुण्याहून निघून येत असतां मार्गीं मृत्यु पावले. व आमचे बंधु रामाजी दशरथ हे घरीं होते तेही निवर्तले. त्यांचे पुत्र हल्लीं येशवंत रामाजी आहेत. याकरितां अमदानगरच्या निवाडयाप्रमाणें वर्तू ह्मणोन आम्हांपासून व येशवंत भीमराव देशपांडे परगणे मजकूर यांजकडून राजीनामे लिहून घेऊन परशराम रामचंद्र यांनीं अमदानगराहून महादाजी नारायण यांजकडून निवाड्याचे कागदपत्रांचा लखोटा आला होता, तो आह्मां उभयतां वाद्यांसमक्ष फोडून वांचून पाहिला. त्यांत भीमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक घेतला दशरथराव यास तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक घेतले नाहीं. धर्ममुंज केली असें ह्मणत होते. त्याची पुरवणी त्यांजकडून जाहाली नाहीं. व आमचे तीर्थरूप दशरथराव तिमाजी हे कापसी कर्यांत तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं भीमराव व्यंकटेश यांचे वाडिलांस धर्मवाटा दिला असें ह्मणत होते. त्याची पुरवणी आह्मांकडून झाली नाहीं. परंतु आमचे तीर्थरूप दशरथराव उर्फ निलकंठ तिमाजी यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक

घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याजप्रमाणें तिमाजी निलकंठ यांचे वृत्तीस अधिकारी होऊन भोगवटा करीत आले. अशी पुरवणी कागदपत्रीं पंचाईत मतें आम्हीं केली. याप्रमाणें लिहिलें आहे. याकरितां स्वामींनीं कृपाळू होऊन अमदानगरच्या निवाड्यावरहुकूम आमच्या वतनाची जप्ती मोकळी होऊन तिमाजी निलकंठ यांचे दो तक्षिमीचें वतन आमचे स्वाधीन होय तें केलें पाहिजे. ह्मणून विनंति केली. त्याजवरून मनास आणतां भीमराव व्यंकटेश हे आपला बंधु शामराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक घेतला, दशरथराव यांस तिमाजी निलकंठ यांनीं दत्तक विधिपूर्वक घेतला नाहीं. धर्मार्थ मुंज केली असें ह्मणत होतें. त्याची पुरवणी भीमराव यांजकडून जाहली नाहीं. ते खोटें पडलें व रघुपतराव दशरथ याचे तीर्थरूप दशरथ तिमाजी हे कापसी कर्यांत तिमाजी निलकंठ यांच्या वडिलांनीं भीमराव व्यंकटेश यांच्या वडीलांस धर्मवांटा दिल्हा असें ह्मणत होतें. त्याची पुरवणी रघुपतराव दशरथ यांजकडून जाहली नाहीं. ते खोटें पडलें. परंतु दशरथराव उर्फ निळकंठ तिमाजी यांस तिमाजी निळकंठ यांणीं दत्तविधिपूर्वक घेऊन स्वगोत्रीं मुंज केली. त्याप्रमाणें दशरथराव तिमाजी, तिमाजी निळकंठ यांच्या वृत्तीस अधिकारी होऊन, भोगवटा करीत आले. अशी पुरवणी कागदपत्रीं व पंचाईतमतें रघुपतराव दशरथ यांणीं केली. असें नगरच्या निवाड्यांत लिहून आलें आहे. तें पाहून रघुपतराव दशरथ देशपांडे परगणे मजकूर यांस तिमाजी निळकंठ यांच्या दोन तक्षिमा देशपांडेपण वडीलकीसुद्धां वतन पूर्ववतप्रमाणें यांजकडे करार करून देऊन सालमजकुरापासून यांच्या वतनाची जप्ती मोकळी करून हें पत्र सादर केलें असे. तरी तिमाजी निळकंठ याचें दो तक्षिमेचें देशपांडेपणाचें वतन दुमाली गांव व इनाम जमीनी व हक्क वगैरे कानुकायदे पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें भोगवटीयाचा दाखला पाहून रघुपतराव दशरथ देशपांडे परगणे मजकूर यांचे दुमाला करणें ह्मणून परशुराम रामचंद्र यांचे नांवें छ २२ मोहरमीं. पत्र १.

२०५।१३२ गोविंद श्रीधर दिमत रामराव नारायण याचे नांवें सनद कीं, तुम्हीं छ १० मोहरमचें विनंति पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. व्यंकणभट तैलंग मौजे रोहे परगणे घोसाळे प्रांत राजापुरी येथें होता. तो मृत्यु पावला. त्याचे कोणी येथें नव्हतें. यास्तव त्याची वस्तवानी वगैरे होतें तें सुभा आणून त्याची किंमत करून दोनशें पावणे बहात्तर रुपये अमानत ठेविले. त्याचे कोणी येईल याजकरितां एक वर्ष मार्गप्रतिक्षा केली. परंतु कोणी आलें नाहीं. तेव्हां सन तिसा तीसेनांत आखेर तारखेस सदरील ऐवज कमावीस मवेसी

इ. स. १८०१।०२
इसने मयातेन व अलफ
सफर २७

205. Vyankanbhat Telang died at Rohe in Prant Rajpuri without any known heir. His property was attached and was found to be worth Rs. 171-12. It was kept in deposit for one year to enable to claiments to appear and claim it. At the end of the period, the amount was brought to the credit of Government. Venkan Bhat's son subsequently appeared and claimed the amount. The amount having been credited to Government, its refund required the sanction of Government. The sanction was asked for and was granted.

A. D. 1801-1802.

सरकारांत प्रांत मजकूरचे हिशेबीं जमा धरिला. त्यास हल्लीं सन इहिदे मयातैनांत वेंकणभट तेलंग याचे पुत्र वेदमूर्ति अयंभट तेलंग येथें ऐवज मागावयास आले. ऐशास ऐवज सरकार-हिशेबी जमेस आला तो सनदेशिवाय देतां नये यास्तव भटजी हुजूर आले आहेत. ह्मणून लिहिलें. त्यास व्यकंण भट तेलंग यांचे रुपये २७१॥। दोनशें पावणें बहात्तर रुपये जमेस आले आहेत. ते त्याचे पुत्र अयंभट यास सदरहु रुपये मावारे देविले असेत. तरी लिहिले-प्रमाणें दोनशें पावणे वहात्तर रुपये प्रांत मजकूरचे हिशेबीं बाजदादन खर्च लिहून देणें ह्मणोन सनद.

रसानगीयाद.

२०६।१७८ वेदमूर्ति नारायण भट बीन माणीक भट इंगळे जोतिषी व धर्माधिकारी ग्रामोपाध्ये याणीं हुजुर विदित केलें कीं कसबे पांगरी व मौजे चिंचवली व मौजे जहानपूर व मौजे ममदापूर परगणें पांगरी देहाय मजकूर येथील जोतीष व धर्माधिकरण व ग्रामोपाध्यायपणाची वृत्ति पुरातन आमची आमचे वडील पिढी दर पिढी अनुभवीस आले असतां, दरम्यान शिवभट सामक यांचे वडील जोतिषाचे निमे वृत्तीस जडोन वहिवाट करीत असतां, अलीकडे परगणें मजकूर हा महाल सरंमजामास निलकंठ आंबुराव बारामतीकर याजकडे होता. त्याजकडील कमाविसदार आबाजी व्यंकटेश याजकडे सामकांनीं आपली कन्या दिली. त्या नात्यानें त्यांनीं आमचे वृत्तीपैकीं दरोबस्त जोतिषाची वहिवाट सामकाकडे चालवून उपाद्धिक व धर्माधिकरणाची वृत्ति आमानत केली. त्याजवरून सामकाचा व आमचा जोतिषाची वृत्तिविषयीं कजियापुरवी हुजूर पडला. तेव्हां पांढरीची व जमीदार यांची सडी साक्ष जाहली. त्याचा निर्णय झाला नसतां जोतिषाची वृत्ति दरोबस्त सामक अनुभवितात त्यास पूर्ववतप्रमाणें देहाय मजकूरच्या वृत्ति आमच्या आह्माकडे चालवून सामक यासी हुजूर आणून मनास आणावयाची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी देहाय मजकूरचे जोतीष व धर्माधिकरण व ग्रामोपाद्धिकपणाची वृत्ति नारायणभट इंगळे व त्याचे भाऊबंद यांजकडे पूर्वींपासून सुदामत चालत आल्याप्रमाणें चालवणें दिक्कत असली यास सिंह भट सामक याजपाशीं साधनाचे कागदपत्र असतील त्यासुद्धां हुजूर पाठवणें. हरदुजणांचे वृत्त मनास आणून आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें ह्मणोन छ १७ साबान पत्रें.

इ० स० १८०३।०४
अर्बा मयातैन व अलफ
सफर २५.

---

206. The Joshi and Dharmadhikari watans of Pangri and other villages in Pargana Pangari were enjoyed by two families, Ingle and Samak. The new Kamavisdar Abaji Vyankatesh being related to the Samaks, made over the whole watan to them. The Ingles having complained the village officers and the Deshmukha and the Deshpande were directed to continue the old practice and in case there was any doubt to send the Samaks with their papers to the Huzur. (This and other orders in judicial matters recorded on this date appear to have been passed on the recommendation of Balshastri Tokekar.)

A. D. 1803-1804.

१ मोकदम देहाय मजकूर यांस.
१ देशमूख व देशपांडे देहाय मजकूर यांस.
२

(या व इतर बऱ्याच सनदा न्यायसंबंधाच्या या तारखेस बार आहेत त्यांच्या आरंभीं विद्यमान वेदमूर्ति बाळशास्त्री टोकेकर असें लिहिलें आहे.)

---

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. गुन्हे.

१. फंद फितुरी व राजद्रोह.

२०७।८९ गोविंदराव कृष्ण काळे यांस कैद करून किल्ले सिंहगड येथें अटकेंस ठेवावयास पाठविले असेत. तरी किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तीनें अटकेस ठेवून पोटास सिधा उत्तम प्रतीचा देत जाणें. जेवणाचा बंदोबस्त चांगला राखीत जाणें. यांजबरोबर बंदोबस्तास बळवंतराव कृष्ण यांजकडील स्वार दिल्हे आहेत, ह्मणोन बाळाजी बाबुराव याचें नांवें सनद. १.

इ. स. १७९८।९९
तिसा विसेत मया व अलफ
साबान ४

परवानगी रुबरू.

गोविंदराव कृष्ण काळे याणीं फितूर केला. सबब कैद करून अटकेंस ठेविलें त्यांचें घर कसबे बारामती येथें आहे. त्याची जप्ती करावयास हुजरून विसाजी बापुजी कारकून दिमत जोत्याजी जाधवराव यांस समागमें गाडदी देऊन पाठविले असेत. तरी तुह्मीं आपला कारकून देऊन वस्तवानीची व घोडीं व उंटें व गुरें जराबाजरा जप्त करून चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त चांगला राखून मोजदादीचा जाबता पाठवून देणें. येथें घरीं मुलें माणसें व कारकून वगैरे असतील त्यांचा बंदोबस्त चांगला राखणें. विसाजी बापुजी यांजबरोबर स्वार दिमत जोत्याजी जाधवराव यांसही दिल्हे आहेत, ह्मणोन पांडुरंग बापुराव याचें नांवें. सनद. १.

परवानगी रुबरू.

२०८।८६ शिवराम नारायण थथे यांस कैद करून किल्ले कर्नाळा येथें अटकेंस ठेवावयास पाठविले असेत. तरी यांस पक्कें बंदोबस्तानें अटकेंस ठेवून पोटास सिधा उत्तम प्रतीचा देत जाणें यांजबरोबर बंदोबस्तास नारो शिवराम यांजकडील स्वार दिल्हे आहेत, ह्मणोन परशराम निलकंठ चक्रदेव यांचे नांवें. सनद. १.

इ. स. १७९८।९९
तिसा विसेन मया व अलफ
साबान ७

परवानगी रुबरू.

---

207. Govindrao Krishna Kale being implicated in a conspiracy, was arrested and imprisoned at fort Sinhgad and his house at Baramati was attached.
A. D. 1798-99.

208. Shivaram Narayan Thathe was also arrested and sent to prison.
A. D. 1798-99.

२०९।१०७ किल्ले पारगड तालुके धारवाड येथील हवालदार यांणीं करवीरकर यांजकडे फितूर करून किल्ला त्यांजकडे द्यावा याप्रमाणें केलें हा मजकुर किल्ले मजकूरचे दरकदार व लोक यांणीं तुह्मांकडुन कलानिधी येथें गोपाळ बल्लाळ कारकून आहेत त्यांस सांगितला. त्याजवरून त्यांणीं तेथील दरकदार व लोक याजबरोबर आपलेकडील लोक व कारकून देऊन हवालदार यांस अटक करून किल्ले मजकूरचा बंदोबस्त केला. आणि फितुरी असामी सांपडले त्यांचे पायांत बिडी घालून किल्ले कलानिधी येथें अटकेंत ठेविले आहेत. ह्मणोन तुम्हीं विदित केलें. त्याजवरून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी किल्याचा बंदोबस्त यथास्थित राखोन फितुरी असामी सांपडले आहेत त्यांच्या जबान्या चौकशीनें घेऊन फितुराचे कागदपत्र व जबान्या हुजूर पाठवून देणें. समजोन आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें, ह्मणोन बाळाजी रामचंद्र तालुके कलानिधी यांचे नावें. सनद. १.

इ०स०१७९९।००
मयातैन व अलफ
साबान १३

रसानगी चिमणाजी खंडेराव.

२१०।१०७ सरकारचे अपराधी सबब त्यांचे घराचे जप्तीविसीं व असाम्या चालवुंनये येविसी वगैरे मामलेदार तालुके हाय यांचे नावें सनदा.

इ. स. १८००।०१
इहिदे मय्यातैन व अलफ
मोयरम २१.

२ कृष्णराव महिपतराव मामलेदार तालुके रत्नागियी यांचे नावें सनदा.

१ धोंडो नारायण लिमये यांचें घर मौजे सोमेश्वर तर्फ हरचीरी तालुके मजकूर येथें आहे. त्याची जप्ती करावयाकारितां हुजुरून विनायकराव कारकून व खिजमतगार असामी २ पाठविले आहेत. तरी तुम्हीं मशारा निल्हेबरोबर सुभाहून कारकून व लोक देऊन यांचे घराची जप्ती करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून हुजूरचे व सुभ्याचे कारकुनाकडून जाबता तपशीलवार तयार करून हुजूर पाठवून देणें. व मुलें माणसें बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन सनद.

---

209. The Havaldar of fort Pargad in Taluka Dharwad was conspiring with the Kolhapur State regarding the surrender of the fort. The Darkdars and men of the fort communicated the fact to Gopal Ballal Karkun at fort Kalanidhi. He caused the conspirators to be arested. The matter being reported to Government, it was ordered that all papers regarding the conspiracy together with the statements of the persons implicated should be submitted for orders.

A. D. 1799-1800.

210. Some karkoons having incurred the displeasure of Government were removed from service and their property was attached. Among other names which are given in the Sanad, appear the names of Naro Shivaram Chakradev, Dhondo Narayan

A. D. 1810-11.

Limaye &c.

१ राघो विश्वनाथ गोडबोले यांजकडे किल्ले जयगड तालुके मजकूर येथील फडणिसी आहे. त्यांस हे सरकारचे अपराधी सबब फडणिसीचें कामकाज मना केलें असे. तरी त्यांजकडील कारकुनापासून किल्ले मजकूरचे फडणीसीचें कामकाज न घेणें, ह्मणोन सनद.

२

१ बाळकृष्ण बापुजी मामलेदार तालुके अंजनवेल यांस कीं, राघो विश्वनाथ गोडबोले यांचें घर मौजे शिरळ तालुके मजकुर येथें आहे. त्याची जप्ती करावयाकरितां हुजुरून बाळाजी राम कारकून व खिजमतगार आसामी २ दोन व गाडदी पाठविले आहेत. तरी हे घराची जप्ती करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून जाबता हुजूर पाठवून देतील, व मुलें माणसें बंदोबस्ताने ठेवतील ह्मणोन सनद.

१ गणपतराव जिवाजी मामलेदार तालुके वसई यांस कीं, शंकराजी विश्वनाथ चक्रदेव यांजकडे तालुके मजकूर येथील हाशमाकडील फडणिसीची असामी आहे. त्यांस यांजकडील कारकूनाचे हातें दरकाचें कामकाज न घेणें ह्मणोन सनद.

१ कारकून दिमत पंतसचीव यांस कीं, नरसो तुकदेव यांचें घर- कसबे शिरवळ येथें आहे. त्याची व वतनाची जप्ती करावया- करितां सरकारांतून बाळाजी व्यंकटेश कारकून व खिजमत- गार व गाडदी पाठविले आहेत. हे घराची जप्ती करून व- स्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करतील. व त्यांचे हि- शाचे वतनाची जप्ती करतील ह्मणोन सनद.

१ जोत्याजी जाधवराव यांस कीं, चिमणाजी खंडेराव यांचें घर वाडी मौजे दिवे येथें आहे त्याची जप्ती करावयाकरितां हुजूरून राघो निळकंठ कारकून व खिजमतगार व गाडदी पाठविले आहेत. तरी तुम्हीं मशारनिल्हे बरोबर प्रांत पुणें पैकीं कारकून देऊन यांचें घराची जप्ती चौकशीनें करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद करून हुजूरचे व प्रांत मजकुरांकडील कारकुनाकडून जाबता तयार करून हुजूर पाठवून देणें, ह्मणोन रामचंद्र नारायण मामलेदार प्रांत पुणें यांस आलाहिदा सनद सादर केली असे. तरी हुजूरचे व प्रांत मजकुराकडील कारकून वस्तवानीची वगैरे जराबाजरा जप्ती करून मुलें माणसें तुमचे जिमेस करतील त्याप्रमाणें

तुम्हीं आपले जिमेस करून घेऊन बंदोबस्तानें ठेवणें. ह्मणोन सनद.

१ रघुनाथ धोंडदेव मामलेदार तालुके कर्नाळा यांस कीं, नारो शिवराम चक्रदेव हे सरकारचे अपराधी सबब काशिनाथ कृष्ण मशारनिल्हेचे पुतण्ये यांजकडे तर्फ मजकूर येथील सुभ्याची फडणिसी आहे. त्यांचे हातें कामकाज घ्यावयाचें मना करून हे सनद सादर केली असे. तरी तालुके मजकुरची फडणिसी त्याजकडे न चालवणें. मशारनिल्हेचे पुतण्यास हुजूर पोंहचवून देणें, ह्मणोन सनद.

१ सदाशिव भास्कर मामलेदार किल्ले विसापूर यांस कीं, नारो शिवराम व परशराम निलकंठ व लक्ष्मण बल्लाळ व शंकराजी विश्वनाथ चक्रदेव हे सरकारचे अपराधी सबब यांचीं घरें मौजे डूमगांव प्रांत कल्याण येथें आहेत. त्यांची जप्ती करावयाची आज्ञा तुह्मांस करून हे सनद सादर केली असे. तरी यांचे घरांतील वस्तवानी वगैरे याची जप्ती चौकशीनें जराबाजरा करून चौकी पाहरे याचा बंदोबस्त राखोन मोजदादीचा जाबता हुजूर पाठवून देणें व मुलें माणसें बंदोबस्तानें ठेवणें. ह्मणोन सनद.

१ रामचंद्र नारायण मामलेदार प्रांत पुणें यांस कीं, चिमणाजी खंडेराव यांचें घर जाधवाची वाडी मौजे दिवे येथें आहे. त्याची जप्ती करावयाकरितां हुजरून राघो निलकंठ कारकून व खिजमतगार असामी २ दोन व गाडदी पाठविले असेत. तरी तुह्मीं मशारनिल्हे बरोबर प्रांत मजकूरपैकीं कारकून देऊन त्याची जप्ती चौकशीनें करून वस्तवानीची वगैरे जराबाजरा मोजदाद हुजूरचे व तुम्हांकडील कारकुनांकडून करून जाबता हुजूर पाठवून देणें व मुलें माणसें जोत्याजी जाधवराव यांचे हवालीं करून देऊन बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन आलाहिदा सनद सादर केली आहे. तरी मुलें माणसें त्याचें हवालीं करणें. ह्मणोन सनद.

१ श्रीनिवास शामराव मामलेदार प्रांत वऱ्हाड यांस कीं, धोंडो नारायण लिमये हे सरकारचे अपराधी सबब जनार्दन धोंडदेव मशारनिल्हेचे पुत्र याचे नांवें प्रांत मजकूर येथील दप्तरदारीची असामी आहे. त्याचे हातें कामकाज घ्यावयाचें

मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी प्रांत मजकूरची दप्तरदारी त्याजकडे न चालवणें. जनार्दन धोंडदेव यांस बरोबर प्यादे देऊन हुजूर पाठवून देणें. म्हणून सनद. १.

१ कृष्णासिंग पागा दिमत मजकूर यांस कीं, धोंडो नारायण लिमये याचे नांवें तुह्मांकडील पागेची पोतनिसीची असामी आहे. त्याचे हातें कामकाज ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी पागेकडील पोतनिसी त्याजकडे न चालवणें. व मशारनिल्हे यास हुजूर पोंहचवून देणें. म्हणून सनद.

१ बळवंतराव नागनाथ पागा दिमत मजकूर यांस कीं, तुम्हांकडील पागेची फडणिसी परशराम निळकंठ चक्रदेव यांजकडे आहे, व दप्तरदारी धोंडो नारायण लिमये यांजकडे आहे. त्यास हे सरकारचे अपराधी सबब यांचे हातें कामकाज ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी फडणिसी व दप्तरदारी त्यांजकडे न चालवणें, म्हणून सनद. १.

१ गणपतराव निंबाजी मामलेदार तालुके वसई यांस कीं, हरि शिवराम याची, शिवराम चक्रदेव याचे बंधु यांचे नांवें आरमार तालुके वसई येथील कारकूनांत असामी आहे, त्यांजकडे दर्यावर्दीयांचें हजीरीचें काम आहे. तें त्याचें हातें ध्यावयाचें मनाकरून हे सनद सादर केली असे. तरी त्याजकडे असामी न चालवणें, व हरि शिवराम याजबरोबर प्यादे देऊन हुजूर पाठवून देणें. म्हणोन सनद.

१३

२११।१०८. किल्ले हडसर येथें अटकेंत ठेवावयाकारितां असामी.

इ. स. १८००।०१.
इहिदे मयातैन व अलफ
सफर १.

१ नारो शिवराम चक्रदेव.
१ लक्ष्मण बल्लाळ चक्रदेव.
१ नरसो तुकदेव.
१ धोंडो नारायण लिमये.
१ राघो विश्वनाथ गोडबोले.

५

211. Naro Shivram and other karkoons were sent for imprisonment at fort Hdsar and orders were issued to give them excellent food and to take every care of their health.
A. D. 1800-1801.

येकूण पांच असामी यांचे पायांत बिडया घालून समागमें बाळाजी रघुनाथ यांस पागा व गाडदीसुद्धां देऊन पाठविलें असेत. तरी सदरील पांच असामी यांस किल्लेमजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेवून पोटास शिधा उत्तम प्रत देत जाणें; यांस कैदेंत वेगळाले ठेवून येकमेकांची गांठ पडो न देणें. यांजकडेस चाकरीस ब्राम्हण व आचारी चांगला स्वयंपाक करावयास ठेवून देणें. हे तेथें पोंहचल्यावर बाळाजी रघुनाथ यांस पागा व गाडदीसुद्धां माघारी पाठविणें. या पांच असामींची शरीरप्रकृतिविसीं जपोन निगा चांगली करीत जाणें. म्हणोन परशराम खंडेराव यांचे नांवें सनद. १.

परवानगीरुबरू.

२१२।१०९. नारो शिवराम चक्रदेव वगैरे असामी पांच किल्ले हडसर येथें अटकेंस ठेविले आहेत त्यांच्या हजामती करवीत जाणें. म्हणोन परशराम खंडेराव यांचे नांवें सनद. १.

इ. स. १८००।०१.
इहिदे मयातैन व अलफ
सफर १०

परवानगीरुबरू.

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

(२) खून व आत्महत्त्या.

२१३।२१८. मैनी सफरी विधवा ब्राह्मण बायको व तिचा लेक धोंडो नरसी सफरे वस्ती पेठ नारायण शहर पुणें या हरदुजणांनीं आवचितराव तात्याजी कुकडे ब्राह्मण नगरकर यांस ओळखीमुळें आपलें घरीं दिपवाळींत भाऊबिजेचे दिवशीं रात्रौ फराळास बोलावून करंज्यांत व पेढयांत कैफ घालून खाण्यास दिलें. त्यामुळें कैफ येऊन बेसुस्त होऊन सफरीचें घरीं निजोन राहिला. नंतर दोन प्रहर रात्रीचें अमलांत सफरीनें सुरी धोंडो नरसीजवळ देऊन आपण आवचितराव याचे हात धरून लेकानें मान कापून जिवें मारिला. आणि आवचितराव याचें हातांत सोन्याचें कडें होतें तें घेतलें. सबब हरदुजणांस कैद करून किल्लेहाय मामले कोहोज येथें पाठविलें आहेत. असामी.

इ. स. १८०८।०९
तिसा मयातैन व अलफ
जिल्काद १७

A. D. 1800-01. 212. Permission was given to allow them to get shaved.

A. D. 1808-1809. 213. Maini Safri a Bramine widow and her son Dhondo Narsi Safare invited Awchitrao Tatyaji Kukde for supper during the Divali festival. They mixed some intoxicating articles with food and gave it to Awchitrao to eat. He got intoxicated and slept at Maini's house. At midnight Maini gave a sythe to his son and asked him to murder Awchitrao. He did so while Maini held Awchitrao's hands. They then removed a golden bracelet, he had on his person. The widow and her son were therefore arrested and sent to prison.

१ मैनी सफरी किल्ले अशेर येथें.

१ धोंडो नरसी सफरे किल्ले कोहोज येथें.

येकूण दोन असामी यांस बराबर रखवालीस बाळाजीराम गोखले यांजकडील लोक देऊन हरदु किल्यावर अटकेंत ठेवावयास पाठविले असेत. तरी यांस पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. ह्मणोन केशवराव जगन्नाथ किल्लेदार मामले मजकूर यांस. सनद. १.

रसानगीयाद.

२१४।२३७ सदाशिव बाजी मराठे वस्ती पेठ शुक्रवार शहर पुणें याणें आपली मातुश्री उमाबाई मराठी इजला तरवारीनें तोडून जीवें मारिलें. सबब किल्ले कोहोज मामले मजकूर येथें अटकेंस ठेवावयास बरोबर बंदोबस्ताकरितां बाळाजीराम गोखले याजकडील शहरचे चौकी पहाऱ्याचे नेमणुकेंपैकीं लोक देऊन पाठविले असेत. तरी पक्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेंत ठेवून पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. ह्मणोन परशराम खंडेराव मामले मजकूर यांचे नांवें सनद. १.

इ. स. १८११।१२
इसन्ने अशर मयातैन व अलफ
मोहरम २७

रसानगीयादी.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

(३) डाके. (दरोडे.)

२१५।१३३ वेदमूर्ति वैजनाथ भट भागवत यांचें घरीं सातारीयास दरवडा पडला आहे. त्यास चोरांचा पत्ता लाऊन धरावयासी आपाजीराम मामलेदार व गोपाळजी येवले सरनोबत किल्ले नांदगिरी यांस आज्ञा केली येविसी सनदा पत्रें.—

इ. स. १८०१।०२
इसन्ने मयातैन व अलफ
रबिलाखर २५

२ आपाजीराम मामलेदार व गोपाळजी येवले सरनोबत यांस कीं, ह्मातारजी नाईक सातारकर यानें जबानींत चोरांची नांवनिशी लिहून दिली आहे. ते असामी.—

---

214. Sadashiv Baji Marathe residing in Poona killed his mother with a sword He was fherefore sent to prison.
A. D. 1811-12.

215. A dacoity was committed at the house of Vaijanath Bhat of Satara. Mhatarji Naik of Satara was examined and orders were issued for the apprehension of the dacoits named by him together with their families. The Pant Pratinidhi was informed that persons residing in his charge frequently committed thefts in Government territory, that he should guard against this practice and hand over persons committing theft to the officers of Government.
A. D. 1801-1802.

८ मुघोजी व मुरारजी व हैबती व लिंब्या व राणा व सदू व माल्ह व मल्या मांग वाठारकर असामी.
१ साब्या मांग बोरगांवकर.
३ म्हातारजी व खेत्रू व चांद्या जाखणगांवकर.

१२

एकूण बारा असामींचा चौकशीनें पत्ता लाऊन त्यांस व त्यांचे मिलाफी आणखी कोणी असतील त्यांस धरून पोराबाळासुद्धां किल्ले मजकुरीं अटकेंत ठेऊन त्यांचे घराची चीजबस्त व गुरे वगैरे जराबाजरा जप्ती करून भागवत यांचे वस्तवानींचा पत्ता लावून किल्ल्यास आणून हुजूर लिहून पाठविणें. ह्मणोन सनदा.

१ आपाजीराम यांस.

१ गोपाळजी येवले यांस.

१ पंत प्रतिनिधि यांस कीं तुह्मांकडील जिल्हेंत चोरटें राहून सरकारचे महालांत चोऱ्या करतात. व हल्लीं मशारनिल्हेचे घरीं दरवडा पडला. त्या चोरांचे पत्ते तुमचे जिल्हेंत लागतात. ह्मणोन विदित जाहलें ऐशास तुम्हांकडील जिल्हेंत चोरांचा पत्ता हे लावतील त्यांस धरून यांचे हवालीं करणें. व पुढें गांवगन्ना महालानिहाय वगैरे ठिकाणीं तुमचे जिल्हेंत चौकशी करून चोरटे सांपडतील त्यांचें पारिपत्य करून पुन्हा सरकारचे महालांत वगैरे चोऱ्या जाहल्यास कार्यास येणार नाहीं, ह्मणोन तुह्मांकडील कमाविसदार वगैरे यांस ताकीद करावी. म्हणोन पत्र.

१ मोकदम देहाय यांस कीं, गांवगन्ना चोरांचा पत्ता लाऊन चोर सांपडतील ते यांचे हवालीं करणें म्हणोन पत्र.

४

रसानगीयाद.

७. न्यायखातें.

---:o:---

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

४ बनावट दस्तऐवज.

२१६।४४ वतन संबंधें प्रांतांत खोटें महजर होऊन वृत्तीचे बखेडे जाहले आहेत.

216. False documents relating to watans having been forged in the country, many disputes had arisen regarding watans. Balaji *V*yankatesh was appointed to inquire into the matter. He was now superseded in the office by Ramchadra Narayan,

A. D. 1797-98.

इ० स० १७९७।९८
समान तिसेन मया व अलफ
मोहरम २०

येविसीचें वगैरे चौकशीचें काम बाळाजी व्यंकटेश याजकडे सांगितलें होतें, तें दूर करून रामचंद्र नारायण यांजकडे सांगितलें असें. तरी चोकशी संबंधें जे आणतील त्यांस आणून मशारनिल्हे यांस राऊत व प्यादे लागतील तसे देऊन कोणी खटला केल्यास ताकीद करीत जाणें, ह्मणोन

सनदा पत्रें.

२ सनदा लब्याचीं कुळें किल्ले मजकुरीं पाठविल्यास ठेऊन चौकशीस मागतील तेव्हां मशारनिल्हेचे हवालीं करीत जाणें ह्मणोन.

१ नारो बल्लाळ किल्ले सज्जनगड यांसी.
१ विश्वासराव नारायण किल्ले चंदन.

२

११ चिटणीशीं पत्रें.

१ परशुराम पंडित प्रतिनिधी.
१ भवानी शंकर हैबतराव.
१ नरसो तुकदेव.
१ बाबुराव कृष्ण.
१ सदाशिव अनंत.
१ कृष्णराव अनंत.
१ गंगाधरराव गोविंद.
१ कृष्णाजी थोरात.
१ जानराव नाईक निंबाळकर.
१ शामराव अनंत प्रांत वऱ्हाड.
१ श्रीनिवास रामचंद्र कमावीसदार परगणें शिराळे.

११

१३

रसानगीयादी.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी (अ) गुन्हे.

५. बदकर्म.

२१७।२ शंकराजी हरि करमरकर याची सून, वेणू विधवा इणे गैररहा वर्तणूक केली सबब

---

217. Shankaraji Hari Karmarkar's widowed daughter-inlaw having misconducted herself, was sent to prison.
A. D. 1795-96.

इ० स० १७९५।९६ सीत तिसेन मया व अलफ रजब १७

किल्ले मानगड प्रांत राजपुरी येथें अटकेंत ठेवावयास बरोबर गाडदी राघो विश्वनाथ यांजकडील देऊन पाठविले असे. तरी किल्ले मजकुरीं बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. म्हणोन चिमाजी माणकर यांचे नांवें सनद. १.

रसानगी राघो विश्वनाथ गोडबोले.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(ब) फौजदारी (अ) गुन्हे.

६. किरकोळ गुन्हे.

इ० स० १७९८।९९ तिसा तिसेन मय्या व अलफ रमजान ५

२१८।७४ रामचंद्र कृष्ण गोडबोले, यानें आपले तीर्थरूपावर दारूचा मिथ्या आरोप घेऊन सरकारांत समजाविला. तो खोटा पडोन अपराधी ठरला. सबब किल्ले सिंहगड येथें अटकेंत ठेवावयाकारितां पाठविला असे. तरी पायांत बिडी घालून बंदोबस्तानें ठेऊन पोटास शेर शिरस्त्याप्रमाणें देत जाणें. म्हणोन बाळाजी बाजीराव याचे नांवें सनद. १.

रसानगी धोंडो गोविंद गोडबोले.

---

७. न्यायखातें.

—:०:—

(क) पोलीस.

इ० स० १७९५।९६ सीत तिसेन मय्या व अलफ. रमजान ५

२१९।७ कसबे खेड प्रांत जुन्नर येथें चोरांचा उपद्रव बहुत होतो. सबब त्यांचे बंदोबस्तास बेरड असामी ३ तीन सालमजकुरापासून तेथील शिबंदीचे शिरस्तेप्रमाणें ठेवावयाचे करार केले असेत. त्यांस सदरहु तीन आसामी चाकरीस ठेवून त्यांपैकीं एक आसामीचा मुशाहिरा सनद पैवस्तागीरीपासून सरकारचे ऐवजीं दरसाल देऊन हिशेबीं खर्च लिहीत जाणें व बाकी दोन आसामीचे मुशाहिऱ्याचा आकार होईल तो कसबे मजकूर येथील ब्राह्मण व कुणबी वगैरे दरोबस्त पट्टी करून त्यांजपासून ऐवज घेऊन बेरडास दरसाल देत जाणे. आणि चोरांचा बंदोबस्त यथास्थित राखणें, म्हणोन बाळाजी वासुदेव कमाविसदार याचे नांवें सनद. १.

मोकदम कसबे मजकुर यांस सदरहू अन्वयें सनद. १

२

रसागगीयाद.

218. Ramchadra Krishna Godbole having falsely accused his father of drinking liquor was sent to prison.
A. D. 1798-99.

219. The village of Khed being infested by robbers. 3 Berads were sent there for keeping watch. The pay of one of these watchmen was paid by Government, the pay of the rest being raised by subscriptions from the villagers, Brahmins and others.
A. D. 1795-96.

७. न्यायखातें.

—:०:—

(ड) तुरुंग

२२०।१९६ केसो मोरेश्वर, मोरो बापुजी फडके यांचे पुत्र यांची स्त्री सौभाग्यवती रखमाबाई गरोदर आहे. त्यास केसो मोरेश्वर स्त्रीसुद्धां जंजीरे रेवदंडा तालुके मजकूर येथें कैदेंत आहेत. तेथें रखमाबाई यास गरोदरपणीं मानत नाहीं याजकरितां तिचे चुलतबंधु वेदमूर्ति जगन्नाथ दीक्षित पाटणकर कायगांवकर यांचे हवालीं तूर्त करावयाची आज्ञा करून हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी रखमाबाई यांस दीक्षित यांचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन कृष्णा भवानी मामलेदार तालुके रेवदंडा यांचे नांवें सनद. १.

इ० स० १८०६।०७
सबा मयातैन व अलफ
रबिलाखर ९.

रसानगीयादी.

२२१।२२९ गंगाभागीरथी अंबाबाई फडके मोरो बापुजी फडके यांची स्त्री किल्ले माहुली येथें अटकेंत आहे. त्यास तीर्थरूप राघो शंकर जोशी हल्लीं वस्ती कसबे पुणें यांस समाधान नाहीं सबब त्यांस भेटावयाकरितां आणविली असेत. तरी किल्लेमजकुर येथील नेमणुकी शिबंदीपैकीं लोक बरोबर रखवालीस देऊन अंबाबाई फडके यांस हुजूर पोंहचऊन देणें, म्हणोन त्रिंबकजी डेंगळे मामलेदार किल्ले माहुली यांचे नांवें सनद. १.

इ० स० १८१०।११
इहिदे अशर मयातैन व अलफ
सफर १४

रसानगीयादी.

---

८. सरकारी कामगार व जहागीरदार यांचें गैरवर्तन.

२२२।७० महालानिहाय प्रांत गुजराथ येथील किल्ले पारनेरा येथील मामलेदार व रयत यांचे न बनें यास्तव रयत हुजूर फिर्याद जाहली सबब मामलतीची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस बाळोजी कुंजीर यांजकडे सांगितली येविसी सनदा.

इ० स० १७९८।९९
तिसा तिसेन मया व अलफ
मोहरम २४.

---

220. Rakhamabai, wife of Keso Moreshwar who was in prison in fort Rewadanda with her husband being pregnant was ordered to be made over to her relations as the climate of the fort did not agree with her.

A. D. 1806-1807.

221. Ambabai Fadke, wife of Moro Bapuji Fadke, was in prison at fort Mahuli. Her father Ragho Shankar Joshi being ill at Poona she was ordered to be sent to the Huzur in order that she might see him.

A. D, 1810-11.

222. The ryots of Gujarath having complained against their Mamlatdars, the latter were deprived of their offices and Baloji Kunjir was appointed in there place.

A. D. 1798-99.

१ आनंदराव भिकाजी यांस कीं, परगणें पारनेरा येथील देखील किल्ला ठाणीं जकिरासुद्धां त्यांचे हवालीं करून कबज घेणें व परगणें मजकूर येथील साल गुदस्ताचा कच्चा हिशेब यांस समजावणें ह्मणोन सनद. १.

१ रामाजी केशव यांस कीं, परगणें बलसाड व भूतसर व बेहरी येथील सालगुदस्ता सनसमान तीसेनचा हिशेब मशारनिल्हेस समजाऊन महालानिहायचीं ठाणीं जकिरासुद्धां यांचे हवालीं करून कबज घेणें ह्मणोन सनद.

१ हवालदार व कारकून किल्ले पारनेरा यांस कीं, तुम्ही मशारनिल्हेचे रजा तलबेंत वर्तोन अलंग नोबत चौकी पहारा करून पक्के बंदोबस्तानें राहणें ह्मणोन सनद.

२ जमीदार महालानिहाय यांस कीं, रुजू होऊन अमल सुरळीत देणें ह्मणोन सनदा.

१ परगणा बलसाड व भूतसर व बहेरी यांस.
१ परगणे पारनेरा यांस.
२

५

येकूण पांच सनदा दिल्या असेत. रसानगीयाद.

९. इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे.

(अ) देणग्या.

१. नोकरी केल्याबद्दल अगर नुकसानी झाल्याबद्दल अगर मेहेरबानी दाखल.

इ० स० १८०१।०२
इसने मय्यातैन व अलफ.
मोहरम १४

२२३।१४३ खुसरवांजी वल्लद जमशेटजी पारशी हे सरकार कामाचे उपयोगीं सबब कुटुंबास बेगमीस गांव पेस्तर साल सन सल्लास मयातैनपासून नूतन इनाम पांच हजार सवासात रुपयांचे कमाल आकाराचा खेरीज हक्कदार व इनामदार करून सरकारांतून करार करून दिल्हे असेत. तरी गांव यांचे हवाली करून यांस व यांचे पुस्त दर पुस्त वंशपरंपरेनें इनाम चालवणें. दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें. या सनदेची प्रती लिहून घेऊन हे अस्सल सनद यांजवळ भोगवटीयास परतोन देणें, ह्मणोन सनदा पत्रें.

१ रामचंद्र त्रिंबक कमावीसदार यांस कीं, गांव यांचे हवाली करून इनामपत्राप्रमाणें यांजला इनाम चालऊन आकार यांचे

223. Khuserwanji Walad Jamsedji Parsi of Khambayat having proved useful to Government was given a village valued at R. 5000 for the maintenance of his family.
A. D. 1801-2.

नांवें परगणें मजकूरचे हिशेबी इनामखर्चे लिहीत जाणें, ह्मणोन सनद.
१ खुसरवांजी वल्लद जमशेटजी पारशी यांस कीं, गांव तुह्मीं हवाली करून घेऊन तुम्हीं व तुमचे पुस्त दर पुस्त वंशपरंपरेनें सरकार लक्ष एकनिष्ठपणें राखोन इनाम अनुभवीत जाणें, ह्मणोन सनद.
१ मोकदम मौजे मजकूर यांस. सनद.
१ जमीदार परगणें मजकूर यांस. पत्र.
१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी परगणे मजकूर यांस. पत्र.

५

येकूण पांच सनदा व पत्रें दिल्हीं असेत. यांस मौजे मजकूरचा कमाल आकार रुपये.—

× × × ×

९. इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे.

(अ) देणग्या.

धर्मकृत्यें व नवस.

२२४।४० धर्मादाय दक्षणा श्रावण मास विद्यमान आप्पासाहेब

इ० स० १७९६।९७
सबा तिसेन मया व अलफ. रुपये.
जिल्हेज ६

१४०१४३ रमण्यांत दिल्ही प्रारंभ इस्तकबील छ० ५ सफर श्रावण शु० ६ सह सप्तमी भोमवार येकुणीस घटका दिवस तागायत छ० ६ सफर शुद्ध ८ अस्तमानपर्यंत ब्राह्मण येकूण रुपये.

५३९२९ दरवाजा पाहिला विद्यमान खासा व परशुराम रामचंद्र. ब्राह्मण असामी १३८६० शेरा सरासरी ३॥=। प्रमाणें रुपये.

२४९०९ दरवाजा दुसरा विद्यमान यज्ञेश्वरशास्त्री. असामी ५९३५ येकूण शेरा ४॥≡ प्रमाणें रुपये.

२८४१४ दरवाजा तिसरा विद्यमान माधवराव कृष्ण पानसी. असामी ७९०६ येकूण शेरा ३।।-।। प्रमाणें रुपये.

३२८९१ दरवाजा चौथा विद्यमान रामचंद्र हरि फडके.

---

224. The ceremony of distributing the Shrawanmas Daxina commenced in the after noon of the 7th of the bright half of Shrawan and ended in the evening of the next day. The Daxina was distributed at 4 doors. The number of Bramins present was 36612 and the amount paid to them was Rs. 140143. Besides Rs. 105847 were paid to 3851 Bramins at the palace.

A. D. 1796-97.

ब्राह्मण असामी ८९११ येकूण शेरा ३।≡ प्रमाणें रुपये.

१४०१४३ शेरा ३॥।-।. ३६६१२.

१०७७१३ वाड्यांत दिल्ही व गांवगन्ना पाठविली ते मिळोन. असामी ४०१६ येकूण शेरा सरासरी २६॥।- प्रमाणें तपशील बंद आलाहिदा १४९. येकुण रुपये.

३२६८ दुखणेकरी ब्राह्मण रमण्यांत गेले नाहींत त्यांस पुण्यांत घरोघर दक्षणा नेऊन दिल्ही. गुजारत रामचंद्र नारायण सुभा प्रांत पुणें व वेदमूर्ति रामचंद्र दीक्षित गोडबोले बरहुकूम याद.

२ देवापुढें ठेवले रुपये.

१ श्रीरामचंद्र तुळशीबाग.

-॥- श्री ओंकारेश्वर.

-॥- श्री गणपती कसब्यांतील.

२

३२६६ ब्राम्हण असामी ८८० येकूण रुपये.

३४० प्रत असामी १७० दर २ रुपये प्रमाणें.

८७० प्रत असामी २९० दर ३ रुपये प्रमाणें.

८०८ प्रत असामी २०२ दर ४ प्रमाणें रुपये.

६२५ प्रत असामी १२५ दर ५ प्रमाणें.

३६० प्रत असामी ६० दर ६ प्रमाणें. रुपये.

९१ प्रत असामी १३ दर ७ प्रमाणें.

१०४ प्रत असामी १३ दर ८ प्रमाणें रुपये.

१८ प्रत असामी २ दर ९ प्रमाणें.

५० प्रत असामी ५ दर १०

३२६६ ८८०

३२६८ शेरा सरासरी ३॥≡।-

३७६३ ब्राह्मण बायकांस दक्षणा पागेंत दिल्ही. छ १०सफर विद्यमान पांडुरंग दीक्षित कर्वे उपाध्ये रुपये.

३३९८ बायका ३३९८ दर १ प्रमाणें रुपये.

३६५ मुलीं व मुलें असामी ७३० दर -॥-

३७६३ प्रमाणें रुपये.

४१२८

२५४८८७

९७५९ खुर्दा रमण्यांत उलफ्या बरोबर पांच रोजा व दक्षिणे समयीं फुटाण्या बरोबर ब्राह्मणांस दिल्हा. विद्यमान बाळाजी नारायण कारकून निसबत हशमदप्तर खरेदी गुजारत अंतोबा नाईक सराफ संगमनेरकर खुर्दा. रुपये.

३४५२१ खिचडी समयीं इस्तकबील छ २९ मोहरम तागाईत छ ४ सफर पांचरोजा दर असामीस टक्का -।- प्रमाणें येकंदर. टके.

१६१३३।- दरवाजा १ असामी ६४५३३ टके.

६९८७।- दरवाजा २ असामी २७९४९ टके.

४९०१।- दरवजा ३ असामी १९६०५ टके.

६४८० दरवाजा चौथा बायका असामी२५९२० टके.

१५ शागीर्द,पंडितांस बोलावणें करावयास ठेविले होते असामी १२. येकूण पांच रोजा असामी दर असामीस टक्का -।-प्रमाणे टके.

६।-घड्याळची असामी ५. येकूण पांच रोजा असामी दर असामीस टक्का -।- प्रमाणे टके.

३४५२३

४५१७।६ दक्षिणे समयीं रमण्यांत फुटाण्यावर खुर्दा इस्तकबील छ५ मोहरम रुजू सफर तागाईत छ६मिनहु ब्राह्मण असामी ३६६१२ पैकीं वजा खेरीज खुर्दा असामी ४७३. बाकी आसामी ३६१३९. येकूण दर असामीस रूके ८६ प्रमाणे रूपये.

३९०४०।६

पैकीं वजा माप घेतां व खर्च करितां कसर वाढली ते टके १६॥६ बाकी खुर्दा टके ३९०२३॥। येकूण दर रुपयास टके ४ प्रमाणें बरहुकूम करारी याद रुपये ९७५९॥।= पैकीं वजा सूट मखलासी समयीं घातली ते रुपये =॥।० बाकी रुपये.

२६४६४१

२२५।६४ धर्मादाय दक्षणा श्रावणमास विद्यमान राजेश्री बाबासाहेब. रुपये-

इ. स. १७९७।९८ समान तिसेन मया व अलफ जिल्हेज १७

२९२२८५॥ रमण्यांत दिल्ही. प्रारंभ इस्तकबील छ ४ सफर श्रावण शुद्ध ६ मंदवासरे सत्रा घटिका दिवस तागाईत छ ५ सफर शुद्ध ७ रविवार आवशीचे पांच घटका रात्र पर्यंत ब्राह्मण येकूण रुपये.

७९३०० दरवाजा पाहिला विद्यमान खासा. ब्राह्मण असामी १२०१० येकूण शेरा सरासरी ६॥ ॥- रुपये. प्रमाणें रुपये.

४७००१ दरवाजा दुसरा विद्यमान राजश्री रावसाहेब. ब्राह्मण असामी९९६२ येकूण शेरा सरासरी ४॥।≈ रुपये प्रमाणें रुपये.

४८१२० दरवाजा तिसरा विद्यमान त्रिंबकराव अमृतेश्वर. ब्राह्मण असामी९९७४ येकूण शेरा सरासरी ४॥।= रुपये प्रमाणें रुपये.

५७६६३ दरवाजा चौथा विद्यमान रामचंद्र हरि. ब्राह्मण १३००० शेरा सरासरी ४॥≈ रुपये. प्रमाणें रुपये.

५७७०२॥ दरवाजा पांचवा विद्यमान खासा. ब्राह्मण ५४५० एकूण शेरा सरासरी रुपये. १०॥।≈। प्रमाणें रुपये

२९२२८५॥ ४९९६६

शेरा सरासरी.

५॥।–॥

१३१५६६ वाड्यांत दिल्हीं व गांवगन्ना पाठविली ते मिळून असामी ४४४७ शेरा सरासरी रुपये २९॥–। प्रमाणें तपशील बदं आलाहिदा येकूण रुपये.

४००० दुखणेकरी रमण्यांत गेले नाहींत. त्यांस पुण्यांत घरोघरीं दक्षणा नेऊन दिल्ही. गुजारत रामचंद्र नारायण सुभा प्रांत पुणें व वेदमूर्ति रामचंद्रदीक्षित गोडबोले बरहुकूम याद. रुपये.

---

226. The total expenditure on account of Daxana distributed as usual in the month of Shrawan was Rs. 441066. The number of Brahmins assembled at the Ramna was 49966 and the number of Brahmins to whom Daxana was given in the palace was 4447.

A. D. 1797-98.

२ श्रीदेवापुढें ठेविले.
३९९८ ब्राह्मण असामी १०३९ येकूण रुपये.

४०००

४२७८९१॥

१३२१४॥।= खुदा रमण्यांत उलफ्या बरोबर पांच रोजा व दक्षिणे समयीं फुटाण्याबरोबर ब्राह्मणांस दिल्हा. विद्यमान बापुजी नारायण गद्रे खरेदी गुजारत आबाजी रघुनाथ कारकून शिलेदार. खुर्दा टक्के.

४४८८२॥। खिचडी समयीं इस्तकाबिल छ २९ मोहरम श्रावण शु० १ सोमवार तागाइत छ ३ सफर शु० ५ शुक्रवार पांच रोजा दर आसामीस टक्का -।- प्रमाणें येकंदर टक्के.

५९४१ दक्षिणे समयीं रमण्यांत फुटाण्यावर खुर्दा इस्तकबिल छ. ४ सफर तागाईत छ. ५ सफर ब्राह्मण ४९९६६ पैकीं वजा खेरीज खुर्दा आसामी २४३८ बाकी आसामी ४७५२८ येकूण दर आसामीस रुके ६ प्रमाणें टक्के

५०८२३॥।-

४४१०६६।=

पैकीं वजा रमण्यांत दरवाज्यावर खाजगी राजेश्री बाबासाहेब पैकीं ऐवज वाटिला.

१३००० दरवाजा पहिला नक्त.
९०१२॥ दरवाजा पांचवा.

२२०१२॥

बाकी ———— ४१९०५३॥।= रुपये.

१८४९९ थोर पंडित.

१००० भट्टादेव मिश्र मैथील काशीकर.
५० सुबा शास्त्री केदार.
९० बापु शास्त्री खरे वडूथकर.
आणखी इतर पंडित लोक.

२३७३२ निसबत रामकृष्ण दीक्षित दात्ये.

वैदिक अपस्तंभ.
२२५ वेंकट रंगाचार्य सुरापूरकर श्रीनिवासाचार्य यांचे पुत्र.
२० भिकंभट नेने वाडेकर.
आणखी इतर ब्राह्मण.

२८३ निसबत रामचंद्र दीक्षित पाटणकर कायगांवकर.
२० सिताराम भट शौचे सातारकर.
१६ हरभट जोशी कायगांवकर व इतर ब्राह्मणास.
६३४९ अग्नीत पंडित.
८०० कायगांवकर दीक्षित.
२०० गोपाळ शास्त्री.
व इतर ब्राह्मणांस.
३३० पंडित निसबत विनायकभट साठे.
७५ नागेश्वरभट जोशी महाडकर.
६० लक्ष्मण शास्त्री परळीकर.
व इतर ब्राह्मणांस.
५९६६ पंडित निसबत त्रीमिंगीलाचार्य.
७५ कृष्णाचार्य मूर्ति सुरापूरकर.
५० तमणाचार्य सत्यमंगलकर.
व इतर.
२७५६१ निसबत गोपीनाथ भट कर्वे उपाध्ये.
वैदिक आश्वलायन.
३०० नथुभट मोगरे नाशिककर.
२०० महादेव दीक्षित पराडकर.
व इतर ब्राह्मणांस.
१५२६४ निसबत बाळशास्त्री जोशी टोकेकर.
पंडित.
९० गंगाधर शास्त्री पटवर्धन पुणेंकर.
१५ नारायण जोशी संगमेश्वरकर.
व इतर पंडितांस.
२४५८ निसबत रामचंद्र दीक्षित गोडबोले पंडित.
६५ वरदराजाचार्य उदगिरीकर.
७५ बालंभट, जांभेकर पोभुलेकर.
व इतर पंडितांस.
३४३४ पंडित निसबत सुबाराव शास्त्री.
७५ बहीरव शास्त्री.
३३ गोविंदभट महादेव
व इतर शास्त्र्यांस
१९६८ पंडित निसबत रामचंद्र भटाचार्य गौड.

६० रामस्वामी शास्त्री कोठूरकर.
३० श्रीनिवास शास्त्री वेलापूरकर.
व इतर पंडितांस.
३२३६ पुराणिक निसबत त्रिंबकभट ढेकणें.
१०० पांडुरंग भट बऱ्हाणपूरकर.
६० बाळंभट धर्माधिकारी पुणेंकर
व इतर ब्राह्मणांस.
४९६८ जोशी, निसबत कृष्णजोशी संगमेश्वरकर.
१२५ रामजोशी राड्ये संगमेश्वरकर.
१२९ बापु जोशी चापेकर
व इतर जोश्यांस.
२३९५ वैद्य, निसबत पांडुरंग भट वैद्य.
६० नारायणभट वैद्य वांईकर.
६० गोकूळनाथ देव काशीकर.
व इतर वैद्यांस.
२७६३ तपस्वी.
३०० गोपाळ भट बापट अंजर्लेकर.
२५ कृष्णाचार्य द्रवीड कुंभकोणकर.
व इतरतपस्व्यांस.
३०१३ वाजश्नीकण्व ब्राह्मण निसबत बापु फाटक.
१२५ काशीनाथ दीक्षित शौंचे नाशीककर.
२० विश्वनाथभट कापसे काशीकर.
व इतर.
१०४० कवि निसबत बाळशास्त्री चंदावरकर.
१५० गोपाळ कविराज गोपाळपेठकर.
६० श्रीनिवास कवि श्रीरंगकर.
व इतर कवींस.
३०५ पंडित निसबत दामोदरशास्त्री वड्जकर.
व इतर पंडितांस.
७५९ पंडित निसबत वासुदेव जोशी चिपळूणकर.
५० नारायण शास्त्री फडके.
२० लक्ष्मण भट बापट अंजर्लेकर.
व इतर.
११७६ पंडित निसबत विश्वनाथ शास्त्री भट वांईकर.

७५ वेंकटशास्त्री गडबोले वांईकर.
व इतर.
१९५७ कित्ता ब्राह्मण ग्रामस्त वगैरे.
५० कृष्णंभट पटवर्धन.
४० गंगाधर दीक्षित मालवणकर.
व इतर
५०९ पंडित निसबत बाळशास्त्री दिवेकर.
२० नारायणाचार्य मानवी.
१५ यज्ञेश्वरभट वडगांवकर
व इतर.
४२८ क्षेत्रीचे उपाध्ये.
क्षेत्रजनस्थान येथील.
१९ गोविंदभट हिंगणें.
१९ रघुनाथभट रुईकर व इतर.
८९३ किरकोळ ब्राह्मण.
१०९ निसबत कृष्णराव बलवंत.
२० बापुभट केलकर.
व इतरांस.
१५८ गोसावी.
३० राघोबा गोसावी यांचे पुत्र.
व इतरांस.
५०९ अनुष्ठानास ब्राह्मण वाड्यांत आहेत त्यांस.
२० नागेश्वर जोशी पांडववाडीकर.
३५ रघुनाथभट भागवत सातारकर.
व इतर.
३९१ ब्राह्मण निसबत अमृतराव साहेब.
आश्रित.
१८ गणेशभट टिळक करंजगांवकर.
१५ नारायणभट गोखले वसईकर.
व इतर.
१९२ पंडित निसबत गणेशशास्त्री पारखी.
२० गोविंदाचार्य सामक वांईकर.
७५ लक्ष्मणशास्त्री भाव्ये वांईकर.
व इतर.
१६ निसबत रामचंद्र दीक्षित ओक काशीकर.

१८ कृष्णंभट घारपुरे काशीकर.
व इतर.
२५८ निसबत धोंडभट भागवत.
२५ गंगाधर जोशी बोरगांवकर.
२० बचंभट भागवत.
व इतर.
४९३ गांवांतील देवळीं धर्णेकरी ब्राह्मण आहेत त्यांस.
श्रीगणपतींचे देवळीं असतात.
२५ चिंतामणभट गोखले.
१५ बाळाजी बावा लिमये.
व इतर.

१३०९०५ ३१

४४४१

वरील सनदेंत सर्व नांवानिशी दिली नाहीं.

१ तालुके सुवर्णदुर्ग निसबत सदाशिव माणकेश्वर.
१ तालुके रायगड निसबत परशराम केशव.
१ प्रांत राजपुरी निसबत गणेश रघुनाथ.
१ प्रांत कल्याण भिवंडी निसबत रामचंद्र महादेव.
१ तालुके नेरळ निसबत रामचंद्र महादेव.
१ तालुके माहुली निसबत त्रिंबकजी डेंगळे.
१ तालुके अवचितगड निसबत सकोजी खरे.
१ तालुके सरसगड निसबत सकोजी खरे.
१ तालुका कर्नाळा निसबत पांडुरंग रामचंद्र.
१ तालुके उंदेरी निसबत अपाजी बहीरट.
१ प्रांत बेलापूर निसबत पांडुरंग रामचंद्र.
१ तालुके राजमाची निसबत पांडुरंग रामचंद्र.
१ तालुके रतनगड निसबत रामचंद्र महादेव.
१ मामले कोहज निसबत परशराम खंडेराव.

---

१६. सार्वजनिक उत्सव.

२४५|९७ कमाविसभेट. राजश्री बाबासाहेब यांस विजयादशमीनिमित्य नजरा केल्या त्या. × × × × × ×

इ० स० १७९८|९९
तिसा तिसेन मया व अलफ.
जिल्हेज २९

नक्त रुपये.

दादाजी कमाविसदार जकात सरकार संगमनेर.

९ भिमराव कृष्णाजी निसबत नबाब निजाम अल्लीखान बहादर.
९ बापुजी नारायण परचुरे कारकून निसबत दप्तर.
५ शेषाद्री सिंहराज निसबत निजामअल्लीखान बहादर.
४ अनंदराव निसबत नबाब निजामअल्लीखान बहादर.
५ दिनानाथराव वकील काशीकर राजे यांजकडील.
२ लाला फत्तेचंद कारकून निसबत पारसनीस.
२ गंगाधर शिवराम दर्सनी दिमत पीलखाना.
१ बाबाजी अनंत माळी कारकून शीलेदार.

---

245. Gives a List of the persons who made presents of Mohors, Putalies or Rupees to the Peshwa on the Dasara festival. The Total value of the presents is Rupees 1861.
A. D. 1798-99.

५ व्यंकटराव रघुनाथ पागा.
१ नांव लागत नाहीं.

१५६

तपशील.

१४५ चांदवड.
५ मलकापुरी.
१ बडोदी.
२ श्रीशिक्का.
३ तांब्या हिणाचे.

१५६

× × × ×

१८९१।=

एकंदर नजरा १८५१।= किंमतीच्या दिल्या.

२४६।२३४ कमाविस भेट राजश्री बाबासाहेब यांस बाबतहाय विजयादशमी निमित्य खासा स्वारी सिमोलंघन करून बुधवारचे वाड्यांत आली. तेथें मुत्सदी व सरदार वगैरे यांनीं नजरा केल्या. त्यांची किंमत गुजारत गणेश हरि पंडित दुकान पेठ बुधवार शहर पुणें.

इ० स० १८११।१२
इसने अशर मयातैन व अलफ
रमजान ८

जमा रुपये.

१४३१ मोहरा ———————— नाणे.

१० सदाशिव माणकेश्वर.
५ कृष्णाजी माणकेश्वर.
६ बाबुराव गणेश कात्रे फडणीस.
१ निळकंठ महादेव पुरंदरे.
१ गणपतराव परशराम पटवर्धन.
० पांडुरंग रामचंद्र देवधर.
५ रघुनाथ मोरेश्वर देवधर.
५ रामचंद्र पांडुरंग देवधर.
१ त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे.
१ रंगराव महादेव ओढेकर.
२ चिंतो वामन शिधये.
२ बापुजी गणेश गोखले.

246. Presents amounting to Rs. 2032 were received by the Peshwa in the Budhwar Palace on the occasion of the Dasara festival. A list of the Sardars who made the presents is given.

A. D. 1811-12.

१ नारायणराव राम रामदुर्गकर.
५ परशराम खंडेराव राहातेकर.
२ रामचंद्र महादेव अभ्यंकर.
१ धोंडो विश्वनाथ जोशी.
१ बाळाजी काशी कात्रे.
१ निळकंठ बल्लाळ कात्रे.
१ काशी माहादेव कात्रे.
१ गंगाधर यशवंतराव यांचे पुत्र.
२ मल्हारजी बाजी टेंभुर्णीकर.
१ त्र्यंबकराव महिपत पुरंदरे.
१ जयवंत सखाराम निसबत सदाशिव माणकेश्वर.
१ माधवराव अनंत रास्ते.
१ शामराव लक्ष्मण रास्ते.
१ बळवंतराव माधवराव रास्ते.
१ गणपतराव यशवंत रास्ते.
१ नारो निळकंठ मजुमदार.
१ विष्णु आपाजी काळे चिटणीस.
२ विठ्ठलराव नरसी विंचुरकर.
१ बाळाजी लक्ष्मण निसबत विंचुरकर.
१ राघो मल्हार.
१ सदाशिव रघुनाथ वानवळे.
१ बाळाजीराम गोखले.
२ विसाजीराम गोखले.
१ भास्करराम गोखले.
१ सखोराम गोखले.
१ यादवराव दिवाकर भळजापूरकर.
१ माधवराव त्र्यंबक.
१ निंबाजी भास्कर.
१ गोपाळराव त्र्यंबक.
२ सखाराम जगजीवन.
२ खंडो महादेव.
१ जनार्दन नारायण रेहेकर.
१ खंडो मुकुंद.
१ सदाशिव घारपुरे.

१ आनंदराव मल्हार.
१ माधवराव लक्ष्मण पारोळकर.
५ बापुजी मैराळ दिमत गायकवाड.
१ कृष्णराव नारायण जोशी सातारकर.
१ भवानी श्रीनिवास दिमत संस्थान सुरापूर.
१ गंगाधर बाळकृष्ण मराठे.
२ माणकोकृष्ण कृष्णाजी माणकेश्वर यांचे पुत्र.
५ त्रिंबकजी डेंगळे.
१ मुरारजी येवले.
१ शेकोजी खैरे.
१ येसाजी पवार.
१ शंकराजी कानवडे.
१ विठोजी कारके.
१ मोतीराम चोपदार.
१ हिंगणे.
१ विसाजी भिकाजी.
९ अमरचंद.
९ नांवनिशी लागली नाहीं त्या मोहरा नाणें.

११७

येकूण किंमत. रुपये.

८७१ शेट शाई जुन्या ६७ नाणें. दर १३ प्रमाणें.
२२८ शेटशाई नव्या नाणें १९ दर १२ प्रमाणें.
३३२ गैरेसाळ.
३०८ शेटशाई नाणें २८ दर ११ प्रमाणें.
२४ जयनगरी नाणें ३ दर ८ प्रमाणें.

३३२ ३१

१४३१ ११७

४५४०|||` पुतळ्या ताटें

१ दिनकर रघुनाथ पटवर्धन.
१ राखो बल्लाळ भालशे.
१ रामचंद्र माधवराव कानडे.
१ कृष्णाजी धोंडदेव जोशी. धोंडो विश्वनाथ जोशी यांचे पुत्र.
१ बापुजी रघुनाथ पटवर्धन.

१ गोविंदराव निळकंठ.
१ गोपाळ हरि पटवर्धन.
१ विनायक नारायण घांगरेकर.
१ माधवराव निकम नेवासकर दिमत दौलतराव शिंदे.
१ नारो रघुनाथ सहस्रबुध्दे. दिमत दौलतराव शिंदे.
१ बळवंतराव लक्ष्मण लेले. दिमत कुरुंदवाडकर.
१ माधवराव हरि फडके.
१ गोविंद नारायण रेहेकर.
१ पांडुरंग आबाजी काळे.
१ बाळाजी कृष्ण आंबेकर.
१ शामराव गोविंद पिंगळे.
१ गणपत अनंदराव मेहेंदळे.
२ सिद्धेश्वर महिपतराव.
  १ खुद्द.
  १ पुत्रांनीं दिल्ही ते.
  ―
  २
१ बाजी महिपत रांजणगांवकर.
१ नारायण कुंजीर.
१ वासुदेव महादेव अभ्यंकर कारकून निसबत दप्तर.
१ हरि बल्लाळ फाटक.
१ नारायणराव सर्वोत्तम हशमनीस.
१ आबाजी रघुनाथ बाम.
१ श्रीनिवास नारायण काटीकर.
२ कृष्णाजी अनंत शिधये कारकून निसबत दप्तर.
१ भगवंतराव गोविंद पिंपळे.
१ दिनकर सदाशिव साठे.
१ खंडो सिताराम दिमत बाबुराव आंग्रे.
१ वामनराव गोविंद आपटे किल्लेदार किल्ले बेळगांव.
१ सोयराजी परशराम दिमत परशराम खंडेराव राहातेकर.
१ येसाजी भैराळ.
१ सखाराम चिंतामण जोशी.
१ रामचंद्र आपाजी साठे दिमत माधवराव अनंत रास्ते.

१ बळवंतराव सदाशिव दात्ये.
१ सखाराम शिवाजी पारनेरकर.
१ चिंतामणराव रास्ते.
१ गंगाजी नाईक जासूद भोसले.
१ पुरुषोत्तम बल्लाळ भागवत वामोरीकर.
१ भगवंतराव लक्ष्मण.
१ रघुनाथ धोंडदेव भागवत.
१ भिकाजी दिमत सदाशिव रंगनाथ वानवळे.
१ विठ्ठल मल्हार पुरंदरे.
१ बापुजी बल्लाळ भांबे.
२ निलकंठराव कुंजिर.
१ कृष्णाजी विनायक रास्ते विनायकराव निलकंठ रास्ते यांचे पुत्र.
१ रामचंद्र आपाजी दिमत लागु.
१ नारो विश्वनाथ जोगदंड.
१ आत्माराम चिंतामण जोशी.
१ गणपतराव दिमत भोसले.
१ बळवंतराव कृष्ण मेहेंदळे.
१ माहादाजी विनायक श्रौती.
१ काशीराव आपाजी गाडगीळ.
१ गोपाळ जिवाजी दिमत शिवराम हरि मामलेदार तालुके झांशी.
१ केशव अनंत लिमये.
१ धोंडो अनंत साने.
१ बाळाजी अनंत साने.
१ गोविंद बल्लाळ दात्ये.
१ त्रिंबकराव चिंतामण.
१ जनार्दन कोंडदेव गाडगीळ पोतनीस.
१ हरि कान्हो दिमत माधवराव अनंत रास्ते.
१ सदाशिव लक्ष्मण जोशी दिमत नारायण बाबुराव वैद्य.
१ गोविंदराव विठ्ठल दिमत गणपत माधवराव.
१ बळवंतराव रामचंद्र सावरकर.
१ सखाराम दारको दिमत दौलतराव.
१ उद्धोहरि हरि उधव यांचे पुत्र.
१ विनायक चिंतामण शिधये चिंतो वामन शिधये यांचे पुत्र.
१ बाळाजी धोंडदेव दिमत बाळोजी कुंजिर.

१ धारराव जगन्नाथ पेंढरकर.
१ अमृतराव केशव थथे.
१ अनंदराव राम बिवलकर.
१ लक्ष्मण विठ्ठल गोळे—विठ्ठलराव मोरेश्वर गोळे यांचे पुत्र.
१ लक्ष्मणराव नरहर.
१ पांडुरंगराव नागनाथ भागवत वामोरीकर.
१ बाळाजी लक्ष्मण कारकून दिमत विसाजीराम गोखले.
१ श्रीधर लक्ष्मण नाशिककर.
१ आनंदराव बाबर.
१ त्र्यंबक येसाजी दिमत विंचुरकर.
१ राघो शंकर दिमत धारराव जगन्नाथ पेंढरकर.
१ महिपतराव कृष्ण साठे.
१ रामचंद्र भिकाजी करंदीकर.
१ यशवंतराव परशराम परांजपे.
१ विसाजी गोविंद गोरे.
१ यशवंत बाजी जितिकर.
१ बाबुराव अनंत लेले.
१ बळवंतराव लक्ष्मण आठवले.
१ कृष्णाजी कारकून शिलेदार.
१ व्यंकटराव रघुनाथ.
१ मल्हार महादेव कारकून निसबत चिटणीस.
१ लक्ष्मण रामचंद्र अभ्यंकर, रामचंद्र महादेव अभ्यंकर यांचे पुत्र.
१ गणपतराव रघुनाथ.
१ गोपाळ बल्लाळ वाघ.
१ आपाजी लक्ष्मण दिमत सर लष्कर.
१ काशी त्र्यंबक जोगळेकर दिमत विंचुरकर.
१९ नांवनीशी लागली नाहीं तीं ताटें.

११६

येकूण किंमत

रुपये.

४१४।॥= प्रत ताटें ८८ येकूण वजन तोळे २३॥=॥ दर तोळा रुपये १७॥ प्रमाणें.

१२५॥= प्रत ताटें फासें तताडी (दुतोंडी) व डांक लागलेली.

५२ प्रत ताटें १२ वजन तोळे ३।-॥ दर तोळा रुपये १६ प्रमाणें.

७२॥।≡ प्रत ताटें १६ येकूण वजन तोळे ४।-॥-
दर तोळा रुपये १७ प्रमाणें.

	१२५॥।≡		७॥-॥।
५४०॥।-		२८	
	११६		३१।-॥।

३॥ होळकरकी बाबस निळकंठराव येशवंत नाणें १ येकूण किंमत. रुपये.

५७ नक्त चांदवड.

५ भिकाजी जनार्दन आठवले.
५ गणपतराव माधव.
२ त्र्यंबकराव गंगाधर रेटरेकर.
५ विनायक बळवंत घोटवडेकर.
४ आनंदराव सखाराम.
५ बापुजी नारायण पारसनीस.
१ केसो बापुजी.
४ खंडो धोंडदेव भडभडे.
२ रामचंद्र गोविंद नामजोशी. गोविंदराव नामजोशी यांचे पुत्र.
२ पांडुरंग.
३ बापुजी बल्लाळ लेले.
४ बळवंतराव.
५ सदाशिव व्यंकटेश किल्लेदार किल्ले बागलकोट.
२ सदाशिव बचाजी खांडेकर.
५ नारायणराव जीवाजी निसबत चिटणीस.
३ नांवनिशी लागली नाहीं ते रुपये.

५७

तपशील.

४५ चलनी.
६ तांब्याचे.
६ हिणाचे.

५७

२०३२।-

२४७/१४३ बद्दल देणें. विजयादशमीचे पोशाख सरदार व मुच्छदी वगैरे व परदरबारचे वकील यांस; व विठ्ठलराव नरसिंह, माधवराव त्रिंबक राजे बहादर, व सिदोजीराव नाईक निंबाळकर सर लष्कर यांस निशाणांस जरीपटके मिळोन जामदारखान्यांपैकीं तीस हजार साहाशें चाळीस आर्खीं व येक हजार चारशें वीस रुपयांचे खरेदीचे कापड दिल्हें. त्यापैकीं तीस हजार साहाशें चाळीस आंखीं जामदारखान्याकडे खर्च उगवलें. बाकी कापड खरेदी गुजारत त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार यांजकडून दिल्हें. त्याबाबत रसानगी यादी. रुपये.

इ० स० १८१३।१४
आर्बा अशर मयातैन व अलफ
सवाल २७.

८८ दिमत विठ्ठलराव नरसिंह विंचुरकर यांस निशाणास पटका जरी सन्नंग १ येकूण तोळे रुपये.

३७ दिमत दौलतराव शिंदे अलिजाबहादुर.

१७ माधवराव निलकंठ किनखाप लाल सन्नंग -॥- येकूण.

२० खंडेराव मोरेश्वर.

१५ किनखाप -॥

५ महमुदी १

२० १॥

३७

२५ सखाराम जगजीवन दिमत होळकर.

२० किनखाप -॥-

५ महमुदी १

२५ १॥

३०७ मेस्त्रअलफिस्टन (मिस्तर एलफिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर

२२५ शालजोडी १ येकुण फर्द २.

५५ किनखाप १.

२७ महमुद्या ३.

३०७

१९ मिर इब्राम, गोविंद बक्ष याजकडील दिमत नबाब पोलादजंग बहादर यांस किनखाप -॥-

२२ खंडेराव घोरपडे शिलेदार यांस किनखाप -॥- येकूण.

१८ संभाजी राऊत शिलेदार यांस किनखाप -॥- येकूण.

---

247. Clothes were presented to Sardars and agents of foreign powers on the occasion of the Dasara festival. Cloth was also given to Vithalrao Narsinh, Madhavrao Trimbak Raje Bahadur and Sidhojirao Naik Nimbalkar for preparing banners.

A. D. 1813-14.

१७ सखाराम थोरात वाळवेकर शिलेदार यांस किनखाप सनंग -॥- येकूण.

१८ आबाजी कृष्ण शेलुकर यांस किनखाप -॥- येकूण.

१९ बळवंतराव कृष्ण मेहेंदळे शिलेदार किनखाप -॥- येकूण रुपये.

२९ रामचंद्र माधवराव कानडे शिलेदार.

२० किनखाप -॥-

९ महमुदी १

२९ १॥

२२ शेखमीरा वाईकर शिलेदार रुपये.

१७ किनखाप -॥-

५ महमुदी १

२२ १॥

१७ आपाजीराव पाटणकर शिलेदार किनखाप सनंग -॥- येकूण रुपये.

२२ गोविंदराव येशवंत काटीकर शिलेदार.

१७ किनखाप. -॥-

५ महमुदी १

२२ १॥

१७ श्रीनिवास नारायण काटीकर शिलेदार यास किनखाप -॥- येकूण.

२१ लक्ष्मण जाधव वाघोलीकर शिलेदार.

१६ किनखाप. -॥-

५ महमुदी. १

२१ १॥.

२३ पिलाजी जाधव शिलेदार.

१६ किनखाप -॥-

७ महमुदी १.

२३ १॥

२१ लाडोजी जाधव शिलेदार.

१६ किनखाप -॥-

५ महमुदी १.

२१ १॥

२० तानाजी शिरके शिलेदार.

१५ किनखाप -॥-

९ महमुदी १.
२० १॥

२२ सावनूरकर यांस रुपये.

१७ किनखाप -॥-
५ महमुदी १.
२२ १॥

१८ नारायणराव राम रामदुर्गकर किनखाप -॥- येकूण रुपये.

८५। दिमत शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर यांस निशाणास जरीपटका वजन तोळे ३१ दर रुपये.

१८ दामोदर लक्ष्मण, शिवराव हरि मामलेदार तालुके झांशी यांचे पुतणे यांस किनखाप -॥- रुपये.

२५ अमरशिंग जाधवराव यांचे पुत्र.

२० किनखाप -॥-
५ महमुदी १.
२५ १॥

२९ मालोजी नाईक निंबाळकर शिलेदार.

२० किनखाप -॥-
९ महमुदी १.
२५ १॥

१८ जानराव नाईक निंबाळकर फलटणकर शिलेदार. किनखाप -॥- येकूण रुपये.

६३ अंताजी वासुदेव मुतालीक दिंमत प्रतिनिधि.

४० दुपटा पैठणी. १.
१८ किनखाप. -॥-
९ महमुदी. १.
६३ २॥

५० सावजी नाईक निंबाळकर पागा.

१० तिवट १.
४० दुपेटा १.
५० २

१७ सदाशिव बजाजी कारकून शिलेदार शेला सनंग १. येकूण रुपये.

१२ भोईटे शेला सनंग १ रुपये.

१७९ मेस्त्रर फोट सरकारचे पलटणींतील सरदार यांस.

१६५ शालफर्द	२.
१० महमुद्या	२.
१७५	४

१९ वकील संस्थान वाडी.

६॥ तिवट	१.
१२॥ शेला	१.
१९	२

१८ दिमत गणपतराव परशराम दुपटा १ येकूण रुपये.

२३ येशवंतराव गंगाधर दिमत होळकर रुपये.

१८ किनखाप	·॥-
९ महमुदी	१.
२३	१॥

५० माधवराव त्रिंबकराजे बहादर यांस निशाणास जरी पटका. सनंग १ वजन तोळे १८। दरतोळा रुपये २॥। प्रमाणें.

१४२१।

पैकीं वजा मखमलासी समयीं सूट रुपये १।.

बाकी १४२० रुपये.

येकहजार चारशें वीस रुपये इजाफत खाशांकडील खासगी पैकीं त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार यांजकडून पावले ते जमा धरून देविले रुपये.

---

१७. शहरपुणें व पेठा.

२४८।१३ रामशेट बीन हरशेट वीरकर शेटें याणी पेठ सदाशिव शहर पुणें येथें आपले घरापुढें रस्त्यांत नवीन पडवी पांच खणांची बांधली आहे. त्यास दर खणास पट्टी रुपये ५ प्रमाणें सरकारांत घ्यावयाचा शिरस्ता आहे. ते यास माफ केले असत. तरी याचे नांवें माफ खर्च लिहून तगादा न करणें. मशारनिल्हेनीं पडवींत घरचें दुकान घाळून उदीम केल्यास सालाबादची पटी माफ

इ० स० १७९६।९७
सबा तिसेन मया व अलफ
जिल्हेज १०

---

248. Ramshet Bin Harshet Virkar Shete built in the street a shed, 5 Khans in length in front of his house. The fee to be levied for appropriation viz. Rs. 5 per khan, was remitted on this occasion. He was also exempted from any trade tax if he used the shed for a stop. But if the shed was hired to another trader, the tax was to be levied.

A. D. 1796.97.

केली असे. ती न घेणें. बाहेरील दुकानदार भाडेकरी ठेविल्यास वरकडाचे शिरस्तेप्रमाणें याजपासून पट्टी घेत जाणें ह्मणोन आबाजी बल्लाळ यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

२४९।१७२ पेठ नरसीपुरा शहर पुणें येथें बाळाजी जनार्दन यांजकडील जागा भामा विहिरीचे नजीक बिघे ८२ दोन आहे. ते सालमजकुरापासून सदाशिव चिंतामण यास बाग करावयास बद्दल मुशाहिरा देविली असे. तरी सदरहुप्रमाणें दोन बिघे जागा याचे हवालीं करणें. ह्मणोन खंडेराव निळकंठ याचे नांवें छ ५ सफर सनद १.

इ० स० १८०४।०५
खमस मयातैन व अलफ.
रबिलावल ४

रसानगी याद.

२५०।१८९ शहर पुणें येथील नाके.

इ० स० १८०४।०५
खमस मयातैन व अलफ
रमजान १४

१ नाका विठ्ठलवाडी.
१ नाका पूल.
१ नाका गणेशखिंड.
१ नाका कात्रज.
१ नाका संगम.
१ नाका मुसाफरजंग याचे घरानजीक.
१ नाका भवानी पेठ.

७

येकूण सात नाकें येथील, व सरकारचे कुरणांतून जळाऊ लांकडें लकडवाले कारखानदार बैल भरून आणितात त्यांचे रानव्याचें कामकाज, व ह्मशींचे जकातीचीं कमावीस चिमणाजी दिनकर याजकडे सांगितली होती. ते दूर करून सालमजकुरीं बाळकृष्ण चिमणाजी याजकडे कार्तिक वद्य १ छ. १४ साबान सालमजकुर सन खमस मयातैन तागाईत कार्तिक शुद्ध १९ पेस्तर साल सनसीत मयातैन पावेतों सांगितली. येविसी सनदा.

१ हल्लींचे कमाविसदार यांस कीं इमानें इतबारें वर्तोन नाक्याचें व रानव्याचें कामकाज व म्हशींचे जकातीचा अमल चौकशीनें करून जमाखर्चाचा अदमास आलाहिदा करून दिल्हा जाईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें. सालमजकुरचा नाक्याचा व रानव्याचा व ह्मसींचे जकातीचा वसूल माजी कमावीसदार यांजकडे पडला असेल त्यापैकीं नेमणुकी खर्चाची हिसेरसीद मुदत माफक होईल ते-

249. There was a suburb called Narsipura in Poona.
A. D. 1804-05.

249. The following Nakas existed at Poona for leavying forest fees and for the levy of octroi on she-buffalos. (This does not tally with the text.)
A. D. 1804-05.

1 Naka Vithalwadi.
1 Naka Bridge.
1 Naka Ganesh Khind.
1 Naka Katraj.
1 Naka Sangam.
1 Naka near Musafarjanga's house.
1 Naka Bhawani Peth.

वजा करून बाकी ऐवज राहील तो तुम्हीं घेणें. व बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून घेणें ह्मणोन. सनद.

१ चिमणाजी दिनकर यांस कीं नाक्याचें व रानव्याचें कामकाज व ह्मशीचे जकातीचा अमल मशारनिल्हे करितील. सालमजकुरचा नाक्याचा व रानव्याचा व ह्मशीचे जकातीचा वसूल तुह्मांकडे पडला असेल त्यापैकीं नेमणुकीखर्चाची हिसेरसीद मुदत माफक होईल ते वजा करून बाकी ऐवज राहील तो मशारनिल्हेकडे देणें. व बाकी येणें असेल त्याची रुजुवात करून देणें ह्मणोन. सनद.

२

रसानगी यादी.

२५१।२०८ बद्दल देणें मजुरीखर्च. पुण्या नजीक मुठा नदीस बांध घालून नदीचें पाणी कोंडावयाचें काम फकीरचंद गंवड्या व शीताराम शिकार गंवड्या वस्ती पेठ शुक्रवार शहर पुणें मार्फत मल्हार गोपाळ दातीर यांस सांगितलें. त्यास नदीस बांध मजबूत बांधोन पुढें पेस्तरसालीं पर्जन्य पडेपावेतों बांधाचा बंदोबस्त राखावयास मिळोन द्यावयाचे ठरले ते रसानगी यादी.

इ० स० १८०७।०८
समान मयातैन व अलफ.
जिल्काद ७

रुपये.

४२५ नजीक कळकीचा बाग मौजे भांबवडे येथें संगी धरण पेशजीचें आहे. लांबी गज २०० पैकीं काम जुन्या खेंडी बुजवावयाचे व नवें धरण बांधावयाचें गज.

लांबी.	रुंदी.	उंची.
१००	३॥	२

गज सुमार ७०० येकूण मक्ता.

८०० लकडी पुलालगत धरण बांधावयाचें त्यास खाणींतून दगड आणावयाचे व दगडाची खाण पाडावयाची त्यास मजुरी वैगेरे मिळोन मक्ता गज.

लांबी १५०. रुंदी २॥. उंची ३॥.

गज १४०६। येकूण.

१२२५

येक हजार दोनशें पंचवीस रुपये तालुके चास निसबत विठ्ठल चिमणा याजकडे सालमजकूरचे रसदेचा ऐवज येणें त्यापैकीं देविले.

६१५ कार्तिक शु० १५ चे हप्त्यापैकीं.

६१० मार्गशीर्ष शु० १५ चे हप्त्यापैकीं.

१२२५

251. Two temporary dams to the river Mutha, one near Kalkicha Bag and the other near the wooden Bridge were constructed for Rs. 1225.

A. D. 1707-08.

२५२/२२१ बदल देणें. शिपाई लोक पायदळ व स्वार दिमतहाय बाबाजीराम गोखले यांचे मार्फतीनें शहरपुणें येथील चौकी पाहऱ्याचे बंदोबस्तास वगैरे आहेत. त्यांस कदीम व ऐवजी व ऐन जदीद व दिगर-विल्हे मिळोन इस्तकबिल छ १ रबिलाखर सन समान मयातैन अखेरीचा तागाईत रबिलाखर सन तीसा मयातैन पावेतों तेरा माही दरमाहा तैनाते बर-हुकूम इजाफ्या सुद्धां ऐन हजीर व रजेस गेले व मयत व फाटेकरी जाले त्यांचे जाले चाक-रीचा आकार. रसानगी यादी दोन येकूण रुपये.

इ० स० १८०९।१० अशर मयातैन व अलफ जमादिलाखर १

८३९	दिमत बापुजी जाधव असामी येकूण तैनात	रुपये.
७१८	दिमत कृष्णाजी पदमशिंग आसामी येकूण तैनात	रुपये.
८७६॥।	दिमत रावजी कदम असामी येकूण तैनात	रुपये.
६३८	दिमत कान्होजी हलपणकर असामी येकूण तैनात	रुपये.
११०५	दिमत भजनगिरी असामी येकूण तैनात	रुपये.
७२२	दिमत येसाजी गायकवाड असामी येकूण तैनात	रुपये.
१८७५	दिमत रावजी बाजी भदे असामी येकूण तैनात	रुपये.
९९५॥।	दिमत संभाजीराव शिंदे असामी येकूण तैनात	रुपये.
८१४॥	दिमत गोपाळ त्र्यंबक असामी येकूण तैनात	रुपये.
४४०॥।	दिमत फुटलोक असामी येकूण तैनात	रुपये.
७४८॥	दिमत बाळकृष्ण विश्वनाथ असामी येकूण तैनात	रुपये.
७०३॥	दिमत शिताराम हरि असामी येकूण तैनात	रुपये.
६६६।	दिमत बहीरजी शिवणेकर असामी येकूण तैनात	रुपये.
९९३॥।	दिमत अलीखान असामी येकूण तैनात	रुपये.
३००२॥।	दिमत गोविंद जनार्दन असामी एकूण तैनात.	रुपये.
१०७२	दिमत धोंडजी दाभाडे असामी येकूण तैनात.	रुपये.
५३८	दिमत रामजी सागळे असामी येकूण तैनात	रुपये.
९७४	दिमत नायायणगिरी असामी येकूण तैनात	रुपये.
६२३॥	दिमत सखो धोंडदेव असामी येकूण तैनात	रुपये.
६५५।	दिमत गणेश बळवंत असामी येकूण तैनात.	रुपये.
१२१६॥।	दिमत कृष्णाजी धोंडदेव असामी येकूण तैनात.	रुपये.
१३००	दिमत सोनेसिंग असामी येकूण तैनात.	रुपये.
१३३५॥।	दिमत त्रिंबकजी कांबळे असामी येकूण तैनात.	रुपये.
६५९॥	दिमत येसाजी खिरसागर असामी येकूण तैनात.	रुपये.

252. The expenditure on account of salary of the men and sowars entertained for guarding the chowkis and for keeping watch in Poona in one year was Rs. 106043-8. The number of men actually on duty was 1675 the sanctioned strength being 2189.

A. D. 1809-10.

१३७३। दिमत शिवसींग असामी तैनात रुपये.
९९२ दिमत परशरामसींग असामी येकूण तैनात रुपये.
२४३०। दिमत येमाजी खोडदे असामी येकूण तैनात रुपये.
२९१९ दिमत गुण सावत असामी येकूण तैनात रुयये.
४९३॥ दिमत शेखअहमद असामी येकूण. रुपये.
२३२१॥ दिमत सटवाजी वाईकर असामी येकूण तैनात रुपये.
१०९६॥ दिमत सुकलालसिंग असामी येकूण तैनात रुपये.
५७२। दिमत शेखखैरु असामी येकूण तैनात रुपये.
९४९। दिमत मनसाराम असामी येकूण तैनात रुपये.
१५१९। दिमत महादजी जाधव येकूण तैनात रुपये.
३६४॥। दिमत त्रिंबकराव येराणकर असामी येकूण तैनात रुपये.
५८३ दिमत बळवंतराव वणजारे असामी येकूण तैनात रुपये.
१३३८ दिमत गंगाधर त्रिंबक असामी येकूण तैनात रुपये.
२०७६॥ दिमत नारो विश्वनाथ असामी येकूण तैनात.
९८६। दिमत राणोजी भोसले असामी येकूण तैनात.
२७४५ दिमत काशीनाथ नारायण असामी येकूण तैनात.
४१६८॥। दिमत भिकाजी सदाशिव असामी येकूण तैनात.
४९९ दिमत मानाजी चव्हाण असामी येकूण तैनात.
११९१॥ दिमत सखो रामचंद्र असामी येकूण तैनात.
२९४९॥। दिमत साबाजी विश्वनाथ असामी येकूण तैनात.
१४३९। दिमत विठ्ठल गोविंद असामी येकूण तैनात.
१८००॥ दिमत देवजी नेवसे असामी येकूण तैनात.
६६९॥ दिमत सखाराम येशवंत असामी येकूण तैनात.
१०१७॥ दिमत खंडोजी शिंदे असामी येकूण तैनात.
२९००॥ दिमत महादजी गणेश असामी येकूण तैनात.
६९२ दिमत हरि देवजी असामी येकूण तैनात.
१४५९॥ दिमत येसाजी भास्कर असामी येकूण तैनात.
४९९९ दिमत विसाजी यशवंत असामी येकूण तैनात.
१७८०॥ दिमत भगवानसिंग असामी येकूण.
८९७॥। दिमत रामचंद्र धोंडदेव असामी येकूण तैनात.
१६५८। दिमत त्रिंबक अनंत असामी येकूण तैनात रुपये.
२१६१ दिमत भालचंद्र गोविंद येकूण तैनात.
७५७। दिमत गणेश महादेव असामी येकूण तैनात.

१३०३	दिमत सखो अनंत असामी येकूण तैनात.
२१६२	दिमत मुरादखान असामी येकूण तैनात.
२७२४॥।	दिमत गोपाळजी कदम असामी येकूण तैनात.
९४८	दिमत भास्कर लक्ष्मण असामी येकूण तैनात.
४५२॥	दिमत आणाजी जीवाजी असामी येकूण तैनात.
२७६॥	दिमत राघो केशव असामी एकूण तैनात.
९२०।	दिमत यशवंतराव घाटगे जदीद छ १६ जिल्हेज असामी २२ येकूण तैनात रुपये ११५॥। येकूण आकार मुबदला (मुदत)? माफक मुद्दल (मुशाहिरा)? नक्त रुपये.
८१	दिमत बापुजी ठुंबे असामी येकूण तैनात.
२७३।	दिमत अवधूतराव बहिरव जदीद असामी येकूण तैनात रुपये.
३३२।	दिमत यशवंतराव वणजारे असामी तैनात.
६२९॥।	दिमत काशिनाथ बापुजी असामी येकूण तैनात रुपये.
३०४।	दिमत मार्तंड मल्हार असामी येकूण तैनात.
३८	दिमत हिरासिंग जदीद छ १ जिल्हेज असामी १९ येकूण तैनात रुपये ९५ रजब छ १३ मिनहूं मुशाहिरा रोज ८१२ येकूण आकार रुपये.
१०१०९।	दिमत किता लोक असामी येकूण तैनात रुपये.
७९८०	दिमत शिलेदार असामी येकूण तैनात रुपये.
१०६०४३॥	

येक लक्ष सहा हजार साडे त्रेचाळीस रुपये तसलमान बाळाजीराम गोखले व विठ्ठल नारायण लिमये याचे तसलमातीस लोकांचे वाटणीबद्दल खर्च पडले आहेत.

२५३।२३१ बद्दल देणें. श्रीदेव.शहर पुणें व पर्वती व विठ्ठलवाडी व भांबवडे व गणेशखिंड येथील समस्त देवांस व श्रीबनेश्वर व मोरगांव येथील श्रीमोरेश्वरास राजश्री बाबासाहेब यांस आश्विन वद्य पंचमी बुधवारीं पुत्र जाहला. सबब पुत्रोत्साहानिमित्य नारळ व विडे व दक्षणा ठेविली. त्यास खर्च जाहला. तो विद्यमान चिंतो वामन सिधये कारकून निसबत दप्तर.

इ. स. १८१०।११
इहिदे अशर मयातैन व अलफ
सफर १७

रसानगीयाद.

रुपये.

दक्षणा ठेविली ते

रुपये.

शहर पुणें येथें देवास वगैरे

२२॥। पेठ रविवार.

253. Presents of money were sent to the deities in Poona on the above occasion. The names of the deities in the varioue suburbs are given.

A. D. 1810-11.

१ श्रीगणपती माधवराव हरि फडके यांचे थोरले वाड्याचे पिछाडीस देऊळ आहे त्यास.

१।। श्री रामेश्वराचें देवालय माधवराव हरि फडके यांचे वाड्याचे पूर्वेस.

१ महादेव यास.
.।. पार्वती.
.।. गणपती.
———
१।।

१। देऊळ गौळीआळींतील नंदापा वालेकर याचे घरानजीक.

१ महादेव.
.।. गणपती देवळाबाहेर निराळे देऊळ यास.
———
१।

१ बालाजी, संतराम बहिरागी आदितरामभाई सावकार याचे घरानजीक अश्वथाखालीं त्यास रुपये.

१ विठ्ठल रखमाई, सीलराम बाबा शिंगणापूरकर याचे घरीं बालाजीचे दक्षिणेस लगत आहे त्यास रुपये.

३ विष्णुचे देवालय बोहरी आळीचे पूर्वेस पाठीं मागें.

२ विष्णु व लक्ष्मी.
१ गणपती व विठोबा व रखमाई व महादेव एका कोनाड्यांत आहेत त्यास दर.।. प्रमाणें.
———
३

२।। श्रीसोमेश्वराचें देवालय विष्णुचे उत्तरेस.

१ मुख्य महादेव.
-।- देवी.
-।- गणपती.
१ तपस्वी ब्राह्मण उपोषणें करीत असतो त्याचे देवापुढें.
———
२।।

१।। श्रीरामचंद्रजीचें देवालय मनसाराम बढाई याचे घराचे दक्षिणेस. रुपये.

१ श्रीरामचंद्र लक्ष्मण व सीताबाई यांस.
-।।- हनुमंत.
१ समूर देवळींत.
१ उजवे बाजूस सोप्यांत.
———
२ दर -।- प्रमाणें.
———
१।। रुपये.

१ विष्णु, जगन्नाथभट काशीकर कासार आळींत केदार वेशीजवळ.

१। हणमंताचें देवालय कापड ओळींत नारायणगावीं पासोड्या विकावयास बसतात तेथें. रुपये.

१ हणमंत.

-।- मुंज्या.

१।

१ विठोबा रखमाई बाबाजीभट गोखले याचे घरीं यांस.

१ बाबासुरखी पीर यास.

१ ठाकुरद्वार, दुलभशेट गोविंदजीचे.

-॥- सीतळादेवी व हनुमंत, जोहरी याचे घरानजीक. रस्त्यांत पिंपळाखालीं पारावर दर -।- प्रमाणें.

१ हणमंत, बढाई आळींतील यांस.

१ सुभानशापीर, बोहरी यांचे आळींत.

१ शाहमदारपीर, दुलभ शेट याचे ठाकुरद्वाराचे दक्षिणेस.

१। श्रीमहादेव, शामदास यांणीं देवालय बांधिलें तेथील देवास.

१ महादेवास.

।. विठ्ठल रखमाई.

१।

२२॥।

२४॥ पेठ सोमवार.

१५॥ श्रीनागेश्वराचें देवालय.

१३। नागेश्वरास, मोहर शेटशाई नाणें येकुण.

१ श्रीगणपती व पार्वती, सभामंडप पुढील आहे त्यांत दोहोबाजूंस देव २ दर -॥- प्रमाणें.

१ श्रीविष्णु, दक्षिणेकडील.

।. हनुमंत, पिंपळाखालील यास.

१५॥

१॥ श्रीविष्णुचें देवालय नागेश्वराचे पश्चिमेस नजीक आहे.

१ विष्णु.

॥. महादेव व गणपती दर ।.

१॥

३। श्रीरामचंद्रजीचें देऊळ त्रिंबक गोसावी यांचे वाड्यानजीक रामेश्वराजवळ.

३ राम व लक्ष्मण व सीताबाई दर १.

-।- हनुमंत.

३।

२ देऊळ श्रीविठोबाचें सखाराम भट गोसावी याचे वाड्यानजीक नागेश्वराजवळ, रखमाबाईसुद्धां देव २ दर १ प्रमाणें.

१। श्रीमहादेव, दादंभट वटेश्वर याचे घराजवळ.

१ महादेवास.

-।- गणपती देउळींतील.

१।

१ गणपती तीन सोंडींचा. दलपत गोसावी यांचे समाधींतील.

२४॥

१३ पेठ मंगळवार.

१ संगमेश्वर, नदीचे काठीं.

१ हनुमंत, खंडेराव दरेकर यांचे वाड्याचे दक्षिणेस पारावर देऊळ आहे त्यास.

-।- जोनाई, बेटाजवळ नदीचे काठीं.

१ श्रीसिद्धेश्वरदेव महादेव यास, खंडेराव दरेकर याचे वाड्यानजीक उत्तरेस.

१ जोतिबा, विहिरीजवळचा परदेशी याचे घरांत नागझरीचे कांठीं.

१ विठोबा रखमाई, गोसावी याचे घरांत खंडेराव दरेकर याचे नजीक.

१ गणपती, केसोपंत याचे वाड्यांत खंडेराव दरेकर यांचे घराचे पिछाडीस.

१ सुर्येनारायण, दाळवाले यांचे आळीस बापुभट आपेकर यांचें वाड्यांत.

१ विठोबा रखमाई, बाळा जिनगर याचे घरांत ओटीवर आहे त्यास रुपये.

-।- ह्मसोबा, वेसींतील बाळा जिनगर याचे घरापुढें.

१ बाबदेव, बळवंतराव जकाते याचे घराजवळ पाश्चिमेस नागझरीचे काठीं.

१ महादेव, कौठीचे झाडाखालीं नागझरीचे काठीं.

-।- ह्मसोबा, कुसाचे नजीक कागदकुठ्याचे घराजवळ.

१ ह्मसोबा, नदींतील संगमेश्वराचे देवळाचे डावेकडेस यास.

१ तुळसीराम पंडित अग्निहोत्री यांचे घरीं अग्नीनारायणास.

-।- हनुमंत, दाळवाले याचे आळींतील.

१३

३० पेठ बुधवार.

४ बेलबाग.

  २ विष्णु व लक्ष्मी दर १ प्रमाणें.

  २ गणपती व महादेव दर १ प्रमाणें.

  ४

६ योगेश्वरी तांबडी.

  १ योगेश्वरी.

  १ पिंपळाखालील देव.

  ४ देवालयाचे चहूं कोपऱ्यास आहेत त्यांस.

    १ रामेश्वर.

    १ त्रिंबकेश्वर.

    १ गणपती.

    १ विष्णु.

    ४

  ६

१ बालाजी, बेलबागेच्या पूर्वेस.

१ ठाकुरद्वार, रघुनाथभट मराठे संतबावा बेलबागचे दक्षिणेस कोतवाल चावडीनजीक.

१ म्हसोबा, कोतवालचावडीचे दक्षिणेस रस्त्यांत.

२ योगेश्वरी काळी इचे देउळांत.

  १ योगेश्वरी.

  १ गणपती, देवी समोर देवळींत.

  २

१ सितळादेवी, गंगाधर गोविंद भानु याचे दरवाज्यापुढें पिंपळाखालीं.

१ गणपती, चोपदार याचे घरापुढें रस्त्यांत देऊळ.

१ हणुमंत, पिंपळाखालील देवळींत दादाजी घाणेकर याचे घरानजीक.

१ ठाकुरद्वार, गोवर्धनदास बैरागी दादाजी घाणेकर याचे घरासमोर पिंपळाजवळचें.

१ श्रीरामचंद्रजी, खणआळींतील.

१ महादेव, कापडआळींतील.

१ हनुमंत, नरसोबा नाईक तांबेकर याचे वाडयाचे पश्चिमेस.

१ म्हसोबा, चौकांतील सरकारचे बुधवारचे वाड्यासमोर.

१ बालाजी, बापु गद्रे यांचे घराचे पूर्वेस.
३ श्रीधर नाईक थथे यांचे वाड्यांत.
१ श्रीरामचंद्र.
१ सांबमंदीर.
१ विठ्ठल रखमाई.
—
३
१ महादेव, कृष्णंभट पटवर्धन यांचे घरांत मागीलदारीं.
१ नरसोबा, दशपुत्र यांचे वाड्यांत.
१ महादेव, कृष्ण जोशी संगमेश्वरकर यांचे घरांत पिछाडीस देऊळ आहे त्यास रुपये.
—
३०

९ पेठ गुरुवार उर्फ वेताळ.
१ श्रीरामचंद्रजी, देऊळ नागापा कामाठी.
१ खंडोबा, भवानी लकडे यांचे घरांत.
१ राजेबागसर, पीर.
१ हनुमंत, चावडीजवळचा.
-।· हनुमंत, खंडोबाजवळचा.
-।- महादेव, परदेशी याचे घरांत.
१ महादेव, चुडेश्वर शेटये पेठ मजकूर याचे घरानजीक देऊळ.
१ वेताळ यास.
१। रामचंद्रजीचें देउळ शेटये पेठ मजकूर याचे घरानजीक.
१ रामचंद्रजीस.
·।· श्रीगंगाभागीरथीच्या कावडी कामाठी घेऊन बसले त्यांस रुपये.
—
१।
१ बालाजी, दामोदर कोठारी याचे मठांत.
-।- हनुमंत, उमर चाहूस याचे घरानजीक.
—
९

६५। पेठ शुक्रवार.
७ श्रीरामेश्वर, गोविंदराव निलकंठ लिमये यांचे वाड्याचे पिछाडीचे बागेचे पूर्वेस.
१ रामेश्वर.
२ सभामंडपात.
१ गणपती. १ लक्ष्मी.

१ गणपती, देवासमोर पिंपळाखालील यास.
२ नाग व भवानी, देवाचे समोर डावेबाजूस बकुळीचें झाडाखालीं पारावर, दर १ प्रमाणें रुपये.
१ नरसीभट द्रविड तपस्वी नेहमीं पुजन सभामंडपांत करीत असतात त्यांचे देवापुढें.

७

२ विठोबा व रखमाई, बळवंतराव वांकडे यांचे घरानजीक उत्तरेस देव दोन दर १ प्रमाणें.
१ व्यंकोबा, त्रिंबक आत्माराम लिमये यांचे वाड्यांत.
१४ तुळशीबाग.
३ रामचंद्र व लक्ष्मण व सीताबाई दर १ प्रमाणें रुपये.
१ हनुमंत, देवासमोरचा.
१ गणपती, उजवेबाजूचा.
१ काशी विश्वेश्वर, डावेबाजूचा.
१ बालाजी, डावेबाजूस रामचंद्र नारायण यांचे सोप्यांत.
१ शेषशाई, देवाचे पाठीमागें.
१ मारुती, शेषशाई जवळचा.
२ विठोबा व रखमाई, उजवेबाजूस ओरींतील दर १ प्रमाणें.
१ गोविंदबाबा शेषशाई जवळ बसतात त्यांचे देवापुढें ठेविला सबब रुपये.
१ जयदेवबाबा देवाचे उजवेबाजूस मंडपांत बसतात त्यांचे देवापुढें.
१ रामकृष्ण बावासंत देवापुढें कीर्तन करीत असतात त्यापुढें.

१४

१ हनुमंत, तुळसीबागेचे मागील दरवाज्याजवळ देवळींत आहे त्यास रुपये.
१ हनुमंत, तुळसीबागेच्या पुढील दरवाज्यासमोर रस्त्यांत आहे त्यास रुपये.
१ हणमंत, त्रिवेंगलाचार्य याचे घराजवळ पिंपळाखालीं त्यास.
१ गणपती, नारो शिवराम चक्रदेव यांचे घराचे दक्षिणेस जांबळीचे झाडाजवळ यास रुपये.

६ शेवाळे यांचे वाड्यांत तोफखान्याचे पश्चिमेस पर्वतीचे रस्त्यास रुपये.
३ विठोबा व राहीरखमाई दर १ प्रमाणें.
१ हनुमंत.
१ गणपती.
१ विष्णु.

६

३ ठाकुरद्वार, शुक्रवारचे सरकारवाड्याचे लगत.
 २ मुख्यदेवास.
 १ हनुमंत.
 ———
 ३
१ हनुमंत, शुक्रवारचे वाड्याचे पूर्वेस फुलआळी जवळचा.
२ बालाजी, दयाळदास बैरागी शुक्रवारचे वाड्याचे पूर्वेस फुलआळीजवळ रुपये.
 १ बालाजी.
 १ हनुमंत, बालाजीसमोर देवळींत.
 ———
 २
१ बालाजी, रतन परदेशी याचे घरांत चावडीसमोर.
२ चावडीजवळ पिंपळाचे पारावर देव यास रुपये.
 १ हनुमंत.
 १ विठोबा रखमाई व महादेव मिळोन.
 ———
 २
-।- महादेव, कुशाबा धनगर याचे घराजवळ पिंपळाचे झाडाखालीं रस्त्यांत देवळींत आहे त्यास.
१ विठोबाचें देऊळ, विठू ढालाईत याचे घराचे पिछाडीस रुपये.
-।- विठोबा व रखमाई, विठ्ठलपंत जोशी याचे घरांत ढालाईत मजकूर याचे घराचे पिछाडीस.
-।- म्हसोबा, बोरीचे झाडाखालील यास.
१ पंचमुखी हनुमंत, रस्त्यांत चौथऱ्यावर यास.
१। बालाजी, पूर्णदास बैरागी याचें देऊळ.
 १ बालाजीस.
 -।- श्रीगंगाभागिरथीच्या कावडी कामाठी घेऊन बसले होते त्यांस.
 ———
 १।
१ हनुमंत, रुपराम चौधरी याचे घरापुढें रस्त्यांत देऊळ आहे त्यास रुपये.
२।।। रुपराम चौधरी यांचे वाड्यांत.
 १ राम व सिता व लक्ष्मण.
 १ गोपालकृष्ण.
 -।।।- गणपती व महादेव व हनुमंत मिळून दर -।- प्रमाणें
 ———
 २।।।

१ व्यंकोबा, शेषाद्री गोसावी वरूटे वाईकर यांचे वाड्यांत, रुपराम चौधरी यांचे वाड्यासमोर.

-।- गणपती, तोफखान्याचे उत्तरेचे दरवाज्यापुढें पूर्वेकडील बाजूस.

-।- गणपती, यशवंत सखाराम पानशे यांचे वाड्याचे पूर्वेस रस्त्यास देऊळ यास.

१ बाराईमाम पीर, तोफखान्याचे दक्षिणेस.

१ गोसावी याचे वाड्यांत गौळी आळींत गणपती व महादेव यांस.

१ हनुमंत, कामाठपुऱ्यांतील.

१। व्यंकोबाचें देऊळ पर्वतीचे रस्त्यास.

  १ व्यंकोबा.

  -।- हनुमंत, देवळाबाहेर भिंतींत आहे त्यास.

  ———

  १।

१॥ पर्वतीस जातांना डावेबाजूस पूर्वेकडे बेलबागेजवळचा.

  १ पंचमुखी हनुमंत, रस्त्यांत.

  -॥- गोसावी यांचे मठांत व बागांत.

    -।- महादेव, मठांत.

    -।- देवी, बागेंत.

    ———

    -॥-

  ———

  १॥

-।- हनुमंत, व्यंकोबाचें देवळानजीक रस्त्यांत पारावर आहे त्यास.

१ बालाजी, अनंदीदास बैरागी व्यंकोबाचे पूर्वेस रस्त्यास घर आहे तेथें त्यास.

२ विठ्ठल रखमाई व मुरलीधर व हनुमंत. रामदासी बावा यांचे बिऱ्हाडी श्रीमंगलाचार्य यांचे घराचे उत्तरेस यास.

१। विष्णुमंदीर चैनसिंग परदेशी याचे घरांत रुपराम चौधरी याचे बागेचे पश्चिमेस.

  १ विष्णु.

  -।- हनुमंत, विष्णुपुढें बाहेर रस्त्यांत.

  ———

  १।

१ नारायणभट फडके अग्निहोत्री चिंतो वामन शिधये याचे देवास रुपये.

-।- देवी अंबालिका, रुपराम चौधरी याचे बागेचे पाठीमागें.

-।- हनुमंत, गौळीआळींतील.
-।- हनुमंत, रुपराम चौधरी याचे बागेचे पश्चिमेस रस्त्यांत देउळींत.
१ महादेव, चिंतोपंत जोगळेकर यांचे मागीलदारीं देऊळ आहे त्यास.

६५।

४७॥ पेठ शनवार.

११ श्री ओंकारेश्वर याचे देवालयांत.

१ ओंकारेश्वरास.
२ सभामंडपांतील देव यांस.
१ गणपती, उजवेकडे.
१ विठ्ठल रखमाई, डावेबाजुकडे.

२

२ देवळाबाहेर दरवाज्याजवळ.
१ हनुमंत, उजवेकडे बाजूस.
१ देवी, डावेकडे बाजूस.

२

५ तपस्वी ब्राह्मण नेहमीं आहेत त्यांचे देवापुढें.
१ व्यंकणभट तेलंग.
१ अखीलानंद.
१ ब्रह्मचर्यबावा आल्याचा रस पिऊन आहेत त्यास.
१ गोविंद गोसावी कीर्तन करितात त्यास.
१ बापु खडसीकर.

५

१ विठ्ठल रखमाई, पुढील सभामंडपांतील उजवे बाजुस ओवरींत आहे त्यास.

११

१ विठ्ठल रखमाई कल्याणराम याचे अन्नछत्रांत ओंकारेश्वराचे देवळापुढें पिंपळाखालीं डावेबाजूचे आळीस आहेत त्यांस.
२ त्रिंबकराव चिंतामण यांचे वाड्यांत.
१ श्री भागीरथींच्या कावडी पुढें.
१ गजाननबावा यास.

२

१३। हनुमंत यास मोहरसेटशाई नाणें १ येकूण रुपये.

२ श्री अमृतेश्वर याचें देवालयांत.

१ अमृतेश्वरास.

१ गणपती, सभामंडपांतील.

२

२ श्रीसिद्धेश्वर.

१ सिद्धेश्वर.

१ गणपती, सभामंडपांतील.

२

१ कृष्णमंदीर, श्रीसिद्धेश्वराचे डावेबाजूंस नदीचेकांठीं.

१ राममंदीर, अमृतेश्वराचे डावेबाजूंस

२ विठ्ठल रखमाईस, अमृतेश्वराचे डावेबाजूस दर १ प्रमाणें.

१ मारुती, अमृतेश्वराचे देवळा पुढील.

२ श्री हरिहरेश्वर, बाबुराव केशव ठाकूर यांचे घराचे पिछडीस बोळांत.

१ हरिहरेश्वरास रुपये.

१ गणपती सभामंडपांतील यास.

२

१। मुरलीधर, मेहुणपुऱ्यांतील मोरो बाबुराव फडणवीस यांचा.

१ मुख्यदेवास.

-।- विष्णु, डावेबाजूस आहे त्यास.

१।

१ श्री त्रिंबकेश्वर, दीक्षित यांचे वाडयांतील.

१ हनुमंत, शेलारवाड्यानजीक नारो शंकर यांचे घराजवळील.

१ गणपती, सरकारचे जुनेवाड्याचे गणेशदरवाज्या वरील डावे बाजूचा.

३ विठ्ठल, महादेव गुरुजी करकरे यांचे वाड्यांत.

१ हनुमंत देउळींत आहे त्यास.

१ गोपाळभट परांजपे पावसकर अग्निहोत्री याचे अग्निनारायणापुढें.

१ भास्करभट तांदूळवाडीकर वैद्य हनुमंत उपासक याचे देवापुढें.

३

१ श्रीरामचंद्र व सीता व लक्ष्मण, आपाजी काशिनाथ भोपळे यांचे वाड्यांत यास.

१ नारायण दीक्षित खेडकर रामकृष्ण दीक्षित दात्ये यांचेघरीं राहतात त्यांचे अग्निहोत्रापुढें.

४७॥

१८ पेठ नारायण.

३। गणपती मातीचा याचे देवालयांत.

१ मुख्य गणपती.

-।।- महादेव व विष्णु, सभामंडपांतील दर -।- प्रमाणें.

१ हनुमंत, डावेबाजूस.

-।।।- मुंजे ३ दर -।- प्रमाणें.

३।

-।- म्हसोबा, मातीचे गणपतीसमोर रस्त्यांत कौलारी सोप्यांत आहे त्यास.

१। श्रीनवदुर्गा, चिंतामण शेट सोनार याची रुपये.

१ श्रीदुर्गेस.

-।- गणपती, सभामंडपांतील.

१।

१ विठ्ठल रखमाई, शेव्ये पेठ मजकूर यास दक्षणा.

-।- शेक चांदपीर.

१ विठ्ठल रखमाई, व्यंकोबा नाईक लाळे याचे वामन नाईक ठोसर यांचे वाड्यांत.

२।। विठोबा, जोती दत्त यांणीं देउळ बांधिलें त्यास.

२ विठ्ठल रखमाई दर १ प्रमाणें.

-।।- सभामंडपांत देव दोन दर -।- प्रमाणें.

२।।

-।- विठ्ठल रखमाई, बैरागी याचे मठांत विठोबाचे देवळाबाहेरील लगत.

-।- म्हासोबा, पुलाचे अलीकडील रस्त्यांत नदीचे काठीं खुला.

२ विठोबा रखमाई, अंताजीबावा संत यांची दर १ प्रमाणें.

३ गणपतीचें देऊळ रस्त्यांत नजीक मोदीचें घर.

१ गणपती.

१ महादेव, गणपतीजवळ गाभाऱ्यांत आहे त्यास.

१ तपस्वी ब्राह्मण नेहमीं आहेत त्याचे देवापुढें.

३

२ विष्णु व विठोबा व रखमाई, नदीपलीकडेस पुलाचे तोंडासमोर आहे त्यास

१ माचालिंग पुलावरील यास.

१८

२६।। पेठ सदाशिव.

१ हनुमंत, काशीबा वैद्य न्हावी याचे घराजवळचा कौलरी सोप्यांत आहे त्यास.

१ हनुमंत, दादा गद्रे यांचे मुरलीधराचे देवळाचे दक्षिणेस रस्त्यांत पारावर आहे त्यास.

१ हनुमंत, गोंदजी शिंदा याचे वाडयांत पिंपळाचे पारावर बच्याजी परशराम भिडे यांचे घराचे दक्षिणेस आहे त्यास.

१ हनुमंत, ग्यानसिंग परदेशी याचे घरांत नरसोबादेव याचे रस्त्यास आहे त्यास.

२ मुरलीधराचें देऊळ.

१ विष्णु.

१ लक्ष्मी.

२

१ मुंज्या, बळवंतराव नागनाथ वामोरकर याचे घराचे दक्षिणेस पिंपळाचे पारावर आहे त्यास.

४ देऊळ महादेवाचें, दयाराम जोहरी याचे येथें.

१ महादेव.

१ सभामंडपांतील देव गणपती यास.

१ पार्वती, गाभाऱ्यांत कोनाडयांत आहे ती.

१ तपस्वी ब्राह्मण नेहमीं मातीचीं लिंगें करितो त्यास लिंगापुढें.

४

१ नागोबा, पेठेचे झेंडेजवळ चावडीपुढें चौथऱ्यावर आहे त्यास.

१ म्हसोबा सोट्याचा, पिंपरीचे झाडाखालीं परशुराम केशव ओक याचे घरानजीक आहे त्यास.

१ व्यंकोबाच्यामूर्ति, बापुजी कृष्ण बापट यांचे घरांत आहेत त्यांस.

१ हनुमंत, बापुजी बल्लाळ कवडीकर याचे घराजवळ रस्त्यांत पिंपळाचे पारानजीक देउळींत आहे त्यास.

१॥ रामदास, बैरागी याच्या मठांत बापुजी बल्लाळ लेले याचे बागेचे पश्चिमेस रस्त्यांत.

१ कृष्णमंदीर.

·|· हनुमंत.

१|

-|· म्हसोबा, सिंहगडकरी याचे वाडयांत ओट्यावर राघो केशव नेने यांचे घराचे पश्चिमेस आहे त्यास.

-|· वडोबा, वैजानाथ भागवत याचे घराचे पश्चिमेस रस्त्यांत वडाचे झाडाखालीं आहे त्यास.

१ गणपती, लक्ष्मण महादेव जोशी गोळपकर याचे घराचे पूर्वेकडील रस्त्यास चौथऱ्यावर देऊळींत आहे त्यास.

-।- म्हसोबा, आपा जोशी पावसकर याचे घरानजीक रस्त्यांत आहे.

१ महादेव, निळो आपाजी गोडबोले पावसकर याचे घरांत यास.

-।- म्हसोबा, बळवंतराव थोराथ याचे पागेचे पूर्वेस रस्त्यांत खुला आहे.

२ भाऊसंत करंदीकर लक्ष्मण महादेव जोशी गोळपकर याचे घरीं राहतात. तेथें देवापुढें व संतबाबास.

१ मारुती, काळेहौदावरील.

१ मारुती, यशवंतराव गाडगीळ याचे घरानजीक हौदाजवळ रस्त्यांत पारावर यास.

२

१ म्हसोबा घाद्याचा, रस्त्यांत खुला नानाफडणवीस यांचे बागेचे दक्षिणेस

-।- मारुती, वासुदेव अभ्यंकर याचे घरानजीक रस्त्यांत आहे त्यास.

१ विठ्ठल रखुमाई, बापु कुंठे याचे वाड्यांतील.

-।- बहिरोबा, रघुनाथ मेहेंदळे याचे वाड्याचे पिछाडीस पिंपळाखालील यास.

-।- गणपती, कुंभारआळींतील यास.

-।।- म्हसोबा.

-।- कृष्णाजी भैरव थथे याचे बागांतील.

-।- जतींचे बागेनजीक यास.

-।।-

२६।।

९ पेठ नरसींपुरा.

३ नरसोबाचें देवालयांत.

१ मुख्य नरसोबास.

२ महादेव व गणपती, दोहोबाजूंस गाभाऱ्यांत दरवाज्याबाहेर भींतीस आहेत. त्यास १ दर प्रमाणें.

३

१ विष्णु, गणेश भिडे यांचे वाड्यांत आहे त्यास.

२ विठोबा व रखमाई, भागुबाई मराठी सुंदरबाई इचे घरीं आहे, त्यास दर १

३ भिकारीदास याचे बागेंत.

१ गणपती.

१ हनुमंत.
१ वैराग्गी याचें देवापुढें.
—
३
—
९
८६ पेठ कसबा.
२०। श्री गणपतीचें देवालय.
१३। मुख्य गणपतीस, मोहोरशेटशाइ १ येकूण.
२ सभामंडपांतील देवांस.
१ महादेव.
२ विठ्ठल व रखमाई दर १ प्रमाणें.
—
३
१ हनुमंत, पिंपळाखालील देवासमोर घुमटींतील.
१ रामभट तैलंग बाणाची पूजा सभामंडपांत देवाचे डावे बाजूस करीत बसले होते त्यास.
१ मोरभट खडके दैठणकर, देवाचे डावे बाजूंस ओरींत असतात त्याचे देवापुढें.
१ गणोबा जोशी मुलतापीकर डावे बाजूस ओरींत असतात त्याचे देवापुढें.
—
२०।
३ श्रीकेदारेश्वर याचें देऊळ गणपती समोरचें बोळांत वैद्याचे घरानजीक आहे त्यास रुपये.
१ मुख्य केदारेश्वर.
१ गणपती, सभामंडपांतील.
१ विठ्ठलरखुमाई व सोपानदेवाच्या पादुका, गुंडोपंत एकबोटे यांचे वाड्यांत गणपतीसमोर बोळांत आहे त्यांस.
—
३
१ पीर, देशमुख प्रांत पुणें यांचे घराजवळ आहे त्यास.
-।- म्हसोबा, देशमुख प्रांत पुणें यांचे घरासमोर रस्त्यांत देऊळ आहे त्यास.
-।- हनुमंत, पिंपळाचे पारावर, देशमुख याचे घराजवळ आहे त्यास.
-।- म्हसोबा बुरजांतील, देशमुख प्रांत पुणें यांचे घराजवळ त्यास.
-।- गणपती, त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे यांचे घरासमोर रस्त्यांत तांबटाचे घराजवळ देवळींत आहे त्यास.
१३। शेखसल्ला पीर यास मोहरशेटशाई नाणें १ रुपये.

१ राममंदीर, बापु जोशी व्यवहारे यांचे घरीं धनशेट कर्जे याचे घरासमोर आहे त्यास.
१ विठ्ठल रखमाई, गोविंद बाबा गोळक याचे घरीं आहे त्यास.
१। गणपतीचें देऊळ चावडीचे पाश्चिमेस आहे त्यास.
 १ गणपतीस.
 -।- महादेव यांस.
 ———
 १।
-।- रामचंद्रजी, तात्याशेट पेठ मजकूर याचे पिछाडीस रामदासीबुवाचा यास.
२ खंडोबा, शिंपी आळींतील देव २ दर १ प्रमाणें.
१ गणपती, नागोजी गुंड्याचे घराजवळ पिंपळाचे पारावर देवळींत आहे त्यास.
-।- ह्मसोबा, जाधवराव माधवराव याचे घराचे पिछाडीस कोपऱ्यास गल्लींत खुला आहे त्यास.
१३। माहादोबा, साळ्याचे वाड्यांत यास मोहरशेटशाई नाणें १.
-।- मुंजाबा, बापु मोकासी याचे घराचे पुढें पिंपळाचे पारावर देवळींत आहे त्यास.
-।- गीरमाजी जोशी व्यवहारे यांचे वाड्यापुढें ह्मसोबा खुला आहे त्यास.
१ श्रीत्रिंबकेश्वर, व्यवहारे जोशी याचे आळींतील त्यास.
-।- महादेव, त्रिंबक जोशी व्यवहारे यांचे घरांत आहे त्यास.
१ बहिरोबा, माळी यांचे आळींतील यास.
१ विठोबा व रखमाबाई, गंगाबाई जोशीण पुणतांबकर सखाराम नाईक दिंडाळ वाणी याचे समोर.
-।- चांदजी झांबरे याचे वाड्यांत मुरलीधरदेव यास.
-।- ह्मसोबा, गांवकुसाचे आंतील बाजूस खुला यास.
१। गांवकुसाचे बाहेर.
 १ हनुमंत, देवालयांतील.
 -।- हनुमंत, गांवकुसाचे बुरजास.
 ———
 १।
-।- ह्मसोबा, ढेकणे याचे आळीस रस्त्यांत देवळींत आहे त्यास.
१। माधवराव हरि फडके यांचे घराचे पिछाडीस पाण्याचा हौद आहे त्या नजीक.
 -।- ह्मसोबा, रस्त्यांत खुला.
 १ विठ्ठल रखमाई, कासारआळींनजीक पश्चिमेस.
 ———
 १।
१ आबनपीर, कासार आळींतील.
१ विठोबा रखमाई, दरमले लिंगाईत याचे घरांत, पाटीलकसबे मजकूर याचे गल्लींत.
१ कान्होबा, पांडोबा खडके याचे घरांत कासार आळींत.

-।- म्हसोबा, सिद्धेश्वर महिपतराव याचे घरानजीक रस्त्यांत खुला.
-।- म्हसोबा, बयाजी नाईक जोंधळे यांचे पागेचे दरवाज्यापुढें रस्त्यांत भिंतीस.
२ माळ्याचे आळींत.
  १ महादेव. १ तुकाईदेवी.
१ विठ्ठलरखमाई, नाना जोशी वेऱ्हारे याचे घरांत यास.
१ पदमोबा, विसाजी भिकाजी जकाते याचे घरानजीक कौलारांत.
१ हनुमंत, मुरारजी येवले याचे घराचे पश्चिमेस रस्त्यांत देऊळ कौलारी आहे त्यास
१ बाळोबा मुंजा, हैबतराव शंकर याचे वाड्यांत.
१ महादेव, नदीचे कांठीं देऊळ आहे त्यास.
१ शेख सादतपीर, रामचंद्र माधवराव कानडे याचे घरानजीक.
१ तुकाई, त्रिंबकराव दीक्षित याचे वाड्याचे पूर्वेस रस्त्यास आहे त्यास.
१। निळकंठेश्वर याचे देऊळ, नारो निळकंठ मुजुमदार यांचे घराचे उत्तरेस आहे त्यास.
  १ मुख्य निळकंठेश्वरास.
  -।- गणपती व विठ्ठलरखमाई वगैरे मिळोन.
  १।
१ महादेव पंचमुखी, डोंगरभट पुरंदरे याचे घरांत नारो निळकंठ मुजुमदार याचे पिछाडीस बोळ आहे त्यांत.
१ पीर, रामचंद्र गोसावी पैठणकर याचे घरानजीक आहे त्यास.
-।- महादेव, सिद्धेश्वर महिपतराव याचे वाड्यांत पिंपळाखालीं पारावर आहे त्यास.
२ सिद्धेश्वरराव महिपत याचे वाड्यानजीक उत्तरेस रस्त्यात.
  १ विठ्ठल रखमाई, गोविंदपंत येरवडेकर याचे घरांत.
  १ विठ्ठलरखमाई, तात्या जापगे याचे घरीं यांस.
  २
१ विठ्ठलरखमाई, नारायणराव वडवळीकर नरसो तुकदेव शिराळकर यांचे वाड्यांत राहतात त्यांस.
१ विठ्ठल रखमाई रस्त्यांत.
८६

१५॥ पेठ शिवपुरी उर्फ रास्ते.

१ विठ्ठलरखमाई, माधवराव अनंतरास्ते यांचे वाड्याचे दरवाज्यासमोर रस्त्यास उजवे बाजूस रामशेठ शिंपी सुपेकर याचे घरांत आहे त्यास.
१ हनुमंत, पिंपळाखालीं रास्ते यांचे दरवाज्यासमोर रस्त्यास डावे बाजूस.
२ श्रीलक्ष्मणेश्वराचे देवळांत.
  १ लक्ष्मणेश्वरास.

१ देवी गाभाऱ्यांतील, गणपती व विष्णु सभामंडपांतील, व कार्तिकस्वामी नंदीचे उजवे बाजूस, येकूण देव ४ दर -।- प्रमाणें.

२

१ हनुमंत पेठेचा, देऊळ कौलारी यास.
२ राम लक्ष्मण व सीता, देवभट आपशिंगेकर याचे वाड्यांत यास.
१ ठाकुरद्वार, तुळसीदास बैरागी याचे देवभट आपशिंगेकर याचे घरासमोर यास.
१ ठाकुरद्वार बैरागी याचे.
१ मल्हारनाथबावा ब्रह्मचारी, बेला सन्निध समाध गुरुची आहे त्यास.
२॥ बाजीपंत सहस्त्रबुद्धे यांचे घरीं.
२ विठ्ठल व रखमाई, दर १ प्रमाणें.
-॥- हनुमंत व गरुड, देवासमोर यांस दर -।- प्रमाणें.

२॥

१ श्रीगणपती, शिवरामभट शाहापूरबेळगांवकर यांचे घरांतील यास.
१ विठोबा व रखमाई, पिंपळासमोर वाणी याचे घरांतील.
-।- हनुमंत, पिंपळाचे पारावरील, लक्ष्मेश्वराचे देवालयाचे दक्षणेकडे आहे त्यास.
-।- हनुमंत, गोपाळपुरी गोसावी याचे वाड्यानजीक देऊळ आहे त्यास.
-॥- हनुमंत व बाबदेव, शामदासभाई सावकार याचे बागेंतील यास दर -।- प्रमाणें.

१५॥

३ पेठ न्याहाल.

२ राममंदीर व विठ्ठल रखमाई, जयराम कुंभार याचे घरांत यांस.
-॥।- महादेव व गणपती व हनुमंत, जयराम कुंभार याचे दरवाज्याबाहेर भिंतीस आहेत त्यांस दर देवांस दर -।- प्रमाणें.
-।- हनुमंत, पांडोबा रसाळ याचे घरानजीक रस्त्यांत.

३

२० पेठ गणेश.

१ नाग, पारावरील, नागझरीचे काठीं यास.
१ हनुमंत, रस्त्यांत देवळींत भिकाजी खटवणें याचे घरासमोर यास.
२ विष्णुचे देवालय, भिकाजी खटवणें याचे घराचे दक्षणेस आहे त्यास रुपये.
१ विष्णु.
१ विठ्ठल रखमाई, देवाचे डावे बाजूस सोप्यांतील यांस.

२

२ विठ्ठल रखुमाई, मोरोपंत लोखंडे यांचे घरांत विष्णूचें देवालयासमोर दर १ प्रमाणें.

३॥ डुल्या हनुमंत याचें देवालयांत.

१ हनुमंतास.

-॥- महादेव व गणपती देवाजवळ गरभाऱ्यांतील दर -।-

२ सभामंडपांत.

१ बालाजी बैरागी यांचा, देवासमोर.

-॥- विठ्ठल रखमाई, बालाजीचे उजवे बाजूस. दर -।- प्रमाणें रुपये.

-॥- महादेव व लक्ष्मीनारायण, बालाजीचे डावे बाजूस दर -।- प्रमाणें रुपये.

२

३॥

१ लक्ष्मी नारायण, नाना भट जोशी यांचे घरांत डुल्या हनुमंताचे दक्षिणेस लगत यास.

१॥ गणपतीचें देवालय, डुल्या हनुमंताचे उत्तरेस लगत र-स्त्यांत आहे त्यास.

१ गणपती.

-॥- विठ्ठल रखुमाई, दर -।- प्रमाणें.

१॥

१ विठ्ठल रखमाई, भाऊभट चांदेकर याचे घरांत डुल्या हनुमंताचे उत्तरेस लगत यास.

१ राममंदीर, रामदास बावा विद्वजन डुल्या हनुमंताचे पाठीमागें नागझरी नजीक यास.

१॥। नागझरीचे काठीं.

-॥।- डुल्या हनुमंताचे पाठीमागें नागझरीस जातांना रस्त्यांत देव आहेत त्यांस रुपये.

-।- गणपती, पारावरील यास.

-॥- देवी व महादेव, पाराजवळ भिंतीस दर -।- प्रमाणें.

-॥।-

१ ठाकुरद्वार माधवदास याचे, नागझरीस जातांना उजवे हातास आहे त्यास.

१॥।

-।- मुंज्या, डुल्या हणुमंताचे पश्चिमेस नजीक पिंपळाखालीं यास.

१ विठ्ठलरखमाई, बयाजी फडके कायगांवकर याचे वाड्यांत डुल्या हनुमंताचे पश्चिमेनजीक यांस.

-।- मुंज्या, निंबाचे झाडाखालीं देवळींत टंकसाळेचे दक्षिणेस रस्त्यांतील यास.

-।- हनुमंत, कानु दाळवाला याचा.

१। विठ्ठलरखमाईचे देऊळ, कानु दाळवाला याचे.

१ विठ्ठलरखमाबाई.

-।- महादेव.

१।

१ बालाजी, रामरतनदास बैरागी याच्या मठांतील.

-।- दत्तात्रयदेव, येसूकदम याचे घरीं.

-।- मारुती, रस्त्यांत पिंपळाचे पारावर आहे त्यास.

२०।

१६।। पेठ भवानी.

३ भवानीचें देऊळ.

१ देवीस.

१ विठोवा रखमाई, देवीचे डावे बाजूस सोप्यांतील यांस.

१ परमहंसबावा.

३

१।। बालाजी, गोदडशाबावाचा.

१ बालाजी.

-।।- गणपती व हनुमंत, बालाजीसमोर.

१।।

१ खंडोबा, नारायणभट पाठक याचे घरीं यास.

२ दाळवाला याचे घरीं.

१ बालाजी.

१ हनुमंत.

२

१। दयाळदास बैरागी याचे मठांत.

१ बालाजीस.

-।- हनुमंत.

१।

-।- गणपती, चावडीजवळ पिंपळाचे पाराजवळ देवळींत आहे त्यास.

२ गोपाळदास बैरागी याचे मठांत.

१ बालाजीस.
१ मारुती.
२

१ विठ्ठल रखमाई, पांडोबा रोंगे यांचे घरीं आहे त्यास.
-।- गणपती, पांडोबा रोंगे यांचे घराजवळ रस्त्यांत देवळींत यास.
-।- हनुमंत, रस्त्यांत खुला यास.
१ भवानी, संतबावाची.
१ हनुमंत, विहीरीजवळ रस्त्यांत देवळींत यास.
-॥- बहिरोबा व हनुमंत, नारायणभट फाटक याचे घराजवळचा.
१। रामदास बैरागी यांचे मठांतील.
१ बालाजी.
-।- हनुमंत.
१।

-।- हनुमंत, तळ्यावरील.

१६॥

६ पेठ हनुमंत.

१ विठोबा रखमाई, दत्ताजी बावा याचे वाड्यांत आहे त्यास.
१ राममंदिर, गोपाळ गोसावी याचे वाडयांत आहे त्यास.
१ देवी, चावडी जवळची.
१ हनुमंत, पेठेचा.
-।- बहिरोबा, खुली मूर्त आहे त्यास.
१ विठोबा रखमाई, भवानजी नाईक सुतार याचे वाडयांत.
-॥- हमाल आळींत.
-।- महादेव, देवालयांत.
-।- हनुमंत, खुला.
-॥-

-।- विठोबा रखमाई, राऊळ याचे घरीं नागझरी नजीक.

६

३॥। पेठ घोरपडे.

१ विठ्ठल रखमाई.
१ बहिरोबा, खुला.
-।- हनुमंत, पारावरील.
१ हनुमंत, मालोजी घोरपडे यांचे घराचे पिछाडीस.

-।- हनुमंत, शंकराजी घोरपडे यांचे घराचे पश्चमेस.
१ हनुमंत, तांबोळी याचे घराजवळ रस्त्यांत देऊळ आहे त्यास.

३।।।

११।।। पेठ गंज.

१।। जोगेश्वरबावा गोसावी याचे मठांत.
१ महादेव.
॰।।॰ लक्ष्मी नारायण पंचायतन, व मारुती मिळोन.

१।।

२ बालाजी व हनुमंत, चावडीसमोरचा दर १ प्रमाणें.

१। देऊळ मारुतीचें नागझरी नजीक.
१ विठ्ठल रखमाई यांस.
॰।॰ मारुती यास.

१।

१ राममंदीर, भगवानदास बैरागी याचे मठांत नागझरीचे काठीं.
॰।॰ हनुमंत, नागझरीचे काठीं.
१ बालाजी, निमचरदास याचे मठांत.
२ पुरुषोत्तमदास बैरागी याचे मठांत नागझरीचे काठीं.
१ बालाजी यास.
१ हनुमंत यास.

२

१।। विठोबा रखमाईचें देऊळ भुजंगशेट तोडकर याचे घरानजीक.
१ विठ्ठल रखमाई.
.।. वटेश्वर महादेव, वडाचे झाडाखालीं.
॰।॰ पुंडलीक.

१।।

१ महादेव, बापुजी नारायण याचे घरानजीक.
॰।॰ गणपती, लकडे याचे घरानजीक.

११।।।

४।। शहरांतील देवांस वगैरे दक्षणा ठेविली ते समयीं देवालयांतून नंदी व गरुड व गणपती वगैरे मूर्ति होत्या त्यांस येक पैसा प्रमाणें ठेविला त्यास खर्च खुर्दा टक्के १६। दर रुपयास टक्के ३।।६ प्रमाणें.

४३२।।।

४१।।। मौजे पर्वती.

२०। श्रीपर्वतीचे देउळांत.

१४। देवदेवेश्वरास.

१३। मुख्य मूर्तीस, मोहोर शेटशाई नाणें १.
१ भोगमूर्तिलिंग यास.
———
१४।

१ गणपती सदरेंतील, देवाचे डावे बाजूस यास.
५ चोहोंकोपऱ्यांचे देव यांस रुपये.
१ गणपती.
१ सूर्यनारायण.
२ देवी व जुनी पर्वतीची मूर्ति देव २ दर १ प्रमाणें.
१ विष्णु.
———
५
———
२०।

१ कार्तिकस्वामी.
१३। विष्णु यास, मोहोर शेटशाई १ येकूण.
१ गणपती, रमण्यांतील ओट्यावर खुला यास.
१। विठ्ठल व रखमाई, गांवांतील देव पर्वतीस जातांनां पायऱ्याजवळ डावे बाजूस.
१ विठ्ठलरखमाईस.
-।- विनायकभट काशीकर याचे देवापुढें.
———
१।

१ हनुमंत.
१ महादेव.
१ गणपती, बाळोबा देऊसकर याचे घराबाहेर देवळींत आहे त्यास.
२ अग्निहोत्री यांचे अग्निनारायणापुढें.
१ पर्वतीस डोंगरावर सरकारचे वाडयांत आहेत त्यांस.
१ बाळ दीक्षित ढेरे गांवांतील.
———
२

२ श्रीनवलोबा, तळ्याचे बाजूस.
१ पश्चिमेकडील बाभळीचे झाडाखालीं यास.
१ पूर्वेस हिराबागानजीक यास.
———
२

१ गणपती, सारसबागतळ्यांतील तेथें आहे त्यास.

२ महादेव.

१ तळ्याचे काठीं पूर्वेकडे.

१ सोनभट याचे घरीं पर्वतीस जातांना तळ्याजवळ डावेबाजूस यास.

२

४६।॥

७ मौजे विठ्ठलवाडी.

२। विठोबाचे देवळांत.

२ विठ्ठलरखमाई, दर १.

-।- गरुड, हनुमंत, देवासमोर पोवळी बाहेर आहे त्यास.

२।

-।- पुंडलीक, देउळ नदींत आहे त्यापुढें.

३॥ गणेशखिंड विठ्ठलवाडीस जातांना वाटेवरची.

१ गणपतीस.

-।- हनुमंतास.

२। ब्राह्मणाचे देवापुढें.

१ जोशी पंचनदीकर याचे देवापुढें.

१ नेहमीं देवापाशीं उपोषणें करितात त्यास.

-।- कित्ता ब्राह्मणास.

२।

३॥

१ श्रीगणपती, विठ्ठलवाडीस जातांना मार्गी उजवे बाजूस गोसावी याचा यास.

७

५॥ गणेशखिंड पाषाणाअलीकडील येथील देव यांस.

३। गणपतीचें देवळांत.

२ श्रीगणपतीस.

१ श्रीरामलक्ष्मण व सीताबाई यांस.

-।- हनुमंत, पिंपळाखालील यास.

३।

२। चतरशिंगी देवीस.

२ मुख्य मूर्तीस व भोगमूर्तिस दर १ प्रमाणें.

-।- गणपती, चतरशिंगीस जातांना डोंगरांत मार्गाचे डावे बाजूस.

२।

५॥

२२॥ मौजे भांबवडे तर्फ हवेली प्रांत पुणें येथील देवांस. रुपये.

१३॥ श्रीवृद्धेश्वराचे देवळांत.

१३। मुख्य वृद्धेश्वरास, मोहोरशेटशाई नाणें. १.

-।- गणपती, सभामंडपांत कोनाड्यांत आहे त्यास.

१३॥

१ श्रीत्रिंबकेश्वर.

१ रोकडोबा.

१ महादेव, भुयारांतील यास.

१ श्रीराममंदीर, द्वारकादास बैरागी याचे घरांत त्यास.

२ विठ्ठलरखमाई, माई पाटक यांचे घरीं.

३ तपस्वी ब्राह्मण यांचे देवापुढें.

१ गोपाळभट बापट.

१ काशीनाथभट कानीटकर.

१ रघुनाथबावा.

३

२२॥

१३। श्रीबनेश्वर, वस्ती मौजे नसरापूर यास मोहोर शेटशाई नाणें. १ येकूण रुपये.

१३। श्रीमोरेश्वर, वस्ती मौजे मोरगांव, यास मोहोर शेटशाई नाणें. १ येकूण.

५४१

१२४॥ दक्षिणेनिमित्य खर्च जाला तो.

४२॥ देवांपुढें.

३९॥ नारळ.

३७॥ आसोली सुमारे ५२५ दर १४ प्रमाणें.

२ सोलीव ४० दर २०

३९॥

३ विड्यांस.

१॥ सुपारी दर विड्यास सुमारे १ प्रमाणें ठेविली. तें सुपारी पक्कें वजन ८८३॥.

१॥ पानें विडयांचीं हिरवी, दर विडयास सुमारे ५ प्रमाणें पानें सुमारे २९००. दर रुपयास १९०० प्रमाणें.

३

४२॥

१ तेल दिवटीस वजन पक्कें ८८३॥.

४० वाजंत्री ताफे २ येकूण.
२० कर्णेकरी व शिंगाडे.
५ शिंगाडया असामी १ येकूण.
१५ कर्णेकरी असामी २ दर.
———
२०
१० तासेमर्फेवाले जोड २ येकूण.
६ माणसें नारळ ओझीं घ्यावयास असामी २ येकूण पंधरारोजा.
५ शिष्या असामी १ ऐवज व विडयाचें सामान बाळगावयास नेहमीं होता त्यास.
———
१२४॥
———
६६५॥
येकूण सहाशें साडेपासष्ट रुपये जकात प्रांत कल्याण भिवंडी निसबत बाळकृष्ण आबाजी यांजकडे सालमजकुरींचे रसदेचा पोते चालीचे बच्यासुद्धां ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यापैकीं, व खाशांकडील अंतस्थाबद्दल सालगुदस्तप्रमाणें सालमजकूरचे येणें त्या पैकीं देविले रुपये.

पेशव्यांचें मुक्काम.

दुसरे बाजीराव पेशवे.

१७९५-९६ ते १८१६-१७.

सीततीसेन मया व अलफ. इ.स. १७९५-९६.

महिना.	ता.	मुक्कामाचा गांव.
रबिलाखर	१३ ते	पुणें.
रमजान	१५	
,,	१६-२२	मौजे वडगांव.
,,	२३-२९	थेऊर प्रांत पुणें.
सवाल	१-२९	थेऊर.
जिल्काद	१	थेऊर.
,,	२	भांबवडे प्रांत पुणें.
,,	३ ते	पुणें.
जिल्हजे	३०	

सबातिसेन मया व अलफ. इ.स. १७९६-९७.

मोहरम	१ ते	पुणें.
